# परशुरामीय

हें सारस्वताचें गोड । तुम्हींचि लाविलें जी झाड ।
तरी आतां अवधानामृतें वाड । सिंपोनि कीजे ॥

वर्ष ४३ ] मार्च १९५९ [ अंक २ रा

## संपादकीय समालोचन

अमृतमहोत्सवः—१ जानेवारी १८८३ रोजीं नूतन मराठी विद्यालयाची स्थापना झाली. त्यानंतर पांच वर्षांनीं आपल्या शिक्षण प्रसारक मंडळीची स्थापना झाली. म्हणजे १९५८ या सालीं विद्यालयाला ७५ वर्षें व शि. प्र. मंडळीला ७० वर्षें पुरीं झालीं. यासाठीं या वर्षी आपल्या या संस्थांचा अमृतमहोत्सव साजरा करण्याचें ठरलें व त्याप्रमाणें गेलें वर्षभर मंडळीच्या निरनिराळ्या संस्थांनीं आपापल्या सोयीच्या तारखा ठरवून हा उत्सव साजरा केला. आणि शेवटीं २९ व ३० नोव्हेंबर १९५८ या दिवशीं या वर्षभर चाललेल्या महोत्सवाचा सांगतासमारंभ होऊन आपला अमृतमहोत्सव पूर्ण झाला.

तिथीप्रमाणें मार्गशीर्ष वा॥ ८ मी हा नू. म. विद्या स्थापना-दिन. त्यादिवशीं ( १४ डिसेंबर १९५७ ) नूतन मराठी प्राथमिक शाळेंत वेदमंत्रांच्या घोषानें अमृतमहोत्सवाचा प्रारंभ झाला. त्या दिवशीं भरलेल्या सभेंत आपल्या शि. प्र. मंडळीच्या नियामक मंडळाचे अध्यक्ष म. म. द. वा. पोतदार व अमृतमहोत्सव-समितीचे अध्यक्ष प्राचार्य शं. वा. दांडेकर यांची भाषणें झालीं. दुसऱ्या दिवशीं सत्यनारायणाची महापूजा व पानसुपारी होऊन हा पहिला समारंभ पूर्ण झाला. यानंतर टिळक शिक्षण महाविद्यालय, ( २५ डिसेंबर १९५७ ) नू. म. वि. प्रशाळा ( ३१ डिसें. १९५७ व १ जाने. १९५८ ) पोदार महाविद्यालय व रामनारायण रुइया महाविद्यालय–दादर, मुंबई ( १२ ते १८ जाने. ५८ ) स. प. महाविद्यालय, पुणें, (५फेब्रु. १९५८ ) हरिभाई देवकरण प्रशाला–सोलापूर (५ फेब्रु. ५८ ) या संस्थांनीं हा उत्सव साजरा केला.

सांगतासमारंभाला नोव्हेंबर १९५८ च्या पहिल्या आठवड्यांत सांस्कृतिक कार्यक्रमानें प्रारंभ झाला. प्रा. अरविंद गंगाधर मंगरूळकर हे याचे मुख्य व्यवस्थापक होते. हा कार्यक्रम ५ दिवस चालू होता. भारताचे नटराज गोपीकृष्ण यांचें नृत्य, सौ. सरस्वती राणे, सौ. माणिक वर्मा, श्री. भीमसेन जोशी यांचें गायन, श्री. सुधीर फडके यांचें गीतरामायणाचें गायन आणि श्री. पु. ल. देशपांडेकृत 'तुझें आहे तुजपाशीं' या नाटकाचा मुंबई मराठी साहित्यसंघानें केलेला प्रयोग—असा हा भरगच कार्यक्रम प्रा. मंगरूळकरांच्या सावध नेतृत्वामुळें अपेक्षेबाहेर यशस्वी झाला.

यानंतर अत्यंत महत्त्वाचा कार्यक्रम म्हणजे 'शिक्षण परिषद्' हा होय. दि. २२, २३, व २४ नोव्हेंबर १९५८ असे तीन दिवस परिषदेचें काम चालू होतें. यांत ६ परिसंवाद झाले. प्रत्येक दिवशीं सकाळीं ८-३० ते ११ व सायंकाळीं ५-३० ते ८ अशीं दोन सत्रें असत. 'खाजगी शिक्षण संस्था व सरकार यांचे संबंध', 'सध्यांच्या शिक्षणाचा दर्जा', 'भिन्न उद्योगक्षेत्रें, व्यवसाय व सध्यांचें शिक्षण', 'खाजगी शिक्षण संस्थांचे चालक व त्यांतील सेवक यांचे संबंध' 'खाजगी शिक्षण संस्थांपुढील आर्थिक प्रश्न' व 'पाश्चात्य देशांतील शिक्षण' असे सहा विषय परिसंवादासाठीं ठेविले होते. त्या त्या क्षेत्रांतील नामवंत कार्यकर्ते मोठ्या अगत्यानें आले होते. त्यांचीं भाषणें अतिशय उद्बोधक झालीं. परिषदेचें उद्घाटन केन्द्र सरकारचे शिक्षण-मंत्री श्री. श्रीमाळी यांनीं केलें. प्रा. ना. वि. पाटणकर हे या परिषदेचे मुख्य व्यवस्थापक होते. त्यांनीं अत्यंत दक्षतेनें व मेहनतीनें हें बिकट कार्य यशस्वीपणें तडीस नेलें.

ता. २९ रोजीं प्रातःकाळीं शि. प्र. मंडळीच्या पुण्यांतील सर्व शिक्षण संस्थांतील विद्यार्थ्यांचा नू. म. वि. प्रशाळेच्या मैदानावर मेळावा भरला होता. त्यांना उद्देशून अमृतमहोत्सवाचे अध्यक्ष ले. ज. थोरात यांचें अतिशय उद्बोधक असें भाषण झालें. ते म्हणाले, "आपल्या राष्ट्रीय ध्वजावरचा जो तांबडा भाग आहे तो जसाच्या तसा टिकविण्याचें काम आम्ही सैनिक करूं. त्यांतील जो शुभ्र धवल भाग आहे तो तसाच टिकविण्याचें काम तुम्हा विद्यार्थ्यांचें आहे. तें तुम्हीं केलें नाहीं तर त्याची धवलता टिकविण्याचें कार्य लष्कराला हातीं घ्यावें लागेल. हें अत्यंत अनिष्ट होय." भाषणानंतर विद्यार्थ्यांना पेढे वाटण्यांत आले व मग समारंभ संपला.

यानंतर शि. प्र. मंडळीच्या सर्व सेवकांचा मेळावा देवी रमाबाई सभागृहांत भरला. म. म. पोतदार यांनीं त्यांनीं केलेल्या सेवेचा गौरव करून सर्व सेवकांना सेवागौरवाचें प्रतीक म्हणून बिल्ले दिले. महोत्सवाच्या निमित्तानें भरलेल्या माजी विद्यार्थ्यांच्या संमेलनाला संध्याकाळीं ५ वाजतां प्रारंभ झाला. प्रथम अल्पोपहार होऊन नंतर ले. ज. थोरात यांच्या अध्यक्षतेखालीं सभा झाली. माजी विद्यार्थ्यांची कायमची संघटना व्हावी म्हणून सभेंत एक योजना आखण्यांत आली. त्याच दिवशीं रात्रीं माजी विद्यार्थ्यांनीं 'भावबंधन' या नाटकाचा प्रयोग केला. दुसऱ्या दिवशीं सकाळीं माजी विद्यार्थ्यांचा परस्पर परिचय व नंतर भोजन असा कार्यक्रम झाला. ३० नोव्हेंबर रोजीं संध्याकाळीं ५ वाजतां स.प.महाविद्यालयाच्या मैदानावर उभारलेल्या भव्य मंडपांत अमृत महोत्सवाचा शेवटचा समारंभ झाला. शि. प्र. मंडळीचे अध्यक्ष, सुप्रीम कोर्टाचे न्यायाधीश, न्या. मू. प्र. बा. गजेन्द्रगडकर यांनीं महोत्सवाचे अध्यक्ष लेफ्टनंट जनरल एस्. पी. पी. थोरात, डी. एस्. ओ., पद्मश्री, जी. ओ. सी. इन्-सी. ईस्टर्न कमांड, लखनौ, यांचें स्वागत केलें. अध्यक्षीय भाषणांत सेनापति थोरात यांनीं प्रथम महाराष्ट्राच्या थोर परंपरेस अभिवादन करून नंतर विद्यार्थ्यांना बहुमोल असा उपदेश केला. सध्यांचे विद्यार्थी बुद्धिमत्ता व बहुश्रुतता या बाबतींत पूर्वीच्यापेक्षां सरस आहेत. पण त्यांच्यांत बेशिस्त वाढत आहे, स्त्रीदाक्षिण्याचा लोप होत आहे, अभ्यास सोडून राजकारणांत शिरण्याची त्यांची प्रवृत्ति दिवसेंदिवस जास्तच होत आहे असें सांगून हे अनिष्ट प्रकार लवकरच बंद होऊन आमचे विद्यार्थी राष्ट्र सेवेसाठींच तनमनधन अर्पितील, असा आशावाद त्यांनीं प्रगट केला.

या समारंभास पुण्यांतील सर्व क्षेत्रांतील थोर गृहस्थ व सुमारें ५।६ हजार नागरिक उपस्थित होते. या सर्वांनीं यावेळीं उपस्थित राहून शि. प्र. मंडळीच्या कार्याविषयीं आपल्या शुभेच्छा व्यक्त केल्या आणि अशा रीतीनें वर्षभर चाललेल्या या अमृत महोत्सवाची सांगता झाली.

निधि—शि. प्र. मंडळीसारख्या शिक्षण संस्थांचा उत्कर्ष महाराष्ट्रांत सर्वस्वी लोकांनीं केलेल्या साह्यामुळें झालेला आहे. या अमृत महोत्सवाच्या शुभप्रसंगीं आपल्या शिक्षणसंस्थांवर लोकांचें आणि विशेषतः माजी विद्यार्थ्यांचें किती प्रेम आहे, किती भक्ति आहे, हें स्पष्टपणें दिसून आलें आहे. अनेक विद्यार्थ्यांनीं अहमहमिकेनें पुढें येऊन घरचें म्हणूनच उत्सवाचें काम केलें. त्याचप्रमाणें अनेकांनीं घरोघर हिंडून निधि जमविण्यासहि साह्य केलें. त्यामुळेंच निधीची रक्कम रु. १ लक्ष ६० हजारपर्यंत गेली आहे. आणि दोन लक्षापर्यंत जाईल

याविषयीं शंका वाटत नाहीं. या सर्वांत विशेष उल्लेखनीय गोष्ट म्हणजे आपल्या महाविद्यालयाच्या सहा माजी विद्यार्थ्यांनीं जमविलेल्या निधीची. हे सहाहि विद्यार्थी अत्यंत गरीब होते. आज सुदैवानें ते सर्व पदवीधर झाले आहेत. पदवीधर झाल्यानंतर आपल्या महाविद्यालयाचें ऋण अंशतः फेडावयाचें म्हणून त्यांनीं दरमहा थोडीशी शिल्लक टाकण्याचें ठरवून ७ वर्षांत ६२५ रु. जमविले. आणि ते अमृत-महोत्सवाच्या शुभवेळीं स. प. महाविद्यालयाच्या गरीब विद्यार्थी-निधीस अर्पण केले. पुढें माजी विद्यार्थी या सदरांत त्यांचें निवेदन छापलें आहे तें सर्व विद्यार्थ्यांनीं अवश्य पहावें.

स्नेह-संमेलन—सर्व महाविद्यालयाचें एक संमेलन न भरवितां पदवी—वर्ग, पदवीपूर्ववर्ग—साहित्य व पदवी पूर्ववर्ग—विज्ञान अशा तीन विभागांचीं तीन संमेलनें पृथक्‌पणें करावीं ही कल्पना आतां आपल्या महाविद्यालयांत रूढ झाली आहे आणि विद्यार्थ्यांनीहि ती मानवली असून ते कसून मेहनत घेऊन ती यशस्वी करीत आहेत. या वर्षी दि. २१, २२ व २३ डिसेंबर ५८ या दिवशीं हीं संमेलनें झालीं. गेल्या वर्षाप्रमाणेंच भोजन, नाटक, व विविधरंजन असे प्रत्येक संमेलनाचे तीन कार्यक्रम होते. आणि प्रत्येक विभागाचा एका दिवशीं एकच कार्यक्रम असल्यामुळें प्रत्येक संमेलन तीन दिवस चालू होतें. हीं संमेलनें यशस्वी करण्यास ज्यांनीं ज्यांनीं साह्य केलें त्यांना आम्ही धन्यवाद देतों.

## स. प. महाविद्यालय—स्नेहसंमेलन १९५८

विभागीय संमेलनांची सामान्य रूपरेखा.

| वर्ग | वर्गणी | विद्यार्थी संख्या | कार्याध्यक्ष | चिटणीस | नाटक | दिग्दर्शक | विविधरंजन |
|---|---|---|---|---|---|---|---|
| पदवी पूर्व साहित्य | २॥ रु. | ५८० / ८६० | प्रा. द. वि. कुलकर्णी | १ श्री. श्रीनिवास पाटील. २ श्री. अरुण शहा. | माझें घर | श्री. पाळंदे | एकांकिका 'माणदेशी माणसें' गायन, वादन. नकला, सिनेसंगीत |
| पदवी पूर्व विज्ञान | २॥ रु. | ४१८ / ९०० | प्रा. एस् आर् देशपांडे. | १ श्री. सुधीर दिघे. २ श्री. व्ही.जी. देडगांवकर ३ श्री. सुभाष देशमुख | उसना नवरा | श्री. खंडेराव केळकर. | एकांकिका नृत्य, गायन, वादन, नाटिका. |
| पदवीवर्ग साहित्य व विज्ञान | ३ | १४०६ / ७५० | प्रा. आर्. टी. कुलकर्णी | श्री. जी. आर्. ओक | लगीन घाई | श्री. जयंत धर्माधिकारी | नाटिका लोकनृत्य नृत्यगायन वाद्यवृंद |

प्राध्यापकांची कामगिरी—डॉ. श्री. वा. काळे : अहमदाबाद येथें २५ ते २८ डिसेंबर १९५८ तत्त्वज्ञान-परिषद् भरली होती. त्या परिषदेतील मानसशास्त्र-विभागाचे अध्यक्ष म्हणून डॉ. काळे यांची योजना झाली होती. अध्यक्षपदावरून त्यांनीं 'तत्त्वज्ञान व मानसशास्त्र यांतील व्यक्तित्वाची चिकित्सा' या

विषयावर भाषण केलें. या परिषदेंत 'पॅरा सायकॉलजी आणि फिलॉसफी' या विषयावर झालेल्या परिसंवादाचेहि ते अध्यक्ष होते. दिल्ली येथें २१ ते २८ जाने ५९ या आठवड्यांत 'कॉनफरन्स ऑफ सायकॉलॉजिस्टस् इन् इंडिया' भरली होती. या परिषदेला व ४६ व्या भारतीय विज्ञान परिषदेला डॉ. काळे उपस्थित होते. या परिषदेतर्फे नियुक्त झालेल्या 'नॅशनल कमिटीवर त्यांची निवडणूक झाली आहे. कलकत्ता येथें जाने १९५९ मध्यें 'इंडियन सोशिऑलाजिकल कॉन्फरन्स भरली होती' त्या परिषदेंत डॉ. काळे यांनीं 'राष्ट्रीय नियोजन व त्यांत मानसशास्त्रज्ञांचें स्थान' या विषयावर निबंध सादर केला. पुण्याच्या 'सोशल सायन्सेस सेमिनार' मध्येंहि डॉ. काळे यांनीं 'जनरल् एज्युकेशन-इट्स् नेचर अँड सायकोसोशल आस्पेक्टस्' या विषयावर निबंध सादर केला. वर उल्लेखिलेली 'सोशल सायन्स सेमिनार'—पुण्यांतील सामाजिक शास्त्रें शिकविणाऱ्या प्राध्यापकांची परिषद्—जानेवारी २४, २५, २६ या दिवशीं भरली होती. प्रा. श्री. र. कावळे यांनीं त्या परिषदेचे सहचिटणीस म्हणून काम केलें. याच सेमिनारमध्यें प्रा. केळकर यांनीं 'दि रोल ऑफ इंडस्ट्री इन् डेमॉक्रसी' या विषयावर आणि प्रा. सौ. कुमुद पोरे यांनीं 'डेमॉक्रसी अँड एकॉनॉमिक डेव्हलपमेंट इन् इंडिया' या विषयावर निबंध वाचले. प्रा. सिरसीकर व प्रा. सौ. पोरे यांनीं समीक्षक म्हणून या सेमिनारमध्यें काम केलें. प्रा. रा. म. गोखले यांची पुणें विद्यापीठाच्या राज्यशास्त्र-अर्थशास्त्र विभागाच्या मराठी परिभाषासमितीवर नेमणूक झाली आहे. या वर्षींच्या सेकंड बॉंबे बटालियनच्या औरंगाबाद येथील कॅंपमध्यें प्रा. कॅ. गायधनी यांची ॲडज्यूटंट अँड स्पोर्टस् ऑफिसर म्हणून नेमणूक झाली होती. एन्. सी. सी. मध्यें प्रा. द. वि. कुलकर्णी यांना यंदापासून कॅप्टनचा हुद्दा मिळाला आहे. डॉ. पु. ग. सहस्रबुद्धे यांचीं कलकत्ता येथें १९५८ च्या नाताळच्या सुटींत तेथील महाराष्ट्रमंडळातर्फे 'लोकशाहीचीं पंचमहातत्त्वें [ 'व्यक्तिस्वातंत्र्य', 'समाज-संघटना', 'धर्मक्रान्ति', 'सामाजिक समता', व 'समाजवाद' ] या विषयांवर पांच व्याख्यानें झालीं. पुणें विद्यापीठाच्या कोर्टावर कुलपतींनीं प्रा. श्री. गो. हुल्याळकर यांची नियुक्ति केली आहे. आणि प्राध्यापक मतदार संघातर्फे प्रा. आर्. टी. कुलकर्णी कोर्टाचे सभासद म्हणून निवडून आले आहेत. वरील सर्व प्राध्यापकांचें त्यांना मिळालेल्या बहुमानाबद्दल आम्ही मनःपूर्वक अभिनंदन करतों.

**नमस्ते**— प्रा. शंकर दत्तात्रय गोखले एम्. एस्सी. हे नोव्हेंबर १९५७ पासून सेवानिवृत्त झाले आहेत. १९२० सालीं ते आपल्या महाविद्यालयांत आले. आणि तेव्हांपासून सतत ३७ वर्षें ते अध्यापनाचें कार्य निरलसपणें करीत होते. पदार्थविज्ञान हा त्यांचा विषय असून एक निष्णात शिक्षक म्हणून त्यांनीं कीर्ति मिळविली होती. महाविद्यालयाच्या जिमखाना विभागांतहि ते तितक्याच आस्थेनें लक्ष घालीत. अजूनहि पहिल्याच जोमानें ते टेनिस खेळतात. निवृत्तीनंतरहि विद्यार्थ्यांना त्यांच्या मार्गदर्शनाचा लाभ घडत आहे ही आनंदाची गोष्ट आहे. त्यांना पुढच्या काळांत दीर्घायुरारोग्याचा लाभ व्हावा अशी शुभेच्छा आम्ही व्यक्त करतों.

**माजी विद्यार्थी**—आपल्या महाविद्यालयाचे सहा माजी विद्यार्थी सर्वश्री गि. शं. परदेशी बी. ए. ( सध्या नोकरी—पोस्ट खातें ), वि. कृ. रत्नपारखी बी. ए. ( पोस्ट खातें ), स. ह. परांजपे बी. ए., बी. कॉम. ( नॅशनल सॅंपल सर्व्हे ), सौ. लता परांजपे. बी. ए., प्रा. स. म. परळीकर एम्. ए. बी. टी. साहित्यरत्न— ( फर्ग्युसन कॉलेज ) व कु. सुशीला पानवलकर बी. ए. ( शिक्षणखातें ) यांनीं पुढील मधुघट आपल्या महाविद्यालयाला सादर केला आहे.

मधुघटः—अमृतमहोत्सवाच्या या पर्वणीवर आम्ही सहा माजी विद्यार्थी एक योजना सादर करीत आहोंत. तिचा संस्था स्वीकार करील ही आशा !

१९४८ सालापासून आम्ही सहाजण स. प. महाविद्यालयांत शिक्षण घेत होतों. शाळेचें छोटें विश्व सोडून कॉलेजच्या प्रांगणांत पाऊल टाकतांना आमच्यापुढें अनंत अडचणी होत्या. परिस्थितीशीं झगडत, भांबावलेल्या मनांना मुठींत धरून, पदवीधर होण्याचीं स्वप्नें पाहात, कुणाच्या तरी साहाय्याची अपेक्षा करीत होतों. त्याचवेळीं कॉलेजनें आपल्या मदतीचा हात, मातेच्या ममतेनें पुढें केला व म्हणूनच आम्ही सर्वजण आज पदवीधर होऊं शकलों.

आम्ही सर्वजण कॉलेजमध्यें शिक्षण घेतों व त्यासाठीं फी देतों पण तेथेंच आमचें कर्तव्य संपतें कां? ती केवळ आजच्या विसाव्या शतकांतील एक व्यावहारिक गरज आहे. केवळ अभ्यासासाठींच नव्हे तर आपलें आयुष्य घडविण्यासाठीं, जीवनाच्या सर्व अंगामध्यें उन्नत होण्यासाठीं गुरूंचें मार्गदर्शन व आशीर्वाद आपल्याला लाभत असतात. गुरुवर्योचें ऋण हें कधींहि न फिटणारें आहे. गुरुशिष्यांच्या या संबंधाबद्दल आपली भारतीय परंपरा फार थोर आहे. तिचा अभिमान बाळगायचा असेल तर आपण या ऋणाची अखंड जाणीव ठेविली पाहिजे.

पण असा विचार जरी मनांत आला तरी आमच्या सारखीं गरीब असमर्थ मुलें स्वतंत्रपणें कांहींच करूं शकत नव्हतीं. म्हणूनच समान विचाराचीं आम्ही सहा मुलें १५ ऑगस्ट १९५१ रोजीं एकत्र आलों व एका योजनेची मुहूर्तमेढ आम्हीं त्यावेळीं रोवली. आपल्यापैकीं प्रत्येकानें वर्षातून चार वेळां कांहीं रक्कम आपल्या शक्तीप्रमाणें बाजूला काढून ठेवावी, ती सर्व एकत्र करून त्याचा एक निधि जमवावा व बरीचशी रक्कम झाली कीं आपल्या कॉलेजच्या स्वाधीन करावी अशा तऱ्हेची ही योजना होती. त्याप्रमाणें गेलीं सात वर्षें आम्हीं हे पैसे जमविले, आमच्यापैकीं दोन कार्यवाहांनीं त्यांच्या समायिक खात्यावर ही रक्कम ठेवली व जास्तींत-जास्त व्याजाचा फायदा घेण्यासाठीं कांहीं रक्कम लांब मुदतीच्या ठेवींमध्यें ठेवली. या सर्वांचा तपशीलवार लेखी हिशेब ठेवून वर्षातून एकदां जमून त्या कामाचा आढावा घेतला. ह्या सर्वांचा परिणाम म्हणजेच आमचा हा ६२५ रु.चा आजचा मधुघट होय. ही रक्कम महाविद्यालयामध्यें चालू असलेल्या "गरीब-विद्यार्थी-निधी" ला अर्पण केली आहे.गुरुंच्या ऋणनिर्देशाबरोबरच आमच्यासारख्या धडपडणाऱ्या मुलांना या रकमेचा उपयोग व्हावा हीहि एक भावना यामागें आहे.

व्यावहारिकदृष्ट्या या ६२५ रु. चें मूल्य जास्त नाहीं. तसेंच आमच्या कार्यात आम्हांला पूर्ण यश मिळालें असें तरी आम्हीं कसें म्हणूं? पण आजपर्यंत ही योजना कार्यान्वित राहिली यांतच सर्व आलें. हें निवेदन करतांना जाहिरातबाजीचा हेतु नाहीं. परंतु यापासून आमच्या लहान विद्यार्थीबंधूंना जर स्फूर्ति मिळाली व त्यांनींहि गरीब-विद्यार्थी-निधीच्या जलौघांत आपल्या चार थेंबांची भर घालण्याचा प्रयत्न केला तरच आमचें उद्दिष्ट सफल झालें असें वाटेल. चार चिमण्या जीवांच्या टिचभर हृदयांत स्फुरणाऱ्या इच्छाशक्तीचें हें साकार प्रतीक आहे. मधमाशांच्या चिवट व जिवट चिकाटीनें, एकत्वाच्या भावनेनें, कणाकणानें हा मधुघट भरण्याचें काम आम्हीं केलें आहे. आज अमृतमहोत्सवाच्या त्या अमृतराशीमध्यें हा मधुघट आम्हीं ओतीत आहोंत. आशा हीच कीं त्यामुळें त्या अमृतराशीची रुचि अधिक मधुर होऊन त्याचा स्वाद, आमची भूमिका लक्षांत घेऊन, आमच्याबरोबरच आमचे प्राध्यापक, मार्गदर्शक व हितचिंतक घेतील.

☆ ☆ ☆

आपल्या कॉलेजमधून गेल्या एप्रिलमध्यें बी. ए. ची परीक्षा पास झालेले एक विद्यार्थी **श्री. के. बी. गुणे** हे ११ व्या एन्. सी. सी. ग्रॅज्युएट कमिशन कोर्सच्या परीक्षेंत यशस्वी होऊन सध्यां डेहराडून येथें पुढील शिक्षण घेत आहेत. थोड्याच महिन्यांत ते कमिशन मिळवून सैन्यांत एक अधिकारी होतील. ते आपल्या कॉलेजच्या 'सी कंपनींत' दोन वर्षें होते. गतवर्षी 'सी' सर्टीफिकेट परीक्षेंत त्यांचा सर्व बटालियनमध्यें पहिला क्रमांक आला होता व त्यांना गोल्ड मेडल मिळालें होतें. अभ्यास व एन्. सी. सी. या दोहोंत उत्कृष्ट यश मिळविणारे हे विद्यार्थी अनेकांना आदर्श होतील यांत शंका नाहीं. **श्री. सुरेश गुजराथी** यांनीं आपल्या विद्यार्थ्यांना मैदानी खेळ शिकविण्यासाठीं अत्यंत कष्ट घेतले. त्या क्षेत्रांत आपल्याला जें यश मिळालें आहे व आपली जी प्रगति होत आहे त्याचें श्रेय त्यांनाच आहे. आभार मानून त्यांचें ऋण व्यक्त करणें शक्य नाहीं. आपले एक माजी विद्यार्थी **श्री. न. शे. कुलकर्णी** (संस्कृत प्रथमश्रेणी १९५७) यांची स्टेट बँक ऑफ इंडियामध्यें फर्स्ट ग्रेड ऑफिसर' म्हणून निवड झाली आहे. या यशाबद्दल आम्ही त्यांचें अभिनंदन करतों.

'गणेश हरी डोंगरे' ही द. म. २१॥ रु. ची. शिष्यवृत्ति आपल्या महाविद्यालयांतील गरीब व लायक कोंकणस्थ ब्राह्मण विद्यार्थ्याला दिली जाते. अभ्यास कायम व नीट राहिल्यास ही चार वर्षेंपर्यंत म्हणजे बी. एस्सी. उत्तीर्ण होईपर्यंत मिळूं शकते. देणगीदारांनीं

निधि देते वेळीं असें सांगून ठेविलें आहे कीं, विद्यार्थी मिळविता झाल्यावर त्यानें ही रक्कम परत करावी असें या विद्यार्थ्यावर नैतिक बन्धन आहे. दुःखाची गोष्ट अशी कीं हें बन्धन आज ३२ वर्षांत कोणींहि मानलेलें नाहीं. पण या वर्षी थोडा दिलासा देणारी गोष्ट आपले एक माजी विद्यार्थी श्री. वाय्. डी. पटवर्धन, माहीम–मुंबई यांनीं केली आहे. त्यांना ही शिष्यवृत्ति मिळाली होती. तिच्या परत फेडीसाठीं त्यांनीं आपली १००० रु. ची विमा पॉलिसी शि. प्र. मंडळीच्या स्वाधीन केली आहे. श्री. पटवर्धन यांचें यासाठीं अभिनंदन करावें तेवढें थोडेंच आहे. बंधन केवळ नैतिक असून त्यांनीं तें पाळलें हें त्यांना अत्यंत भूषणावह आहे. ही जाणीव इतर माजी विद्यार्थ्यांनीं ठेवली तर त्या पैशांतून अनेक गरीब विद्यार्थ्यांना साह्य करणें आपल्या महाविद्यालयाला शक्य होईल.

**आमचे विद्यमान विद्यार्थी** — अखिल भारतीय नभोवाणी केन्द्रानें या वर्षी महाविद्यालयासाठीं हिंदी व मराठी नभोनाटिकांची स्पर्धा जाहीर केली होती. पुणें विद्यापीठातर्फे पाठविलेल्या नाटिकांत आपल्या महाविद्यालयांतील सीनि. बी. ए. च्या वर्गांत असलेल्या सौ. ज्योत्स्ना देवधर यांच्याच दोन्ही नाटिकांना पहिला क्रमांक मिळाला व दिल्लीसाठीं त्यांची निवड झाली. (हिंदी नाटिका–' माँ '; मराठी– ' सुखाचे सोबती ') त्यानंतर दिल्लीच्या आंतरविद्यापीठ स्पर्धेत १९५८ सालचें मराठींतील सर्वोत्तम नाटिकेचें पारितोषिक 'सुखाचे सोबती' या त्यांच्या नाटिकेस मिळालें. ही नाटिका ५ जानेवारी १९५९ रोजीं पुणें, मुंबई व नागपूर नभोवाणी केंद्रावरून ध्वनिक्षेपित झाली. सौ. देवधर यांनीं सर्वोत्तम नाटिका लिहिली इतकेंच नाहीं तर त्यांनीं तिच्या प्रयोगांत भूमिकाहि केली व तिचें दिग्दर्शनहि केलें. हें अपूर्व असें जें त्रिविध यश त्यांनीं मिळविलें त्याबद्दल आम्ही त्यांचें मनःपूर्वक अभिनंदन करतों.

मैदानी खेळांच्या स्पर्धांतहि आपल्या विद्यार्थ्यांनीं असेंच स्पृहणीय यश मिळविलें आहे. श्री. देखणे. ( इंटर आर्टस् ए ) यांनीं धांवण्याच्या स्पर्धेत ८०० मीटर ( १ मि. ५८·५ से. ), ४०० मीटर ( ५८·२ से. ) व क्रॉसकंट्री ( सुमारें ५ मैल ) ( ३१ मि. ) यांत नवे उच्चांक प्रस्थापित केले आहेत. आंतर विद्यापीठ खोखो स्पर्धेतहि देखणे यांनीं १ मि. ७५ से. खेळून स्पृहणीय यश मिळविलें आहे. श्री. दाते ( पी. डी. सायन्स ) यांनीं ४०० मीटर लो हर्डल्स्मध्यें ( ६०·२ से. ) हा उच्चांक प्रस्थापित केला. श्री. शाम येवले ( ज्यू. बी. ए. ) यांनीं शरीरसौष्ठवांच्या मुंबई-राज्यस्पर्धेत 'श्री मुंबई' हें बहुमानाचें पद मिळविलें. आतां अखिल भारतीय शरीरसौष्ठव–स्पर्धेसाठीं मुंबई राज्यातर्फे त्यांची निवड झाली आहे. श्री. अ. वि. ओक ( ज्यू. बी. एस्सी. ) हे आंतरविद्यापीठ स्पर्धेत १०० मीटर पोहण्यामध्यें ओळीनें दोन वर्षे पाहिले आले. श्री. सुभाष देशपांडे ( इंटर सायन्स ) आंतरमहाविद्यालयीन स्पर्धांत १०० व २०० मीटर धांवणें यांत दोन वर्षे ओळीनें पाहिले आले. मुंबईराज्य स्पर्धामध्यें श्री. राय ( पी. डी. सायन्स ) हे १०० मीटर धांवण्यांत पाहिले व श्री. सुभाष देशपांडे दुसरे आले.

फर्स्ट बॉम्बे आरमर्ड् स्कॉड्रन यांत आपल्या विद्यालयाचें ट्रूप दुसरें आहे. या ट्रूपनें कमांडंट ए. सी. सी, अॅन्ड एस्. अहमदनगर यांनीं ठेवलेली सर्वश्रेष्ठ ट्रूपची ढाल जिंकली आहे. उत्कृष्ठ शिस्तीचा पेला तर आपलें ट्रूप आज सतत ११ वर्षे ओळीनें जिंकीत आलें आहे. हा विक्रम खरोखर अपूर्व आहे. या ट्रूपमधील सार्जंट एस्. डी. पाटील हे या वर्षीच्या 'बी' सर्टिफिकेट परीक्षेत पहिले आले.

मैदानी खेळांत व लष्करांत विक्रम करून आपल्या महाविद्यालयाच्या कीर्तीत भर घालणाऱ्या या विद्यार्थ्यांना शतशः धन्यवाद.

आपल्या कलाकारांनींहि या वर्षी असाच विक्रम केला आहे. पुणें विद्यापीठाचा जो आंतरमहाविद्यालयीन युवक महोत्सव झाला त्यामध्यें ७ पैकीं ५ पारितोषिकें आपल्या कलाकारांनीं जिंकून आणलीं. कु. शीला परांजपे (सीनि. बी. ए.) ( १ ) कथ्थकनृत्य, श्री. पटवर्धन– ( २ ) गायन, कु. देशपांडे ( ३ ) गायन, ( ४ ) समूहनृत्य व ( ५ ) 'बदामराणी व चौकट गुलाम' ही नाटिका, अशीं नृत्य, गायन व नाट्य यांचीं सारीं पारितोषिकें आपल्या विद्यालयाला मिळालीं. नाटिकेमध्यें श्री. कुवाडेकर

यांना वैयक्तिक नैपुण्याचें पहिलें व कु. विजया बर्वे यांना दुसरें पारितोषिक मिळालें. या घवघवींत यशामध्यें दिल्लीच्या युवक महोत्सवांत आपल्या नाटिकेला पहिलें पारितोषिक मिळाल्यामुळें विशेषच भर पडली. या वर्षी रोटरी क्लबनें ठेवलेली ढालहि आपल्यालाच मिळाली आहे. दरवर्षी क्लबातर्फे आंतरमहाविद्यालयीन नाट्यस्पर्धा घेण्यांत येतात. त्यांत 'माझी पाठ धरते' ही पु. ल. देशपांडेकृत नाटिका आपण सादर केली होती. तिनें ही ढाल मिळविली. अभिनय नैपुण्याचें पहिलें पारितोषिकहि आपल्या महाविद्यालयांतील श्री. सुभाष गोडबोले यांनाच मिळालें. या सर्व कलाकारांचें आम्ही हार्दिक अभिनंदन करतों.

कळविण्यास अत्यंत वाईट वाटते कीं, सिनीअर बी. ए. चा एक प्रतिभासंपन्न विद्यार्थी श्री. बाबूलाल हंसराज नर्तेकर हा रक्तदाबाच्या विकारानें गेले [illegible] दिवस आजारी होता व त्यांतच शनिवार दिनांक ७–२–१९५९ रोजीं त्याचा अंत झाला. संस्कृत आणि हिन्दी या विषयांवर त्यानें मिळविलेलें प्रभुत्व असामान्य होतें. बी. ए. ला अर्थशास्त्र व भूगोल हे त्याचे विषय होते. वर्गात तो एक अभ्यासू, सालस, सहृदय व सर्वांशीं मिळून मिसळून वागणारा विद्यार्थी या नात्यानें अत्यंत लोकप्रिय होता. वयाच्या केवळ २३ व्या वर्षी त्याला असा आकस्मिक मृत्यु यावा यापेक्षां दुर्दैवी घटना ती कोणती !

ईश्वर मृतात्म्यास चिरशांति देवो.

# वार्षिक अहवाल

## १९५८–१९५९

## जिमखाना

गतवर्षीपेक्षां सर्वच विभागांतील खेळांचा दर्जा या वर्षी चांगला होता. क्रिकेट, भारतीय खेळ, व्हालीबॉल, बास्केटबॉल, अॅथलेटिक्स व व्यायामशाळा या विभागांनीं तर कौतुकास्पद कामगिरी बजाविली. आंतरमहाविद्यालयीन सामन्यांत आपल्या महाविद्यालयानें एकूण १७५ गुण मिळवून उपान्त्यपद मिळविलें. अॅथलेटिक्स विभागानें ६२ गुण मिळविले. या वर्षीचे सर्वच सामने अतिशय अटीतटीचे झाले.

अॅथलेटिक्स व अॅक्वेटिक्स विभागांत यंदा आपण उपविजेतेपद मिळविलें. विद्यार्थिनींच्या विभागानेंहि या वर्षी बरीच प्रगति केली. ह्या विभागानें एकूण ७१ गुण मिळविले. आमच्या संघांतील बऱ्याच विद्यार्थिनींना या वर्षी नागपूर येथें झालेल्या मुंबई-राज्य-क्रीडामहोत्सवांतून खेळण्याचा मान मिळाला. श्री. बंडू देखणे व दाते यांनीं बरेच नवीन उच्चांक प्रस्थापित केले. या आमच्या सर्व यशाचें श्रेय खेळाडूंचा उत्साह व श्री. सुरेश गुजराथी व श्री. झंवर या मार्गदर्शकांचे अविरत परिश्रम यांकडे जातें. आमचे माजी विद्यार्थी केवळ संस्थेवरील प्रेमाखातर आमच्या संघांना बऱ्याचवेळां मार्गदर्शन करीत असतात. त्यांचा यांतील वाटा फार मोठा आहे. या सर्वांचे जिमखान्यातर्फे मी आभार मानतों. पुढील वर्षी आम्ही यापेक्षांहि जास्त जोमानें परिश्रम करून श्रेष्ठतम यश मिळवूं अशी आम्हांस खात्री आहे.

क्रिकेट—आपल्या क्रिकेटच्या संघानें यंदा चक्री सामन्यांत लागोपाठ दुसऱ्या वर्षी अजिंक्यपद मिळविलें पण आंतरमहाविद्यालयीन डेव्हीड करंडक सामन्यांत आपल्या संघाचा पराभव झाला. हा सामना अतिशय चुरशीनें सहा दिवस खेळला गेला. आपल्या संघातील श्री. सदानंद मोहोळ यांनीं विद्यापीठाचे

गोलंदाजीचें प्राविण्यपदक मिळविलें. सर्वश्री हेमन्त गोरे, मुकुंद साठे, अनंत धामणे व सदानंद मोहोळ यांची विद्यापीठ–संघासाठीं व महाराष्ट्र–संघासाठीं (रणजी करंडक सामन्यासाठीं) निवड झाली. आपले स्कोअरर श्री. सदानंद कुलकर्णी यांची रणजी करंडक सामन्याचा वृत्तान्त ध्वनिक्षेपित करण्यासाठीं आकाशवाणीवर निवड झाली आहे.

क्रिकेट विभागांत यंदा पुढीलप्रमाणें बक्षिसें देण्यांत आलीं.

१. सर्वांगीण नैपुण्य–श्री. मुकुंद साठे.
२. उत्कृष्ट फलंदाजी–श्री. हेमचंद्र राणे.
३. उत्कृष्ट गोलंदाजी–श्री. सदानंद मोहोळ.
४. उत्कृष्ट क्षेत्ररक्षण–श्री. अनंत धामणे.
५. श्री. विश्वनाथ महाराज केसकर पारितोषिक–श्री. हेमचंद्र गोरे.

**भारतीय क्रीडा-विभाग**—सालाबादप्रमाणें या वर्षींहि आमचा हुतूतूचा संघ आंतरमहाविद्यालयीन सामन्यांत अजिंक्य ठरला. हा मान आपला संघ गेली चार वर्षे सारखा मिळवीत आहे. आट्यापाट्यांच्या संघानें उपविजेतेपद मिळविलें. खोखोच्या संघाचा मात्र दुर्दैवानें पराजय झाला. आमच्या हूतुतु संघांतील श्री. आर्. डी. पोळकर व हरिभाऊ जरांडे यांना मुंबई-राज्य संघातर्फे खेळण्याचा मान मिळाला आहे. श्री. हरीभाऊ जरांडे यांनीं तर ह्या संघाचे कर्णधारपदहि भूषविलें आहे. श्री. पोळकर व जरांडे यांची विद्यापीठ संघांत व इंडिया ऑलिम्पिकसाठीं मुंबईराज्य संघांत या वर्षी निवड झाली आहे. आमचे माजी विद्यार्थी श्री. सुरेश गुजराथी, वसंतराव जाधव व राया पटवर्धन यांचाहि मुंबईराज्य संघांत समावेश करण्यांत आला आहे. म्हणजे मुंबईराज्य संघांतील निम्मे खेळाडू आपल्या विद्यालयाचे आहेत. आपल्या खोखोच्या संघा-तील श्री. बंडू देखणे यांची विद्यापीठ संघांत निवड झाली.

**व्यायामशाळा**—या वर्षी आपल्या महाविद्या-लयाच्या या विभागानें जिम्नॅस्टिक चॅंपियनशिप मिळ-वून दिली. श्री. करमरकर हे सिंगलबार व डबलबार या दोन्ही स्पर्धांत पहिले आले. श्री. रानडे यांनीं सिंगलबारमध्यें दुसरा क्रमांक मिळविला. कुस्तींत श्री. उरसळ व श्री. कदम हे आपापल्या विभागांत अनुक्रमें विजयी व उपविजयी ठरले. वेटलिफ्टिंगमध्यें श्री. भट, व श्री. केतकर विजयी झाले. श्री. केतकर यांनीं तर नवीन उच्चांक प्रस्थापित केला. मुष्टियुद्धांत श्री. भोकरे त्यांच्या विभागांत विजयी ठरले व पुणें विद्यापीठसंघांत त्यांचा समावेश करण्यांत आला. 'श्रीपुणें' व 'श्रीअपोलो' या स्पर्धांत अनुक्रमें श्री. येवले व श्री. केतकर यांनीं उपविजेते पदाचा मान मिळविला. श्री. केतकर यांनीं 'श्रीकऱ्हाड' ही पदवीहि मिळविली व येवले 'श्रीपरशुरामीय' या स्पर्धेत पहिले आले. (आमचे माजी विद्यार्थी राजाभाऊ केळकर यांनीं चांगलीच मदत केली. त्यांचे आभार मानावे तेवढे थोडेच.) श्री. येवले यांनीं 'श्रीमुंबई' हाहि मान मिळविला.

**व्हॉलीबॉल व बास्केटबॉल**—या वर्षी या दोन्ही ढाली मिळवून आपल्या संघांनीं या खेळांतील आपल्या महाविद्यालयाच्या कीर्तींत भर घातली. पुणें विद्यापीठाच्या स्थापनेपासून या ढाली सर्वांत जास्त वेळां जिंकण्याचा मान आपल्या संघांनीं मिळविला आहे. हैद्राबाद येथें झालेल्या आंतरविद्यापीठ बॅस्केटबॉल सामन्यांत पुणें विद्यापीठसंघाचें नेतृत्व आपले संघनायक श्री. तळवळकर एस्. एल्. यांचेकडे होतें. त्या संघांत आपले खेळाडू सर्वश्री. पोफळे एस्. आर्., कुलकर्णी व्ही. एम्. व ढमढेरे ए. एम्. यांचाहि समावेश झाला होता. त्रिवेंद्रम येथें झालेल्या आंतर-विद्यापीठ व्हॉलीबॉल सामन्यांतून पुणें विद्यापीठ संघा-तर्फे खेळण्याचा मान सर्वश्री जगताप, कुंडलकर, शेख व तळवळकर यांनीं मिळविला.

**बॅडमिंटन व टेबल टेनिसः**— टेबल टेनिसच्या दुहेरी सामन्यांत श्री. पुत्तुर व श्री. कुलकर्णी यांनीं अजिंक्यपद मिळविलें. श्री. पुत्तुर यांची पुणें विद्यापीठ संघांत निवड झाली. त्यांनीं खडकी येथें झालेल्या खुल्या टेबल टेनिस सामन्यांत नॉन मेडॅलिस्ट विभागांत अजिंक्यपद मिळविलें. बॅडमिंटनच्या सामन्यांत आपल्या खेळाडूंनीं गतवर्षाच्या विजेत्या मेडिकल कॉलेज संघाचा पराभव करून उपविजेतेपद मिळविलें. याचें श्रेय सर्वश्री देव, दाते व गोरे यांना आहे. श्री. दाते यांनीं बी. आय्. जी. तर्फे झालेल्या सामन्यांत बी ग्रुपमध्यें अजिंक्यपद मिळविलें.

**पोहणें:—** श्री. ओक यांचा पराक्रम विशेष नमूद करण्यासारखा आहे. आंतर-विद्यापीठ सामन्यांत दोन वर्षे ओळीनें ते पाहिले आले आहेत.

**विद्यार्थिनी-विभाग :—** रिंग टेनिस विभागाचे, सर्वच्या सर्व गुण कु. शालिनी राजोपाध्ये, कु. रजनी कुलकर्णी, कु. मंगला खडे, व कु. सरला देहाडराय यांनी मिळविले व कौतुकास्पद कामगिरी केली. खोखो, नेटबॉल व हुतुतू या संघांनी उपविजेतेपद मिळविले. या संघांतून कु. लीला बाळ, कु. शामला कुलकर्णी, कु. मन्दा सवदी, कु. निर्मला नेर्लेकर, कु. वैजयन्ती पटवर्धन, कु. आशा चितळे, कु. विभावरी आपटे, व कु. कालिंदी भिडे यांचें कौशल्य कौतुकास्पद झालें. शेवटच्या चार विद्यार्थिनींची खोखोच्या आंतरविभागीय संघासाठीं निवड झाली. बॅडमिंटन मध्यें कु. मंदा नगरकर व कु. रजनी जोशी यांनीं उपविजेतें पद मिळविलें. कु. रजनी जोशी यांची विद्यापीठ संघांत निवड झाली. टेबल टेनिस सिंगल्स मध्यें कु. सुधा दामले यांनीं अजिंक्यपद मिळविलें; व डबल्समध्यें कु. सुधा दामले व कु. लीला देवधर यांनीं उपविजेतेपद मिळविलें. कु. कालिंदी भिडे, कु. सुमन भिडे, कु. आशा ढवळे व कु. आशा सवदी यांनीं मुंबईराज्य क्रीडा महोत्सवांत अजिंक्यपद मिळविणाऱ्या पुणें शहराच्या थ्रो बॉल संघांतून खेळण्याचा मान मिळविला. पुणें विद्यापीठ हॉकी संघांतून कु. आशा ढवळे, कु. लीला देवधर, कु. कालिन्दी भिडे, व कु. सुमन भिडे यांचा समावेश करण्यांत आला. कु. नीला कुंटे यांनीं महाराष्ट्र ॲथलेटिक्स फेडरेशनची १०० मीटर्स धांवण्याची शर्यत जिंकून फिरती ढाल मिळविली व पोहण्याच्या संघांतून कु. शैलजा दामले कु. विमल रानडे, कु. सुधा महाजन, कु. सौदामिनी जोशी व कु. प्रमिला पारकर यांनीं चांगली कामगिरी केली. या सर्व विद्यार्थिनींचें आम्ही अभिनंदन करतों.

| डॉ. आर्. व्ही. घाटे. | गिरिधर गुजराथी. |
|---|---|
| अध्यक्ष | सरचिटणीस |

---

# लो. टिळक स्मारक ग्रंथालय व वादविवाद सभा

१. लो. टिळक स्मारक ग्रंथालयांत आजवर इतिहास, राजकारण, समाजशास्त्र, व अर्थशास्त्र या विषयावरील ग्रंथच फक्त होते. चालू वर्षी **विज्ञान विभाग** नव्यानें सुरू करण्यांत आला.

ग्रंथालयाचा अधिकांत अधिक विद्यार्थ्यांना उपयोग करता यावा म्हणून आठवड्यांतील सर्व दिवस पुस्तकें नेण्यास व परत करण्यास सवलत दिली होती; त्याचा सुपरिणाम दिसून आला. गेल्या वर्षीपेक्षां विद्यार्थी-वाचकांची संख्या दुपटीनें वाढली.

२. अहवालाच्या वर्षी निबंध-स्पर्धा, वक्तृत्व-स्पर्धा व विविध विषयावरील परिसंवाद हे कार्यक्रम करण्यांत आले.

(क) लो. टिळक-पुण्यतिथि निमित्त 'भारतीय लोकशाहीचें भवितव्य', 'अरब राष्ट्रवाद' इ. विषयावर निबंध स्पर्धा घेण्यांत आली. त्यांत श्री. एकबोटे, इंटर आर्ट्स 'सी' यांना प्रथम क्रमांकाचें व सर्वश्री पुरंदरे एस्. एस्. (पी. डी. आर्टस सी) व वाळिंबे एस्. एस्. (ज्यू. बी. ए.) यांना दुसऱ्या क्रमांकाचें पारितोषिक मिळालें.

न्या. रानडे वक्तृत्व-स्पर्धेमध्यें श्री. शरद काळे ज्यू. बी. ए. यांना प्रशस्तिपत्र मिळालें.

(ख) वादसभेच्या कार्यांत विद्यार्थ्यांचाच भाग अधिक असावा अशी वादसभेची इच्छा होती. ती बऱ्याच अंशीं सफल झाली हें नमूद करण्यास आम्हांला संतोष वाटतो. पाहिल्या सहामाहींत प्रत्येक गुरुवारीं सायंकाळीं सर्व विद्यार्थ्यांना खुले असे विविध विषयांवरील वाद-विवाद व चर्चा घेण्यांत आल्या. दुसऱ्या सहामाहींत या कार्यांत वर्ग-संघटनांचें सहकार्य घेण्यांत आलें व कार्याचें विकेंद्रीकरण करण्यांत आलें. पदवीपूर्व साहित्य, व शास्त्र, द्वितीय वर्ष साहित्य व शास्त्र, तृतीय व चतुर्थ वर्ष साहित्य आणि शास्त्र असे सहा विभाग पाडून विभागशः वादस्पर्धा घेण्यांत आल्या. त्या

स्पर्धांची व्यवस्था, वादसभेच्या उपसमितीवरील त्या त्या वर्गांतील विद्यार्थि-प्रतिनिधींच्या साहाय्यानें ठेवली गेली. या स्पर्धांमधील पहिल्या व दुसऱ्या क्रमांकाच्या विद्यार्थ्यांना अनुक्रमें १० व ५ रु. अशी रोख पारितोषिकें ठेवण्यांत आलीं होतीं

हा उपक्रम अत्यंत यशस्वी झाला. यांत ४० च्या वर विद्यार्थ्यांनीं स्पर्धक म्हणून भाग घेतला. स्पर्धेचे विषय, विभागशः वेगळे होते. ' खरा समाजवाद कोण आणूं शकेल ? काँग्रेस, साम्यवादी का प्रजा समाजवादी ? ' व ' यंत्रामुळेंच मानवाची द्रुत प्रगति शक्य झाली ' हे विषय पदवीपूर्व साहित्य व शास्त्र या विभागासाठीं होते. ' जागतिक तेढ व अमेरिकेचे परराष्ट्रीय धोरण ' व ' आजचा विद्यार्थी आपल्या भवितव्याबद्दल उदासीन आहे ' हे विषय द्वितीय वर्षासाठीं आणि ' सहशिक्षणाची फलश्रुति ' व ' अणुशक्ति शाप कीं वरदान ' हे विषय तृतीय-चतुर्थ वर्षासाठीं नियुक्त केले होते.

या स्पर्धांत, श्री. गुजर एस्.आर्. व श्री. चाफेकर, ( पदवीपूर्व साहित्य; ) श्री. देशपांडे वि. भा. व श्री. वैद्य एस्. जे. व सौ. ज्योत्स्ना देवधर ( तृतीय व चतुर्थवर्ष साहित्य, ) श्री. वाघ व श्री. शहा ( पदवीपूर्व शास्त्र ) आणि श्री. बेंद्रे व कु. कुंदा कुलकर्णी, ( तृतीय व चतुर्थ वर्ष शास्त्र )—यांना अनुक्रमें प्रथम व द्वितीय क्रमाकांचीं पारितोषिकें मिळालीं.

या बरोबरच ' प्राचार्य दांडेकर कप ' वादस्पर्धा सर्व विद्यार्थ्यांच्यासाठीं आयत्या वेळच्या विषयावर घेण्यांत आली. त्यांत २० चेवर विद्यार्थ्यांनीं स्पर्धक म्हणून भाग घेतला. त्यांत श्री. शेठ पी. यू. ( ज्यू बी. ए. ) यांनीं पहिला क्रमांक मिळवून कप जिंकला.

( ग ) आपल्या महाविद्यालयांत अनेक अभ्यास मंडळें कार्य करीत आहेत. त्यांच्या सहकार्यानें त्या त्या शाखेतील विद्यार्थ्यांना एक एक विषय देऊन त्यावर परिसंवाद घडवून आणण्याचा उपक्रम गेल्या वर्षापासून सुरूं करण्यांत आला आहे. या उपक्रमानुसार याही ' वर्षी मराठी व तत्त्वज्ञान मंडळाच्या सहकार्यानें ' ज्ञानेश्वर, तत्त्वज्ञान व वाङ्मय ' या विषयावर प्रा. गं. बा. सरदार यांचें अध्यक्षतेखालीं परिसंवाद घेण्यांत आला. यांत कु. निर्मला पेंडसे, सर्वश्री आगाशे, बर्वे, व पूरकर या विद्यार्थ्यांनीं निबंध सादर केले. अर्थशास्त्र, राज्यशास्त्र, तत्त्वज्ञान या विभागांतील विद्यार्थ्यांनीं ' संयुक्त राष्ट्र व मानवी हक्कदिन ' या विषयवार परिसंवाद सादर केला. अध्यक्षस्थानीं प्रा. रा. म. गोखले होते. तिसरा परिसंवाद 'क्रांति' या विषयावर इतिहास विभागाच्या सहकार्यानें झाला. यांत सर्वश्री शरद काळे, कामत, व रवींद्र कुलकर्णी यांनीं निबंध सादर केले. अध्यक्ष म्हणून पुणें विद्यापीठाच्या राज्यशास्त्र विभागाचे प्रा. डॉ. एन्. आर्. देशपांडे उपस्थित होते.

वरील परिसंवादांतील सर्वच निबंध अभ्यासपूर्ण होते व त्याचा दर्जा उंच होता. प्रा. देशपांडे यांनीं यासाठीं विद्यार्थ्यांचें जाहीर कौतुकहि केलें.

' परिसंवाद ' या उपक्रमानें महाविद्यालयाच्या विद्यार्थी-जीवनांत चांगलेंच मूळ धरलें असून वर्ग संघटनांच्या विद्यमानें वर्गशःहि आतां परिसंवाद होत आहेत याबद्दल वादसभेला अतिशय समाधान वाटत आहे.

वादसभेच्या विविध उपक्रमात अनेक प्राध्यापकांचे मार्गदर्शक, व परीक्षक म्हणून साहाय्य झालें. त्या सर्वांचे आम्ही ऋणी आहोंत. त्याचप्रमाणें ज्या अनेक विद्यार्थ्यांनीं या सर्व उपक्रमांत सक्रिय भाग घेतला (या विद्यार्थ्यांची संख्या ८० चे वर होती) त्या सर्वांची वादसभा आभारी आहे. हें सहकार्य सातत्यानें मिळावें अशी विनंति आहे.

**प्रा. दि. ब. केरूर**
विभाग-प्रमुख

**दा. रा. गोळे**
कार्यवाह

# कला-मंडळ

अत्यंत उत्साहाच्या भरांतच यंदाच्या कला मंडळाचा प्रारंभ झाला. यावर्षी असलेली सभासद संख्या ही कला-मंडळाच्या आतांपर्यंतच्या इतिहासांतील सर्वात जास्त संख्या आहे हें त्या उत्साहाचें प्रतीक आहे. सभासद संख्या जवळ जवळ पांचशें आहे. या वर्षीचा उद्घाटनाचा कार्यक्रम श्रीमती रोहिणी भाटे यांच्या नेत्र-दीपक नृत्यानें झाला. प्रा. हुल्याळकर ह्यांना 'शुभास्ते पंथानः' करण्याची गोड संधि कला-मंडळाला याचवेळीं मिळाली याबद्दल आम्हाला अभिमान वाटतो.

दुसरा कार्यक्रम श्री. भीमसेन जोशी यांच्या शास्त्रोक्त गायनाचा होता. तिसरा कार्यक्रम फारच गाजला आणि तो म्हणजे सौ. माणिक वर्मा यांचें गायन. चौथा कार्यक्रम झाला तो विविध-गुण-दर्शनाचा. या मध्यें बऱ्याच विद्यार्थी-विद्यार्थिनींनीं भाग घेतला होता. 'मी फोटो काढतों' ही एकांकिका हें या कार्यक्रमाचें वैशिष्ट्य होतें. युवक महोत्सवाच्या स्पर्धेतील नाटिका, समूह-नृत्य, समूह गीत यांच्यासाठीं कु. प्रा. शालिनी पेंढारकर, श्री. आप्पा पटवर्धन व श्री. विजय गोखले ह्यांनीं फारच श्रम घेतले होते आणि याचमुळें आपल्या कॉलेजची नाटिका, 'बदामराणी व चौकट गुलाम' व समूह-नृत्य आंतरविद्यापीठ युवक-महोत्सवासाठीं निवडलें गेलें.

पुणें विद्यापीठ युवक-महोत्सवांतील एकूण सात बक्षिसांपैकीं पांच आपल्याला मिळालीं ही अभिमानाची गोष्ट आहे. नाटिकेमध्यें श्री. कुवाडेकर यांना पहिलें पारितोषिक व कु. विजया बर्वे यांना दुसऱ्या क्रमांकाचे पारितोषिक मिळालें व गायनाबद्दल श्री. पटवर्धन व कु. देशपांडे यांना व नृत्याचें कु. शीला परांजपे यांना मिळालें. या सर्वांवर कळस चढला तो दिल्लीला आपल्या नाटिकेला बक्षिस मिळाल्यावर. या आनंदांत पहिली सहामाही संपली. दुसऱ्या सहामाहींत 'तुझें आहे तुजपाशीं' या नाटकाचा एक प्रयोग आम्ही सादर केला. श्री. सरपोतदार यांची काकाजींची भूमिका बहारदार झाली, आणि तो प्रयोग इतका सुंदर वठला कीं त्याचा दुसरा प्रयोग आम्हीं गरीब विद्यार्थी-निधी साठीं सादर केला व त्याचे खर्च वजा जातां झालेलें उत्पन्न १५१ रु. निधीला दिलें. यंदा कलामंडळाला आणखी एक विजय मिळाला. दरवर्षी येथील रोटरी क्लबतर्फे आन्तर-महाविद्यालयीन नाट्यस्पर्धा घेण्यांत येतात. या स्पर्धेतील नैपुण्याबद्दलची ढाल आपल्याला मिळाली व श्री. सुभाष गोडबोले यांना वैयक्तिक पहिलें बक्षिस मिळालें.

---

# मराठी वाङ्मय-मंडळ

या वर्षी पहिला उद्घाटनाचा कार्यक्रम पंडित महादेवशास्त्री जोशी यांच्या हस्तें झाला. त्यांनीं नव साहित्यिकांना बहुमोल असा उपदेश केला. त्यानंतर साहित्यचर्चा, व्याख्यानें, नाट्यवाचन, कविसंमेलन इ. अनेक उद्बोधक व मनोरंजक कार्यक्रम वर्षभर चालू होते.

(१) साहित्यचर्चा-१७ जुलै १९५८-चर्चेचा विषय-कथा-श्री. न. म. जोशी, कविता-श्री. रवीन्द्र सुर्वे. अध्यक्ष-श्री. गोपीनाथ तळवलकर. वक्ते-सर्वश्री शरद घाटे, पूरकर, वि. भा. देशपांडे, व सौ. ज्योत्स्ना देवधर. (२) साहित्यचर्चा-२४ जुलै १९५८-विषय-कथा-श्री. वि. भा. देशपांडे, कविता-श्री. रवीन्द्र भट. अध्यक्ष-सौ. संजीवनी मराठे. वक्ते-सर्वश्री पूरकर, न. म. जोशी, कुलकर्णी, हलदुले, वैद्य. (३) नाट्यवाचन-२४ ऑगस्ट ५८. उद्याचा संसार-आचार्य अत्रे. नाट्यवाचक-सर्वश्री रवीन्द्र सुर्वे, न. म. जोशी, जयश्री नेने, मंगला भिडे, सुधा गोखले, वि. भा. देशपांडे, विश्वास मेहेन्दळे. (४) सहल-चिंचवड, श्री. शरद् घाटे यांचे जागेत. (५) कविसंमेलन-कवि सर्वश्री सूर्यकान्त वैद्य, मंजुळा साठे, रवीन्द्र सुर्वे, व कु. श्यामला दीक्षित. (६) कालिदास जयन्ती-२७ नोव्हेंबर ५८-अध्यक्ष डॉ. के. ना. वाटवे. वक्ते-सर्वश्री

वा. का. क्षीरसागर, र. श्री. कुळकर्णी, अशोक अकलूजकर. या तिघांचीं भाषणें संस्कृतांतून झालीं. कु. ललिता फणसळकर मराठींतून बोलल्या. डॉ. वाटवे यांनीं कालिदासाचें काव्य म्हणजे भारतीय संस्कृतीचें प्रतिबिंब असा उद्बोधक विचार सांगून समारोप केला. (७) कै. प्रा. श्री. म. माटे यांचा स्मृतिदिन-९ डिसेंबर ५८. प्रा. माटे यांचे निबंध–माझ्या राजेश्वरा, मार्गे पडलेला वैरागी, गिरिजन आणि परिजन, आजची गीता अपूर्ण आहे. यावर श्री. शरद काळे, कु. रानडे, श्री. पटवर्धन व कु. अलका आगाशे या विद्यार्थ्यांनीं चर्चा केली. अध्यक्ष प्रा. चंद्रकुमार डांगे यांनींहि गु. माटे यांना श्रद्धांजलि वाहिली. (८) साहित्यचर्चा-१८ डिसें. १९५८. श्री. सूर्यकान्त वैद्य (कवि दत्तकुमार) यांच्या १० कवितांवर चर्चा झाली. अध्यक्ष डॉ. प्र. न. जोशी. (९) डॉ. के. ना. वाटवे यांचें भाषण. १६ जाने. ५९. विषय–सावरकरांचें काव्य. सावरकरांची प्रतिभा महाकवीची आहे हें डॉ. वाटवे यांनीं साधार-सप्रमाण दाखवून दिलें. (१०) साहित्यचर्चा विषय–श्री. शरद् घाटे यांचा निबंध 'मराठी लघुकथेचा विकास' अध्यक्ष प्रा. हे. वि. इनामदार. वक्ते–सर्वश्री सुरेश हलदुले. वि. भा. देशपांडे, श्री. पूरकर, श्री. सुर्वे. (११) साहित्यचर्चा–विषय–लघुकथा. लेखक श्री. पूरकर. अध्यक्ष प्रा. ग. प्र. प्रधान. सुमारें सोळा विद्यार्थ्यांनीं चर्चेंत भाग घेतला.

आमचे प्राध्यापक व अनेक सहकारी यांनीं आम्हांला जें साह्य केलें त्यामुळेंच आमचे कार्यक्रम यशस्वी झाले. आम्ही या सर्वांचे आभारी आहों.

डॉ. पु. ग. सहस्रबुद्धे.
अध्यक्ष

रवीन्द्र सुर्वे, अलका आगाशे.
चिटणीस

---

## अर्थशास्त्र–मंडळ

कार्यक्रम (१) व्याख्यान:– प्रा. मावळणकर यांचें *National Planning–राष्ट्रीय नियोजन–या विषयावर* व्याख्यान झालें. नियोजनाची आवश्यकता, त्यापासून फायदे वा तोटे; भारतासारख्या अप्रगत राष्ट्रास नियोजनाची आवश्यकता इ. प्रश्नांची व्याख्यात्यांनीं उद्बोधक चर्चा केली.

(२) निबंध वाचन:– प्रा. नामजोशी, प्रा. कानिटकर, प्रा. मुकर्जी यांचे Post war Inflation in India या विषयावर निबंध-वाचन झालें. त्यांनीं विद्यार्थ्यांच्या सर्व शंकांचें निरसन केलें.

(३) सहल:– कार्ल्याचीं लेणीं.

प्रा. रा. म. गोखले. — अध्यक्ष

ज. ल. जगताप — चिटणीस

---

## तत्त्वज्ञान–मंडळ

### विद्यार्थ्यांनीं वाचलेले निबंध—

(१) श्री. वाडीकर Socrates, the man and his Misson. (२) कु. राळे व कु. भाजेकर–The Method of Introspection. (३) कु. श्यामला आगाशे–Primitive Morality. (४) कु. निर्मला पेंडसे–*Suggestion in Social life.*

### मंडळातर्फे झालेल्या चर्चा, प्रवर्तक : प्रा. कावळे–

(1) Pragmatism. (2) Contemporary Schools in Psychology. (3) Monism. (4) The Problem of Matter.

### इतर मंडळांत विद्यार्थ्यांनीं वाचलेले निबंध—

(१) मराठी वाङ्मय मंडळ व वादसभा–कु. निर्मला पेंडसे–ज्ञानेश्वरींतील तत्त्वज्ञान. (२) राज्यशास्त्र मंडळ

व वादसभा—कु. श्यामला आगाशे—Human Rights —their Ethical Basis.

### साळवेकर निबंध स्पर्धा

या स्पर्धेत कु. आगाशे व कु. पेंडसे यांनी अनुक्रमें ' Pragmatism as a Philosophy of Life ' व ' The Nature of Mind ' या विषयावर निबंध लिहून भाग घेतला आहे.

### इतर कार्यक्रम

१. बी. ए. परीक्षेत प्रथम श्रेणी व प्राचार्य दांडेकर शिष्यवृत्ति मिळविल्याबद्दल श्री. एस्. आर. तलघट्टी यांचें व एम्. ए. परीक्षेत डॉ. राधाकृष्णन् पारितोषिक मिळविल्याबद्दल श्री. जयंत सातपुते यांचें व सर्व उत्तीर्ण विद्यार्थ्यांचें अभिनंदन.

२. उपप्राचार्य हुल्याळकर, प्रा. दामले व प्रा. कोठुरकर यांच्या शैक्षणिक कार्यासाठीं होणाऱ्या परदेश गमनाबद्दल शुभेच्छा व्यक्त करण्यासाठीं झालेला सभारंभ.

३. प्राचार्य प्र. रा. दामले यांच्या अध्यक्षतेखालीं तिळगूळ-समारंभ. प्राचार्य दामले यांचें 'सुभाषित' या विषयावर बोधप्रद व्याख्यान.

४. चिंचवड येथें सहल.

प्रा. श्री. र. कावळे<br>अध्यक्ष

निर्मला पेंडसे, डी. आर. वाडीकर.<br>चिटणीस

## तर्कशास्त्र–मंडळ

तर्कशास्त्र मंडळानें साधारणपणें पंधरवड्यांतून एक अशा सभा घेऊन विद्यार्थ्यांकडून तर्कशास्त्रा-वरील महत्त्वाचे प्रश्न लिहून घेतले. प्रा. कावळे व प्रा. लीला गोळे यांनीं ते प्रश्न तपासून मंडळांत विविध प्रश्नांची चर्चा केली. तसेंच तर्कशास्त्रांतील प्रात्यक्षिक उदाहरणांचीहि तयारी करून घेण्यांत आली. सुमारें ७० विद्यार्थी या मंडळाच्या कामांत सहभागी होत असत.

प्रा. श्री. र. कावळे.<br>अध्यक्ष

उषा चितळे, अशोक दातार, अरुण अभ्यंकर.<br>चिटणीस

## C ' Company, 2nd Bombay Bn N. C. C.

**The Muster Parade**:–25th June 1958. our allotted Strength. 151.

**Promotions**-Sgt. Kashid K.A. was promoted to be the Under officer and he was asked to act as CSM of the Company.

**Combined Social Service and Cadre Camp** of No. 1 Circle. Place Goregaon Bombay–26th Oct. to 9th Nov. 58. 42 cadets of our Company participated .

**Guard of Honour**-(1) Presented to Justice Chagala-Sept. 1958. 11 Cadets participated. (2) Presented to Dr. Radhakrishnan the Vice President of India–Nov. 1958. 17 Cadets participated.

**N. C. C. Week**—Flag March 3-12-1958 Combined Ceremonial Parade 7-12-1958. Capt. Gaidhani acted as the parade Adjutant.

The Combined Flag day March 5th Dec. 1958. Our Company represented the Bn.

The miniature range firing of recruits was completed in Sept. 1958. The Annual Range Classification of the trained cadets took place at the Police Range in Sept. 1958. The recruits completed their Annual

Range Classification in the Annual Training Camp at Aurangabad. In the Best shot recruits competition Cdt. Ramgade of this Coy. stood second and was awarded a Bn. Prize.

A unique and memorable event of the year was the visit of Lt. Gen. S. P. P. Thorat, one of our alumni, to this Coy. On 30th Nov. 1958 at a Ceremonial Parade he inspected our cadets and took the salute. He expressed great satisfaction at the drill and turn out of our cadets.

Lt. D. V. Kulkarni was promoted to Captaincy in Nov. 58 with effect from 31st July 1958.

The Annual Training Camp was held at Aurangabad from 23rd Dec. 1958 to 5th Jan. 1959. Two officers and 140 cadets attended the Camp. In attendance we ranked first in the Bn.

Capt. Gaidhani was appointed as the Adjt. of the Camp, and for the first four days he also officiated as the second in Command of the Unit. He also shouldered the responsibility of the Unit Sports Officer. Capt. Kulkarni officiated as the O.C. of our Coy.

Training in camp was centrally organised. Recruits had the opportunity to carry out Annual Range Classification in Camp. A noteworthy feature of the Camp was the training-cum-pleasure excursions to the world famous paintings at Ajanta, the monumental Kailas at Ellora, the historical fort of Deogiri and other historical places in the vicinity.

In sports our Coy. did well. Cadets H. K. Bilgd, S. N. Nimbalkar and A. B. Kadam were winners in wrestling in their respective weights. U/O Kashid and Cdt. R. K. Kate were runners up. Cadet S. N. Nimbalkar won the Yauraj of Miraj first Wrestling Mace in welter weight. Cdt. A. B. Kadam won the Yauraj of Miraj second wrestling Mace in middle weight. Our Coy. was declared the best wrestling Coy. for the year.

In Boxing Cdt. R. V. Bhokare, Cdt. Mamdapurkar, Cdt. S. N. Nimbalkar and Cdt. A. B. Kadam were champions in fly weight, Bantam weight, welter weight and middle weight respectively. Cdt. Hunde K. R. and Cdt. Jadhav L. P. were runners up. Cdt. R. V. Bhokare was the recipient of the Champion Boxing Belt. Our Coy. was declared the best Boxing Coy. of the year. In Hockey we were runners up. In the Cross Country Race U/O Kashid K. A. came third in the Bn. PL. No. 7 qualified in the race. In Line dressing, we maintained second place throughout the Camp. In platoon Drill and guard mounting we were ranked third.

No examinations were held in the Camp. In the last examination the results of which were announced in March last, Sgt. Gune K. B. from this Coy. topped the list of successful candidates in 'C' Certificate. He was awarded the Bhor Gold Medal. He graduated from our college in April last. He appeared before the services selection Board and was selected for the 11th N. C. C. Graduate Commission Course at Dehradun. We heartily congratulate him on his brilliant success and wish him a prosperous career in the Indian Army. L/Cpl. A. V. Mandke and Cdt. Shintre have appeared for the NDA Examination. Their results are awaited.

I record my sincere thanks to Prin. Bhide, The College Gymkhana authorities and our Coy. officers for their advice and kind help.

U/O K. A. Kashid.

# Ist Bombay Armoured Squadron, N. C. C.

# No. 2 Troop, S. P. College

## Annual Report 1958-1959

**Enrolment**:-We started our work with the muster parade on 24th June 1958. Out of the 200 students who turned up for the parade, 60 were selected.

**Promotions**:-On the 20th of July 1958, promotions for the year were declared on the basis of promotion test. Main promotions were:-(1) Sgt. Joshi P. P. to U/O and (2) Cpl. Date M. L. to U/O.

**Cadre Camp**:-Cadre camp was held at Karla from 17-10-58 to 29-10-58. 23 Cadets of this troop attended the camp. In the camp, out door demonstrations, Night march, Exercises on sand model, and Driving practice of Armoured Cars were the interesting features. Capt. S. R. Deshpande was the only N. C. C. officer who worked both as Training Officer and Admin. officer in the Camp.

**Social Service Camp**:-6th combined Social and Cadre camp of 1st Circle of N. C. C. was held at Arey Milk Colony, Goregaon, from 26th October 1958 to 8th November 1958. 32 Cadets of this troop attended the camp.

**Guard of Honour**:-30 Cadets of this troop and 2 Armoured Cars participated in the cerimonial parade when Lt. Gen. S. P. P. Thorat, G. O. C. in C, Eastern Command took the Salute. Capt. S. R. Deshpande was the parade commander.

**N. C. C. Week**:-From 1st December 1958 to 7th Dec. 1958 the N. C. C. Week was celebrated. Route-march, Flag-march Inter-Unit sports were the high lights of the programme. Ceremonial parade was held on 7th December 1958.

**Annual Camp**:-Annual camp was held in the famous Ahemadnagar fort from 24th December 1958 to 6th January 1959. The training programme included many demonstrations such as (1) Different types of A. F. Vs. (2) Firing by tanks and their cross country performance. (3) Fire and movement (4) Infantry weapons and their capabilities.

**Annual Sports**:-Amongst the Sports held in the camp, we won in Volley Ball for two years in succession & Hututu for five years in succession. In athletics Cdt. Ashtekar A. N. (who is also best cadet of the squadron) won many prizes.

**B & C Certificate Examinations**:-17 and 4 Cadets had appeared for 'B' & 'C' certificate examinations resp. Out of them 12 and 3 were declared successful in 'B' and 'C' certificate, and the results were 70·58% & 75% for 'B' & 'C' certificate respectively. Sgt. Patil S. D. stood first in the squadron in B certificate examination.

**Inter-troop Competition**:-We bagged the trophy for best troop in discipline for the 11th year in succession. We also won the trophy presented newly by Brig. Jang Samsher Singh on behalf of Armoured Corp Centre and School, for best troop.

I am very greatful to Principal B. V. Bhide for his encouragement and to Captain P. S. Belvalkar, our O. C. and his army staff for all possible help through out the year. I also thank all our friends and well wishers whose invaluable help enabled us to achieve this stage.

Under Officer M. L. Date

# शारीरिक शिक्षण विभाग, सर परशुरामभाऊ महाविद्यालय, पुणें

दरवर्षी प्रमाणें ९ जून रोजीं गटप्रमुख शिक्षण-वर्ग सुरू करण्यांत आला. सुमारें ३५ विद्यार्थी या वर्गाला येत होते. दि. २० जून १९५८ रोजीं विद्यार्थीनींचा वर्गहि सुरू करण्यांत आला. तीन चांचणी परीक्षा घेतल्यानंतर गटप्रमुख म्हणून २१ विद्यार्थी व १८ विद्यार्थीनींची निवड करण्यांत आली. श्री. पी. डी. आपटे व कु. ललिता जोशी हे वर्गात पहिले आले.

दि. ७ जुलै १९५८ रोजीं प्रथम व द्वितीय वर्ष विद्यार्थी-विद्यार्थीनींचे शारीरिक शिक्षणाचे तास सुरू झाले. प्रभात विभाग व सायंविभागाचे प्रमुख म्हणून पुढील नेमणुका झाल्या.

प्रभात विभाग प्रमुख-सर्वश्री (१) तळवलकर र. ल. (२) लेले ए. जी. (३) देशपांडे आर्. के. (४) कु. कला गुपचुप.

सायंविभागः—(१) गोखले एस्. जी. (२) कु. द्राविड उषा.

खेळ विभागः—(१) चाफेकर एस्. व्ही.

१५ ऑगस्ट १९५८ चा ध्वजवंदन व प्रतिज्ञा वाचनाचा कार्यक्रम प्राचार्य भिडे यांच्या अध्यक्षतेखालीं पार पडला. श्री. तळवलकर व श्री. लेले यांनीं या कार्यक्रमाची आंखणी व नेतृत्व केलें. २६ जानेवारी १९५९ चा प्रजासत्ताक-दिनहि थाटानें साजरा झाला. शि. प्र. मंडळीतील सर्व विद्यार्थ्यांचा मेळावा २९-११-५८ ला आपले मैदानावर फार चांगल्या प्रकारें साजरा झाला. दरवर्षीप्रमाणें आंतर-गट सामने मोठ्या उत्साहानें पार पडले. त्यांचे निकाल खालील प्रमाणें :

(१) सर्वसाधारण नैपुण्यः—पदवीपूर्व गट क्र. ७. इंटर वर्ग गट क्र. ६. गट प्रमुख : फडके जनार्दन.

(२) बलविकास व कवायतः—पदवीपूर्व गट क्र. ७ व ९. इंटर वर्ग गट क्र. ८. गटप्रमुख : आपटे व्ही. के.

(३) खेळः—पदवीपूर्व गट क्र. ७. इंटर वर्ग गट क्र. ६. गटप्रमुख : फडके जनार्दन.

सायंविभागः—

(१) सर्वसाधारण नैपुण्यः-ग. क्र. २ : प्रमुख शहा ए. एम्.
बलविकास खेळ वगैरे : ग. क्र. प्रमुख शहा ए. एम्.

भ. रा. जोशी
शारीरिक शिक्षण प्रमुख.

---

# वर्गसंघटना.

पुढें दिलेल्या भिन्न भिन्न वर्गांच्या अहवालावरून वर्गसंघटनेचें उद्दिष्ट कसें सफल होत आहे तें ध्यानीं येईल. प्रत्येक वर्गाची स्वतंत्र संघटना झाल्यामुळें वर्ग हा एकांक बनला व जितके वर्ग तितक्या पटीनें विद्यार्थ्यांच्या गुणविकासाला अवसर मिळाला. सर्व महाविद्यालयांत विस्तारातिशयामुळें जें स्थान विद्यार्थ्यांना मिळत नाहीं तें वर्गाच्या लहानशा परिसरांत निश्चित मिळतें आणि यामुळेंच वर्गांत सामूहिक जीवन निर्माण होतें. कांहीं वर्गांचे यावर्षी अहवाल मुळींच आले नाहींत. पुढील वर्षी अहवाल देण्याजोगें काम ते करतील अशी आशा आहे.

(१) वर्गशिक्षक—प्रा. पां. श्री. धारे वर्ग—पी. डी. आर्टस्.ए. वर्गचिटणीस—श्री. अ. वि. फुले, कु. पुष्पा वाडदेकर

### वादसभा व अभ्यासमंडळ

'स्त्रियांना वेगळें शिक्षण द्यावें काय ?'' यावर चर्चा

वक्तृत्वस्पर्धा—सुलभा मराठे, वीणा धाणेकर, सुनंदा चाफळकर. सुनंदा ओझरकर.

### क्रीडा-बलविकास

रिंग टेनिस व कॅरम यांचें गटागटांतून सामने.

### करमणूक, कला

कु. शोभा जोशी ( फोक डान्स ) कु. बिंबा डांगे ( गायन ) कु. उषा गाडगीळ ( गायन )
सहल—खोपोली अजंठा, वेरूळ, औरंगाबाद.

(२) वर्ग शिक्षक प्रा. दि. ब. केरूर. वर्ग–पी. डी. आर्टस् बी. चिटणीस–श्री. अरुण शहा. कु. कुमुद लिमये

### वादसभा व अभ्यासमंडळ

दर सोमवारीं तिसऱ्या तासास वक्तृत्व सभा–विषय ( १ ) शिक्षणाचें माध्यम ( २ ) शिक्षण व कर्तृत्व यांचा संबंध ( ३ ) आपली वर्गसंघटना ( ४ ) नियोजन दिन ( माहिती ) ( ५ ) जीवनांत श्रद्धेला स्थान असावें कीं नसावें ? दर बुधवारी तिसऱ्या तासांस प्रश्नोत्तर वाचनाचा कार्यक्रम. विद्यार्थी श्री. गुजर पी. डी. मध्यें उत्कृष्ट वक्ता म्हणून निवड. नीला बर्वे ( ओपन मेरिट स्कॉलरशिप )

### क्रीडा-बलविकास इ.

टेबल टेनिस, बॅडमिंटन, रिंग टेनिस, कॅरम चे वर्गीय सामने घेण्यांत आले. ( १ ) चंद्रकांत पोळकर ( २ ) हरि जराडे ( हुतुतूसाठीं विद्यापीठानें निवडले ) व (आतर प्रांतीयसाठीं) (३) कोंढरे (क्रॉस कंट्रीमध्यें) दुसरा क्रमांक (४) देरेकर भास्कर, साने सुरेश व कापसे संभाजी, क्रिकेट (५)पी.टी. इन्स्ट्रक्टर्स. श्री.अरुण शहा, कु. नरवणे सरोज, कु. खेर उषा, कु. रानडे जयश्री, कु. कर्वे उषा, कु. कमलापूरकर

### करमणूक व कला

श्री. गायकवाड, कु. रानडे जयश्री, कु. नरवणे सरोज ( दिल्ली युवक महोत्सवासाठीं निवड ) 'माणदेशीं माणसें' हा संमेलनांत वर्गातर्फे कार्यक्रम. श्री. पाटील व श्री. कुलकर्णी ( संमेलनांत उत्तम कार्यक्रम ) *शहा अरुण ( संमेलन प्रमुख ) लिमये कुमुद ( विविध* गुणदर्शन प्रमुख ).

---

(३) वर्ग शिक्षक–प्रा. व. रा. फडणीस. वर्ग–पी. डी. आर्टस् सी. वर्ग चिटणीस–श्री. शरद अवस्थी, कु. मीनाक्षी पिटकर

### वादसभा व अभ्यासमंडळ

श्री. र. श्री. कुलकर्णी ( १ ) कालिदास जयंतीचें दिवशीं कालिदास चरित्रावर भाषण. (२) ' क्रांतीची कल्पना' सेमिनारमध्यें भाग. श्री. अशोक अकलूजकर कालिदास चरित्रावर भाषण. १५ ऑगस्ट रोजीं निबंध वाचन. श्री. रवींद्र कुलकर्णी शालांत परीक्षेत सर्वप्रथम. शिष्यवृत्त्या–पदकें. ( २ ) निबंध स्पर्धेत प्रथम क्रमांकाचें बक्षीस. श्री. अशोक अकलूजकर– जगन्नाथ शंकरशेठ शिष्यवृत्ति.

### क्रीडा, बलविकास इ.

श्री. शरद व सुभाष अवस्थी N. C. C. पदक.

### करमणूक, कला इ.

कु. शैलजा आपटे ( भावगीत ) श्री. अवस्थी शरद व सुभाष–उत्कृष्ट विविध मनोरंजनाचे कार्यक्रम, स्नेहसंमेलन सहकारी. सहल–लोणावळा व खंडाळा.

---

(४) वर्ग शिक्षक–प्रा. द. वि. कुळकर्णी. वर्ग–इंटर आर्टस् ए. वर्ग चिटणीस–कु. विमल देशमुख.

### वादसभा, अभ्यास-मंडळ

(१) परिसंवाद–' आजचे कॉलेजचे विद्यार्थी बिघडले आहेत काय ? ' ( २ ) इंटर आर्टस् वादस्पर्धा ( कु. विमल देशमुख ) ( ३ ) सहामाहींत पहिलावर्ग–कु. मंदा जातेगांवकर; कु. विमल देशमुख.

### क्रीडा–बलविकास इ.

( १ ) धावणें, क्रॉस कंट्री. श्री देखणे. ( २ ) क्रिकेट– श्री. गोरे, श्री. घामणे. ( ३ ) आट्यापाट्या श्री. पूरकर. ( ४ ) भालाफेंक– कु. सहस्रबुद्धे. ( ५ ) खो खो– श्री. बापट, श्री. पूरकर, श्री. देखणे. ( ६ )

खो खो– कु. चितळे. (७) हुतूतू–कु. देशमुख, कु. मोडक, कु. जातेगावकर.

**करमणूक, कला इ.**

(१) संमेलन— फॅन्सी ड्रेस श्री. किराड. श्री. वेर्णेकर. (२) संमेलन–नाटक विभाग प्रमुख. श्री. किराड. (३) संमेलन–विविधरंजन. गायन. कु. काळे. (४) संमेलन–वेषभूषा आणि रंगकाम श्री. नाईक (५) काव्य–संक्रमण आणि आमचा वर्ग. कु. रोडे. (६) कविता–गायन कु. विमल देशमुख. (७) नाटक–श्री. सरपोतदार. सहल–खडकवासला.

---

(५) वर्ग शिक्षक–प्रा. रं. ना. गायधनी. वर्ग–इंटर आर्टस् बी. चिटणीस–श्री. सुभाष प्रधान.

**वादसभा व अभ्यास मंडळ**

(१) वर्गसंघटना उद्‌घाटन अध्यक्ष डॉ. प्र. न. जोशी, चर्चा–' आजचा महाविद्यालयीन विद्यार्थी ' वक्ते–कु. नलिनी सहस्रबुद्धे, कु. भावे, श्री. भट, श्री. देशपांडे, श्री. माने, श्री. अभ्यंकर.

(२) प्राध्यापक परिसंवाद–विषय–'आजचा महाविद्यालयीन विद्यार्थी बेजबाबदार आहे काय ? '–वक्ते. प्रा. कावळे, प्रा. डी. व्ही. कुलकर्णी, प्रा. गायधनी, प्रा. कुमुद पोरे, प्रा. सरोज कुलकर्णी; इंटरआर्टस्‌चा उत्तम वक्ता म्हणून श्री. वि. भा देशपांडे यांची निवड

**क्रीडा, बलविकास इ.**

(१) आंतरमहाविद्यालयीन कुस्त्या–श्री. कदम १५९ पौंडाखालीं उपविजेतेपद–N. C. C. १५९ पौंडाखालीं अजिंक्य (२) आंतरमहाविद्यालयीन क्रिकेट–श्री. पुरंदरे व श्री. मोहोळ; (३) आंतरविद्यापीठ व रणजीट्रॉफी–श्री. सदानंद मोहोळ. क्रिकेट लीग सामन्यांत उत्कृष्ट गोलंदाज म्हणून विजयमर्चंट यांचे हस्तें पारितोषिक.

**करमणूक, कला इ.**

(१) दिल्ली युवक महोत्सव–एकअंकी नाटिका–' बदाम राणी चौकट गुलाम '. नाटिकेंत श्री. रवीन्द्र भट व कु. विजया बर्वे यांच्या भूमिका–(२) लोकनृत्य–कु. जयश्री नेने, कु. शोभा कारखानीस व कु. वत्सला काळे. (३) शास्त्रोक्त संगीत, कु. विमल देशपांडे. (४) स्नेहसंमेलन–' दोन शून्यें व दोन '–भूमिका, कु. विजया बर्वे. कु. शशिकला वाळिंबे, श्री. शरद् गोखले व श्री. भट. दिग्दर्शन श्री. भट; ' माझें घर ' नाटकांत श्री. अरविंन्द फडके व कु. सुधा गोखले; विविधगुणदर्शन–श्री. राम जोशी, श्री. अकबरअली, कु. विजया दातार ( बुलबुलतरंग ) कु. सुलेखा जोशी ( भावगीत ), गौतमबुद्ध जीवनदर्शन–श्री. शरद गोखले.

---

(६) वर्ग शिक्षक–प्रा. श्री. र. कावळे. वर्ग–इंटर आर्टस् सी. चिटणीस–श्री. दा. पाटील.

**वादसभा–अभ्यास मंडळ**

प्रा. कावळे यांचें व्याख्यान : 'अभ्यासांतील पथ्य व अनुपान '. वक्तृत्व अशोक दातार, एकबोटे, कामत.

**कला, करमणूक**

श्री. दा. पाटील, संमेलनाचे जनरल सेक्रेटरी, माधव वझे, विद्याधर पंडित.

---

(७) वर्ग शिक्षक–प्रा. बी. जी. जोशी. वर्ग–पी. डी. सायन्स बी. चिटणीस–श्री. पोफळे श्री. र.

### वादसभा व अभ्यासमंडळ

( १ ) " आजकालचे विद्यार्थी बेशिस्त झाले आहेत काय ? " यावर वादविवाद. (२) वादस्पर्धा "यंत्रानें मानवाची प्रगति केली आहे." यांत वाघ टी. ए. यांस पहिला क्रमांक.

### क्रीडा व बलविकास

आंतरवर्गीय सामन्यांतील प्राविण्य व क्रमांक–(१) ८×३०० मीटर्स रीले–१. ( २ ) ४×४०० मीटर्स रीले–१. ( ३ ) मिडले रीले–१. (४) लांब उडी–१, उंच उडी–२.

### करमणूक आणि कला

( १ ) कु. विद्या भाटवडेकर, स्नेहसंमेलनांत नृत्याबद्दल १ लें बक्षीस. (२) कु. कुंदा काळे–पार्श्वगायन कु. कमल हेर्लेकर, स्नेहसंमेलनांत बांसरीवादन. ( ४ ) सहल–भाटघर, एम्प्रेस गार्डन.

आंतरवर्गीय सामन्यांत अजिंक्यपद ( ५८–५९ ) ( १ ) पोफळे श्री. र. आंतरमहाविद्यालयीन मैदानी सामने–हर्डल्स्–३ रा क्रमांक. आंतरविद्यापीठ बास्केट बॉल खेळाडू. ( २ ) देशपांडे शं. ना. बास्केट बॉल प्राविण्य. ( ३ ) कु. नीला कुंटे–महाराष्ट्र–मैदानी सामने वैयक्तिक ढाल. आंतरमहाविद्यालयीन सामने–१०० मीटर्स धांवणें– २ क्रमांक. ( ४ ) बोडस–४०० मीटर्स पोहणें. ( ५ ) वेलणकर अ. वि. १००–२०० मीटर्स रनिंग २ रा. क्रमांक. ८०० मीटर्स–१ ला. क्रमांक.

---

(८) वर्ग शिक्षक–प्रा. प्र. आ. पुरोहित. वर्ग–पी. डी. सायन्स डी. चिटणीस–पी. डी. आपटे.

### क्रीडा, बलविकास

१. श्री. पी. डी. आपटे ( पी. टी. नायक परीक्षा पहिला क्रमांक, मल्लखांब. २. श्री. व्ही. व्ही. ममदापूरकर ( N. C. C. ) मुष्टियुद्ध विजेता, वार्षिक सामने, पोहणें, कुस्ती, पळणें. ३. श्री. ए. एन्. सराफ ( टेबल टेनिस ). ४. श्री. आर्. एच्. लोहगांवकर ( पळणें, मुष्टियुद्ध ). ५. श्री. साने ( मल्लखांब, सिंगलबार ). ६. श्री. एन्. डी. पोतनीस ( हॉकी ). ७. कु. निर्मला गोडबोले ( टेबल टेनिस ) ८. कु. सुधा महाजन ( पोहणें ). ९. कु. रजनी कुलकर्णी ( रिंग टेनिस ). १०. कु. ललिता जोशी ( पी. टी. नायक परीक्षा–विद्यार्थिनी–पहिला क्रमांक, रस्सीखेंच ). ११. पी. डी. आर्टस् 'बी' बरोबर थ्रो-बॉलचा सामना, पी. डी. सायन्स 'डी' विजयी.

### कला, करमणूक, साहित्य–स्पर्धा

१. श्री. पी. डी. आपटे (' उसना नवरा' या नाटकांत पहिलें पारितोषिक ). २. कु. आशा दातार ( 'उसना नवरा ' या नाटकांत व विविध गुणदर्शनाच्या नाटिकेंत काम ). ३. कु. निर्मला आंबेकर ( युवक महोत्सव–लोकनृत्य ). ४. कु. उषा जोशी ( व्हायोलिन–वाद्यवृंद ). ५. कु. सरोज बेंद्रे ( इंग्रजी निबंध स्पर्धा, दुसरा क्रमांक )

---

(९) वर्ग शिक्षक–प्रा. शं. रं. देशपांडे. वर्ग–इंटर सायन्स बी. चिटणीस–श्री. दिघे, श्री. देशमुख.

### करमणूक, कला इत्यादि·

खालील फिल्मस् दाखविल्या. ( १ ) सिलोन–वनस्पतिदर्शन. ( २ ) पुणें विश्वविद्यालय–नाग पकडणें व ( ३ ) नाग पंचमीचा सण ( बत्तीस शिराळा येथील )

### सहल
### उरळी कांचन

( १ ) गांवकरी मंडळीशीं चर्चा ( २ ) गांवकरी मंडळींशीं हुतुतूचा सामना ( ३ ) गांवकरी मंडळींनीं दिलेला फराळ ( ४ ) करमणुकीचा कार्यक्रम ( ५ ) जनावरांचें पैदास केंद्रास भेट. ( ३ ) म. गांधींच्या 'निसर्गोपचार आश्रमास' भेट.

### क्रीडा–बलविकास

सुभाष देशपांडे, अॅथलेटिक्स कॅप्टन, स. प. कॉलेज. कु. मंगला खडे. रिंग टेनिस (विजेती) श्री. गोडबोले व्ही. टी. पोहणें. कु. लागवणकर : बुद्धिबळ. प्राविण्य आंतर वर्गीय क्रिकेट सामन्याचें अजिंक्यपद ( सायन्स-विभाग )

---

(१०) वर्ग शिक्षक–प्रा. एम्. के. परांजपे. वर्ग–ज्यू. बी. एस्सी. चिटणीस–श्री. कुलकर्णी. कु. छाया आठवले

### क्रीडा–बलविकास

१. श्री. ओक ( आंतरविद्यापीठ जलक्रीडा नैपुण्य-संघनायक ). २. श्री. पाटील ( आंतरविद्यापीठ जल-क्रीडा-गोलकीपर ). ३. श्री. मोने ( I. C. S. R. ) आंतरविद्यापीठ संघनायक ( भालाफेंक ) ४. कु. आशा ढवळे व कु. मंदा सवदी मुंबई क्रीडा महोत्सव–थ्रो बॉल–विजयी. ५. हुतुतु मुलींचा–आंतरवर्ग–विजयी. ६. मुलांचा खो खो व आस्यापास्या आंतर-वर्ग–विजयी. ७. श्री. पालकर–खो खो आस्या-पास्या. ८. श्री. गुप्ते क्रीकेट–लीग. ९. दा. आणि जोग–उंच उडी ( आंतर महाविद्यालय ).

### करमणूक–कला–संमेलन

१. श्री. सुभाष गोडबोले–दिल्ली युवक महोत्सव एकांकिका–पहिलें बक्षीस. रोटरी क्लब पहिलें बक्षीस. कु. सुधा मोडक, कु. शीला ओक, कु. शकुंतला जाईल. –दिल्ली युवक महोत्सव लोकनृत्य. ३. श्री. भोसले–रांगोळी प्रदर्शन पहिलें बक्षीस. श्री. नाईक–पावडर वर्क. कु. छाया आठवले ( नाटक ). सहल–एम्प्रेस गार्डन, खंडाळा, लोणावळा.

---

(११) वर्ग शिक्षक–प्रा. व. दि. कुळकर्णी. वर्ग–बी. ए. मराठी स्पेशल. चिटणीस–श्री. ए. व्ही. खाडिलकर. कु. अलका आगाशे

### वादसभा–अभ्यासमंडळ

#### निबंधलेखन

अनवलीकर–' बखर वाङ्मय '. शंकर सारडा–' ब्राह्मणकन्या '–मंदाकिनी बर्वे–'ब्राह्मणकन्या '–पुष्पा-गोडबोले–' कालिंदी व वसुंधरा '

#### निबंधवाचन व चर्चा

चंद्रशेखर बर्वे–' गडकऱ्यांच्या नाटकांतील पति-व्रता,' श्री. म. पूरकर–'वृंदावन नायक कीं खलनायक.' मु. द. गोडसे–' ज्ञानेश्वरकालीन महाराष्ट्र.' चंद्रशेखर बर्वे–' ज्ञानेश्वरांचें अवतारकार्य.' श्री. म. पूरकर–'ज्ञानेश्वरांचें काव्य'. र. वि. जोगळेकर–'निबंधस्पर्धा'–बेळगांव; यांत पहिलें पारितोषिक.

#### भाषणें व चर्चा–

श्री. शं. ना. जोशी– ( इतिहास–संशोधक ) ' भाऊसाहेबांची बखर '. विद्यार्थ्यांची प्रकटचर्चा–' चरित्रलेखन : शास्त्र कीं कला ? '

### क्रीडा–करमणूक

( १ ) ( गायन, वादन, नकला इ. ) ( २ ) सीनि. बी. ए. च्या विद्यार्थ्यांना निरोप, वर्गसम्मेलन, खेळ. इ. ( ३ ) कु. शीला परांजपे यांची पुणें विद्या-पीठातर्फे दिल्ली येथील ' यूथ फेस्टिवल ' करितां नृत्यासाठीं निवड. ( ४ ) भुलेश्वर येथें सहल.

---

(१२) वर्ग शिक्षक–प्रा. रा. म. गोखले. वर्ग–सी. बी. ए. एकॉनॉमिक्स स्पेशल. चिटणीस–श्री. ज. ल. जगताप

### वादसभा–अभ्यास–मंडळ

प्रा. सिरसीकर, प्रा. कुलकर्णी, प्रा. कावळे व प्रा. कुमुद पोरे यांचा लोकशाहीवर परिसंवाद. श्री. ढवळे यांचें सुरक्षा समितीवर व्याख्यान.

### क्रीडा–बलविकास

श्री. जयराम पडीकल ( फूट बॉल ) श्री. मनोहर जोशी ( हॉकी ) श्री. कुंडलकर व जगताप ( व्हॉलीबॉल ). कु. सौदामिनी जोशी ( पोहणें ) कु. इंदू चितळे ( थ्रो बॉल ) यांनीं बक्षिसें मिळविलीं.

### करमणूक–कला इ.

श्री. म. वि. पटवर्धन, दिल्ली युवक महोत्सवासाठीं निवड झाली ( शास्त्रीय संगीत ) श्री. राहूरकर, शिंदे, आगाशे इ. यांच्या वाद्यवृन्दास बक्षिस मिळालें. ता. ३० जानेवारी ५९ रोजीं १०–५८ ते ११ दोन मिनिटें शांतता राखून हुतात्मादिन पाळण्यांत आला. सहल–कार्लालेणी, पाषाण.

(१३) वर्ग शिक्षक–प्रा. व्ही. एम्. सिरसीकर. वर्ग–ज्यू. बी. ए. एकॉनॉमिक्स स्पेशल.
चिटणीस–व्ही. बी. पुरवंत.

परिसंवाद-राजकारण, अभ्यास मंडळ

अध्यक्षः—प्रा. व्ही. एम्. सिरसीकर

वक्तेः—प्रा. घारे, प्रा. केरूर, प्रा. कुलकर्णी आणि प्रा. मिसेस् पोरे.

विशेष प्राविण्यः—(१) तळेले सी. जे.–( इंटर आर्टस इकॉनामिक्स ) (ज्यू. बी. अे. ) कॉलेज १ लें बक्षीस १९५८

सहल–वनेश्वर ( १ ली टर्म )

क्रीडा–बलविकास विशेष प्राविण्याचे मानकरी

(१) येवले श्याम–" श्री परशुरामीय " ( शरीरसौष्ठव )
" श्री मुंबई " ( २ रा विभाग )
" श्री पुणें " ( उपविजेता )
" श्री भारत " साठीं निवड.

(२) हेमंत राणे–( १ ) शरीरसौष्ठव ( उपविजेता )
( २ ) कॅप्टन कॉलेज क्रिकेट टीम
( ३ ) बेस्ट बॅटींग प्राइझ

(३) देगलूरकर जी. बी.–कॅप्टन हुतूतू ( कॉलेज टीम )

(४) शिरोळकर–कॅप्टन " आट्यापाट्या व खो खो " टीम ( कॉलेज टीम )

(५) कुलकर्णी–कॅप्टन बास्केट बॉल ( युनिव्हर्सिटी प्लेअर ) कॉलेज टीम

(६) बहिरट एस्. एच्.–" चिटणीस " कला मंडळ.

(७) डोणजेकर ए.–व्हाइस कॅप्टन " खो खो आट्यापाट्या " कॉलेज टीम

(८) पुरवंत व्ही. बी. (१) वेट् लिफ्टिंग इंटर कॉलिजिएट २ रें बक्षीस
(२) बेस्ट जिम्नास्ट ऑफ् द इयर ( कॉलेज जिमखाना प्राइझ )

---

(१४) वर्ग–शिक्षक–प्रा. रा. तु. कुलकर्णी, वर्ग–बी. ए. गणित स्पेशल. चिटणीस–कु. सुलोचना प्रभुणे, कु. नलिनी वैद्य व श्री. म. के. फणसळकर.

वादसभा–अभ्यास मंडळ

( १ ) श्री. शरद काळे "Political Aspects of Revolution" वर भाषण.

( २ ) श्री. काळे फणसळकर, कु. मृणालिनी साने, कु. सुलोचना प्रभुणे यांनीं 'मॅक्बेथ' च्या परिसंवादांत भाग घेतला.

या वर्गातर्फे ५।८।५८ रोजीं प्रा. कावळे व २७।८।५८ रोजीं प्रा. सिरसीकर यांचीं व्याख्यानें झालीं. प्रा. सिरसीकर यांनीं ' मध्यपूर्वेचा प्रश्न ' यावर फारच उत्कृष्ट भाषण केलें. प्रा. कावळे यांनीं ' गणित व तत्त्वज्ञान यांचें संबंध ' यावर विचारप्रवर्तक भाषण दिलें.

---

अतांरमहाविद्यालयीन कर्डाचेंडू विजयी संघ १९५८-५९.



आंतरमहाविद्यालयीन हवाईचेंडू विजयी संघ १९५८-५९.



बलविकास शिक्षक १९५८-५९.



आंतरमहाविद्यालयीन हुतूतू विजयी संघ १९५८-५९.



श्री. हरि जरांडे



श्री. देखणे पी. एस्.



श्री. चंदू पोळकर



जिमखाना कार्यकारी समिति १९५८-५९.



# साहित्य - विभाग

## भारतीय लोकशाहीचें भवितव्य

एकबोटे विलास विनायक, इंटर आर्टस् सी.

सध्यांच्या युगाचीं डोळ्यांत ठासून भरण्याजोगीं दोन वैशिष्ट्यें चटकन् ध्यानांत येतात. एक म्हणजे हें युग साऱ्या मानवजातीचा संहार करणार म्हणून दुःखातिरेकानें जगांतील प्रत्येक लहानमोठा पुढारी 'हा हन्त हन्त' करीत आक्रोश करीत आहे; व दुसरें म्हणजे या युगांत जगांतील कानाकोपऱ्यांत सतत एकसमयावच्छेदेंकरून, घाईनें व लगबगीनें 'लोकशाहीचा उद्‌घोष' चालू आहे. 'लोकशाही चालू आहे' असें विधान मीं केलेलें नाहीं! लोकशाहीचा उद्‌घोष चालू आहे!! शक्य तितक्या जोरांत, शक्य तितकीं आसवें डोळ्यांत आणून, शक्य तितक्या पोटतिडिकीनें व शक्य तितके डोळे मिटून लोकशाहीचा उद्‌घोष चालू आहे!!! संयुक्त संस्थानें आदर्श लोकशाही म्हणून स्वतःकडे कौतुकानें बोट दाखवीत आहेत. इंग्लंड आमची लोकशाही 'अतिप्राचीन' म्हणून स्वतःला धन्य समजत आहे. फ्रान्समधील जनता तर हॉलिवुडमधील नटी आपले पति जितके बदलत नसेल त्याहून जास्त पंतप्रधान बदलत आहे. या देशांत 'मला लोकशाही मार्गांनीं हुकूमशाहीचे अधिकार पाहिजेत' असा कोणी एक दूरदर्शी, सैनिकी बाण्याचा, कदाचित् नेपोलियनच्या 'स्कूल'-मधला मुत्सद्दी हट्ट धरून बसतो आणि हट्ट तो पुरविलाहि जातो. भीतभीत अगतिकपणें कडू चेहऱ्यानें! आणि नेमक्या ह्याच वेळीं भारताकडे सारें जग कौतुकानें 'जगांतील सर्वांत मोठें लोकशाही राष्ट्र' म्हणून बोट दाखवितें. भारतीयाला लाजल्यासारखें होतें, तो फुलारून जातो, मोहरून जातो, नि तोंच त्याच्या कानावर प्रांताप्रांतांतून गरजणाऱ्या आरोळ्या पडतात. "आमच्या लोकशाहीचें भवितव्य धोक्यांत आहे. आमचें सरकार (मग तें काँग्रेसचें असो वा कम्युनिस्टांचें) लोकशाहीचीं मूल्यें पायदळीं तुडवीत आहे. ही घोर विटंबना आमच्यानें सहन होणार नाहीं." आणि मग अशा वेळीं आपला गरीब बिचारा भारतीय घाबरून जातो, त्याच्या मनांतील आनंदावर विरजण पडतें, अचानकपणें त्याचा हात डोक्यावरून फिरतो, त्याला थोडें फार गोंधळायला होतें व मग तो भारतीय लोकशाहीच्या भवितव्याचा विचार करूं लागतो. डळमळत्या पावलानें गोंधळलेल्या मनानें व परस्परविरोधी घोषणांच्या सान्निध्यांत! नेमकी हीच अवस्था या क्षणीं माझी—एका भारतीयाची झाली आहे.

लोकशाहीसंबंधीच्या कित्येक कल्पना काळाच्या ओघाबरोबर बदलत गेल्या. कित्येकदां Democracy व mobocracy यांच्यांत अक्षम्य गल्लतहि करण्यांत आली. अब्राहाम लिंकनचें घोषवाक्य 'of the people, by the people, for the people'—फारच सुप्रसिद्ध झालें. या विधानांत जोसेफ मॅझिनीनें स्वतःची थोडी, पण विचार करण्याजोगी, भर घातली. तो म्हणाला of the people, by the people वगैरे तर सर्व खरेंच

परंतु त्याबरोबर Through the leadership of the best & wisest हें पण पाहिजे. आणि नेमक्या ह्याच मुद्द्यावर जगांतील कित्येक लोकशाही राज्यांचे पाये ढासळण्याजोगे आहेत. भारतीय लोकशाहीच्या भवितव्याबद्दल देखील जेव्हां मन शंकाकुल होतें तेव्हां पण चुटपूट लागते ती याच गोष्टीची. Best & wisest leadership! भारतांत 'Best' माणसें आहेत. निश्चितच खरें! भारतांत 'Wisest' माणसें पण आहेत—होय हेंहि निर्विवाद! पण जे Best & Wisest आहेत ते Leader आहेत काय किंवा जे Leader आहेत ते Best & Wisest आहेत काय ? येथें मात्र आपल्याला थांबायला पाहिजे. या प्रश्नाला होकारार्थी उत्तर देतांना जीभ अडखळतेच अडखळते. तो पूर्वीचा आवेश तितका कायम रहात नाहीं. नेहरूसारख्यांकडे बोट दाखविण्याचा मोह अनावर होतो. पण ती एकटी मूर्ति समाधान देऊं शकत नाहीं. कित्येक शहरांतून, खेड्यांतून कित्येक पक्षांतून हिरीरीनें राजकारण 'खेळणाऱ्या' पुढाऱ्यांचे विविध मुखवटे डोळ्यासमोर, नकळत कां होईना, येतात; त्यांच्या बदललेल्या टोप्या डोकावून जातात आणि मग अशा वेळीं फ्रेंच राज्यक्रांतीची आठवण होते. साऱ्या जगाला 'स्वातंत्र्य-समता-बंधुत्वा' ची ललकारी देणाऱ्या ह्या क्रांतींतील नेत्यांबद्दल बर्कनें म्हटलें आहे, "Leaders became bidders in the auction of popularity." (पुढारी हे लोकप्रियतेच्या लिलावांत बोली बोलणारे ठरले!) नेमकी हीच गोष्ट दुर्दैवानें सध्यां भारतांत होत आहे. स्वार्थापोटीं पुढारी लोकप्रियतेच्या गंगेंत हात धुवून घेत आहेत. व वैयक्तिक प्रतिस्पर्ध्यांना धुवून काढत आहेत. जनतेच्या भावनांना खेळविलें जात आहे. आणि अशा वेळीं, राजकारणांत चारित्र्य व तत्त्वनिष्ठा यांना वावच नाहीं कां अशी शंका तडफडणाऱ्या मनाला डंख मारून जाते.

आणि मग थोडा फार विचार करणारा माणूस यावर औषध शोधूं लागतो. Best & wisest leadership कशी निर्माण करावयाची याचा पेंच पडतो. आणि थोड्या विचारानंतर या दुर्दैवाचें मूळ भारतीय जनतेच्या अशिक्षिततेंतच आहे याची खात्री पटते. लोकशाहीबद्दल कोणतेंहि ज्ञान नसलेली जनता लोकशाहीबद्दल नको तें ज्ञान असलेल्या पुढाऱ्यांना निवडून देत आहे. या अशिक्षित जनतेचा भोळा भाव नकळत लोकशाहीला निर्धृण गुदगुल्या करीत आहे. आणि अशा वेळीं एखादा विचारवन्त गंभीर चेहऱ्यानें सांगूं लागला कीं भारतीय लोकशाहीचें भवितव्य धोक्यांत आहे तर आपल्यालाहि थोडा फार गंभीर चेहरा करणें क्रमप्राप्त ठरतें. आणि मग यावर एकच उपाय उरतो. तो म्हणजे सारा समाज सुशिक्षित करणें, नुसता साक्षर नव्हे तर सुशिक्षित करणें, आणि मग नुसता सुशिक्षित नव्हे तर सुसंस्कृत करणें! मार्ग फार लांबचा आहे, कष्टाचा आहे खूपच प्रामाणिकपणा लागणारा आहे—पण तेवढा एकच मार्ग आहे. कारण 'Enlightened citizen is the pre-condition of the success of democracy'. हें प्रत्येकाला मान्य केलेंच पाहिजे.

पण जरी सारी भारतीय जनता सुशिक्षित झाली तरी आपली लोकशाही यशस्वी होईलच असें विधान करणें जरा जड जाईल. कारण नुसत्या सुशिक्षिततेचा रिकाम्या पोटीं यत्किंचितहि उपयोग नाहीं. 'गरीब सुशिक्षित' हा किती भयंकर व विचार करण्याजोगा प्राणी असतो हें व्यक्त करण्याची आवश्यकता नाहीं. जेव्हां सर्व सामान्य भारतीय जनतेचें भौतिक जीवन सुखी व समाधानकारक होईल तेव्हांच त्यांचीं मनें सुस्थिर व समतोल होऊं शकतील. कोणत्याहि लोकशाहीच्या यशासाठीं मजबूत आर्थिक पायाची नितान्त आवश्यकता असते. भूक ही कित्येकदां भीक निर्माण करीत असली तरी भुकेच्या तीव्रतेकडून याच्याहूनहि कांहीं 'वेगळें' अभिप्रेत आहे. आणि तें 'वेगळें' निःसंशय लोकशाहीच्या यशाला मारक आहे. सध्यां नेमकी हीच गोष्ट उत्तर भारतांत कित्येक ठिकाणीं होत आहे. भूक हें अस्वस्थतेचें सर्वांत प्रमुख कारण व ही अस्वस्थता तर लोकशाहीला पाण्यांत बघणारी! त्यामुळें भारतीय लोकशाहीच्या उज्ज्वल भवितव्यासाठीं तरी निदान प्रत्येक भारतीय आर्थिकदृष्ट्या सुसंपन्न झाला पाहिजे. एरवीं त्याला लोकशाहीचा विचार करण्यास फुरसतहि सांपडणार नाहीं.

आतां, प्रत्येक भारतीयाच्या ठायीं आर्थिक सुसंपन्नता स्थापन करायची असें म्हटलें तर संपत्तीचें उत्पादन व वांटप कोणत्या मार्गानें करावें याचा विचार करणें अत्यावश्यक ठरतें. सध्यां भारतानें समाज रचनेचें ध्येय जरी अंगिकारलें असलें तरी त्या दिशेनें होणारी प्रगति मुंगीच्या पावलांचीच आहे! स्वातंत्र्योत्तर काळांत

संपत्तीचें उत्पादन किती तरी प्रमाणांत वाढलें पण ह्या उत्पादनाचा कोणता वांटा सर्व सामान्य जनतेस मिळाला व कोणता वांटा देशांतील लक्षाधीशांना कोट्याधीश करण्यासाठीं खर्चीं पडला हाच खरा प्रश्न आहे. संपत्तीचें वांटप हें तिच्या उत्पादनाहून अधिक महत्त्वाचें आहे हें सर्व विचारवंतांनीं मान्य केलें आहे. पण या वांटपाकडे शक्य तितकें व योग्य तितकें लक्ष पुरविलें जात आहे काय ? मुळींच नाहीं. कांहीं लोक तर म्हणतात कीं या देशांत मुळीं Democracy नाहींच. जी आहे ती Oligarchy. राज्यव्यवस्थेवर नियंत्रण आहे तें फक्त थैलीशहांचें, देशाच्या अर्थव्यवस्थेच्या उद्योगपतींचें, देशाच्या अर्थव्यवस्थेच्या नाड्या हातांत ठेवणाऱ्यांचें ! हें विधान जरी कांहींसें आतिशयोक्तिपूर्ण वाटलें तरी त्यांत थोडें फार तथ्य पण आहे. यावेळीं हें लक्ष्यांत ठेवलें पाहिजे कीं पं. नेहरूंनीं नेमका हाच आरोप 'Glimpses of World History'मध्यें ब्रिटिश लोकशाहीवर टीका करतांना केला आहे आणि दुर्दैवानें त्याच आरोपाची पुनरावृत्ति त्यांच्या राज्यांत केली जात आहे. काकासाहेब गाडगीळ यांच्यासारख्या काँग्रेस पुढाऱ्यांनीं देखील The rich has become richer and The poor has become poorer असे उद्गार काढले आहेत. याचा अर्थ असाच कीं समाजांत स्पष्टपणें Haves व Have nots यांचे वर्ग अस्तित्वांत आहेत. सत्ता आहे ती Haves च्या हातांत–जे संख्येनें थोडे आहेत पण ज्यांच्या हातांत पैसा खेळतो आहे ! आणि ही गोष्ट भारतीय लोकशाहीच्या मार्गावरील अडचण होय असेंच मानलें पाहिजे. ह्या गोष्टींवर समाजवादी समाजरचना हाच तोडगा आहे काय किंवा उद्योगधंद्यांचें राष्ट्रीयीकरण करून हा प्रश्न सुटण्यासारखा आहे काय याचीं निश्चित उत्तरें अजून अजमावलीं गेलेलीं नाहींत.

आणि समाजांतील Haves व Have nots च्या ह्या वर्गांनींच राष्ट्रांत भांडणें व अस्वस्थता निर्माण केली आहे. अशान्तता, मग ती अंतर्गत असो वा बहिर्गत, शेवटीं ती लोकशाहीच्या यशास मारकच ठरते. कार्लाईलनें तर म्हटलें आहे कीं, " Eternal vigilance is the price of freedom. " ( अखंड दक्षता हें स्वातंत्र्याचें मूल्य होय ) आतां प्रश्न एवढाच उरतो कीं ही दक्षता कोणत्या मार्गानें प्रस्थापित करावयाची ? या प्रश्नाला साधें व सरळ उत्तर म्हणजे ' लोकशाही मार्गानीं ! ' ही दक्षता कायद्यानें स्थापित करतां येणार नाहीं. म्हणजेच सारी जनता स्वतःच दक्ष असली पाहिजे. आपला भारत हें खरेखुरें निष्ठावान् शांततावादी राष्ट्र आहे, आणि असले पाहिजे व म्हणून शांतताभंग करणारें कोणतेहि अंतर्गत कारण हें शेवटीं भारतीय लोकशाहीवर आघात करणारेंच ठरले. पण एवढें मात्र खरें कीं लोकशाही व शान्तता हे राज्य-व्यवस्थेचें अविभाज्य घटक होत.

या दोन घटकांची जो फारकत करूं पहातो, त्याला एक तर लोकशाहीपासून वंचित व्हावें लागतें किंवा अशांततेच्या आहारीं तरी जावें लागतें. नेमकी हीच गोष्ट आतांपर्यंत जगांतील सर्व कम्युनिस्ट राष्ट्रांनीं केली आहे. म्हणून जेव्हां भारतांतील केरळ राज्यांत ' जगांतील पहिलें कम्युनिस्ट लोकशाही सरकार ' अस्तित्वांत आलें तेव्हां त्याकडे भीतियुक्त आदरानेंच दृष्टिक्षेप टाकला गेला, या सरकारचें स्वागत संमिश्र भावनेनेंच झालें. जगाच्या राजकीय रंगभूमीवरील महत्त्वाचा मूलगामी प्रयोग म्हणून या राज्याचें वर्णन करण्यांत आलें. हें सरकार लोकशाहीच्या चौकटींत राहून आपलीं उद्दिष्टें साध्य करणार कां ' लोकशाही कम्युनिस्ट सरकार' या शब्दांतच मुळीं वदतोव्याघात आहे हें सिद्ध करणार, याकडे साऱ्या जगाचें लक्ष्य लागून राहिलें होतें. सध्यां ज्या बातम्या कानावर पडत आहेत त्या भारतीय लोकशाहीच्या भवितव्याच्या दृष्टीनें फारशा आशादायक नाहींत. हें पण कम्युनिस्ट सरकार साऱ्या जनतेची निराशा करणार काय या शंकेनें मन दाटून येण्याजोगी परिस्थिति आहे. राजकीय खुनांचें प्रमाण वाढत आहे, विरोधी पक्षीयांना नानाविध प्रकारचे त्रास सहन करावे लागत आहेत. ( खरी गोष्ट अशी कीं या कम्युनिस्टांना विरोधी पक्षाचें अस्तित्वच मान्य नसतें ) एकंदरींत नंबुद्रिपाद आणि कं. चा माल कुजकाच निघाला असें म्हणायची वेळ येऊन ठेपली आहे. ह्या लोकांची उडी फक्त केरळपुरतीच मर्यादित नाहीं. ते बंगालवर नजर ठेवून आहेत. आंध्रमध्यें आपण एके काळीं ' प्रस्थ ' होतों हें ते विसरूं शकलेले नाहींत. व महाराष्ट्राच्या राजधानींत आपल्या पक्षाचा मेयर होऊं शकतो ही गोष्ट त्यांना आशादायक वाटते. एकूण त्यांची उडी बरीच मोठी

आहे. ह्या उडीला कोण व कसा पायबंद घालूं शकतो यावरच आपल्या लोकशाहीचें भवितव्य अवलंबून आहे. नाहीं तर कम्युनिस्टांना भारताचें रान मोकळें आहेच ! पुढें मार्गे हे कम्युनिस्ट भारतीय लोकशाहीच्या मार्गावरील सुद्धां ' फिश प्लेटस ' काढायला मागेंपुढें पहाणार नाहींत हें भारतीय जनतेनें खुशाल समजून चालावें.

आणि अशा परिस्थितींत जेव्हां साऱ्या देशाला गिळूं पहाणारे कम्युनिस्ट, देशापेक्षां पैसा श्रेष्ठ मानणारे भांडवलदार, गरीब अशिक्षित जनता व या जनतेच्या भावनांचा गैरफायदा घेणारे पुढारी यांचें अस्तित्व तीव्रतेनें भासूं लागतें तेव्हां सहाजिकच भीति वाटते कीं या सर्व संकटांपुढें लोकशाही मान वर करून टिकाव तरी कसा धरणार ? आणि मग डोळ्यापुढें अंधार पसरतो, मन एकाकी होतें, भांबावून जातें व यावर खराखुरा अंतिम उपाय कोणता याचा शोध घेण्याची इच्छा होते.

आणि बऱ्याच विचारानंतर यावरील खराखुरा उपाय कोणता याची थोडी फार उमग होते. अंतिम उपाय एकच—सर्व समाजाच्या मनःप्रवृत्तींत मूलभूत क्रान्ति करणें ! Democracy is not only the form of government, but a way of life. लोकशाही हें जीवनांतील आचरणाचें तत्त्व आहे. जेव्हां दैनंदिन जीवनांत लोकशाहीमय प्रवृत्तींचें उज्जीवन होईल तेव्हां हीं संकटें लगोलग धुक्यांत विरून जातील. आपण जगत आहोंत तें दुसऱ्यासाठीं ही भावना जेव्हां प्रत्येक हृदयांत तेवत राहील तेव्हांच भारतीय लोकशाहीचें यश निर्विवाद ठरेल.टाकलें जाणारे प्रत्येक पाऊल लोकशाही-साठीं असेल ही चिरनिष्ठा जोपासली गेली पाहिजे. ह्या कार्याच्या पूर्तीसाठीं कांही पिढ्या खर्ची पडतील. शक्य आहे ! या मार्गांत खूपच अडचणी आहेत. अगदीं बरोबर आहे ! प्रत्येक भारतीयाला यासाठीं महान् त्याग करावा लागेल. सत्य आहे ! पण हें होणारच नाहीं. साफ चूक आहे. प्रत्येक भारतीयांत वास करून राहिलेल्या सद्वृत्तींवर श्रद्धा ठेवून जर कार्य चालूं ठेवलें तर घाबरण्याचें,मनांत शंका येण्याचें मुळींच कारण नाहीं. आणि शेवटीं ' न मे कर्मफले स्पृहा ' हें भारतीय तत्त्वज्ञान आहेच !

पण हें महान् स्वप्न सत्यसृष्टींत उतरण्यासाठीं, कांहीं जुनीं तत्त्वें गाडून टाकावीं लागतील; नवीन प्रस्थापित करावीं लागतील. पक्षोपपक्षांतील सत्तास्पर्धा नष्ट करणें आवश्यक ठरेल. व सत्ता हें साध्य नसून सेवेचें साधन आहे ही भावना दृढमूल करावी लागेल. पू. विनोबाजी व जयप्रकाशजी यांच्या मतें तर सपक्ष लोकशाही भारतांत उपयोगीच नाहीं. पक्षविरहित लोकशाहीच देशाचा उद्धार करूं शकेल अशी त्यांची श्रद्धा आहे. विनोबाजींनीं तर शासनाचे चार टप्पे दिले आहेत—प्रथम एकपक्षीय शासन, नंतर सर्वपक्षीय शासन, पुढें पक्षरहित शासन व शेवटीं शासनच नाहीं. ही उच्चतम पायरी ! सध्यांच्या परिस्थितींत दुसऱ्या पायरीकडे पाऊल उचलण्याची वेळ आली आहे असें मानावयास हरकत नाहीं.

त्याचप्रमाणें भारतीय लोकशाहीचें भवितव्य उज्ज्वल ठेवण्यासाठीं भारतीय लोकशाही व जगांतील इतर लोकशाही राष्ट्रें यांच्यांतील फरक ध्यानांत घेतला पाहिजे. निव्वळ पाश्चात्यांचें अनुकरण करून हा प्रश्न सुटण्यासारखा नाहीं. संयुक्त संस्थानें, ब्रिटन इ. राष्ट्रांत तेथील जनतेनें स्वतः लोकशाहीची प्रतिष्ठापना व जोपासना केली व नंतर लोकशाहीचे हक्क मिळविले.आपल्या राष्ट्रांत लोकशाही, घटनेनेंच अस्तित्वांत आली आहे. आधीं कायदा झाला आहे व आतां आपल्याला त्यानुसार आचरण करावयाचें आहे, त्यामुळें आपली जबाबदारी वाढलेली आहे. अशा वेळीं भारतीयांनीं, आपले, आपल्या राष्ट्राचे असे विशेष संस्कार व संस्कृति ध्यानांत घेतली पाहिजे. साऱ्या भारतीय तत्त्वज्ञानाचा व मनःप्रवृत्तीचा पायाच मुळीं सहिष्णुता हा आहे. हा केवळ भारताचाच असा असामान्य गुण आहे. जगांत भारत हें एवढेंच राष्ट्र आहे कीं ज्यानें आतांपर्यंत दुसऱ्या कोणत्याहि राष्ट्रावर आक्रमण केलेलें नाहीं. अनाक्रमक राष्ट्र हेंच खरेखुरें लोकशाही राष्ट्र होऊं शकतें. आपल्या घरीं लोकशाही व जित प्रदेशावर साम्राज्यवाद अशा वृत्तीचें राष्ट्र खऱ्या अर्थानें कधींहि राष्ट्र होऊं शकत नाहीं. आणि म्हणूनच भारतीय लोकशाहीची उभारणीहि सहिष्णुतेच्या पायावर झाली पाहिजे.

सध्यांच्या लोकशाहींतील कच्चा दुवा म्हणजे ही लोकशाही संख्यात्मक आहे. गुणात्मक नाहीं. चारित्र्याला या पद्धतींत स्थान नाहीं. ही पद्धति एका अर्थानें Survival of the fittest चेंच प्रच्छन्न स्वरूप आहे.

बहुसंख्यांची अल्पसंख्यांवर सत्ता ही कांहीं लोकशाहीची पूर्णावस्था नव्हे. कोणत्याहि एका वर्गाच्या हातांत, मग तो वर्ग कामगारांचा असो वा मालकांचा, सत्ता असणें उचित नाहीं.

या विवेचनावरून हें सहज ध्यानांत येईल कीं जरी आपल्या लोकशाहीच्या भवितव्याबद्दल निश्चित भविष्य सांगतां येणार नसलें तरी कोणत्या मार्गानें गेल्यास लोकशाहीचें भवितव्य उज्ज्वल आहे याचा अंदाज घेतां येईल. सध्यांचा काळ खऱ्या अर्थानें संक्रमण काळ आहे. लोकशाही तत्त्वांचा वापर कोणत्या मार्गानें केला जातो आहे यावरच सर्व अवलंबून आहे. जनता किती प्रमाणांत सुशिक्षित आहे, मांगल्यावर किती जणांची श्रद्धा आहे, व कार्यकारण भावाचा विवेक असणारे पुढारी किती आहेत यावरच भारतीय लोकशाही भार देऊन आहे व म्हणूनच हा निर्णायक क्षण आहे. दुष्प्रवृत्तींना शरण जायचें कां लोकशाही मूल्यांना वंदन करावयाचें–एवढेंच दोन मार्ग आपल्यापुढें आहेत. यांतील कोणता तरी एकच मार्ग पत्करला पाहिजे. तेथें तडजोड नाहीं. अंतिम अर्थानें लोकशाही हें देखील साध्य नव्हे. तें जनतेच्या सेवेचें महान् साधन होय. लोकशाही हें जीवनव्यापी मूल्य आहे, असें मूल्य कीं ज्या मूल्यामुळें सध्यांच्या युगाला कलियुग कां म्हणावयाचें असा पेंच पडला पाहिजे, असें मूल्य कीं ज्या मूल्यामुळेंच फक्त भारतीय जनतेचें चेहरे आशेनें व आनंदानें प्रफुल्लित होऊं शकतील. आणि एवढ्यासाठींच भारतीय लोकशाहीचें भवितव्य हें भारताचें व भारतीयांचें भवितव्य आहे.

◆ ◆ ◆

## खरेदी

रवीन्द्र सुर्वे, ज्यू. बी. ए.

दिवस माथ्यावरून आतां थोडा थोडा कलायला लागला होता. वारा मुडद्यागत पडला होता अन् तरी चोहों बाजूंनीं तावलेली धूळ वैराण उडत होती. शनवार बाजारांतलीं पालं तापलीं होतीं आणि कापडांचीं ठाणं समोर उलगडून, "ए रामज्या, ए नामज्या, ए वरल्या वाडीच्या, हिकडं ये" म्हणून जाणायेणाऱ्याला हटकणारे दुकानदार दमून घसा कोरडा झाल्यावर पितळेच्या तांब्यांतलं कोम्बट झालेलं पाणी घटाटा पीत होते. आणि या हटकणाऱ्या दुकानदारांचे आवाज कानामागं टाकीत, गर्दीतनं फिरणाऱ्या गुडीशेववाल्याचे धक्के चुकवीत एकनाथ त्या तापल्या धुळींत पायतणं ओढीत चालला होता. पायतणांवर, पायावर खण्डी खण्डी धुळीचा राब बसला होता. एकनाथ पांच पांच मिनिटाला डोक्यावरचं मुण्डासं काढून टाळूवरचा घाम निपटीत होता. अंगाचा चिकचिका झाला होता; आणि एका हातानं कोपरीचा खिसा चाचपीत तो बैलबाजाराकडं चालला होता.

बैल बाजारांत येऊन पोहोंचल्यावर एकनाथ त्या कालव्यांत पुरा गलबलून गेला. आज तिशीच्या उमरींतहि जनावर विकत घ्यायची त्याची पहिलीच बारी होती. त्याच्या 'बा'च्या वेळच्या म्हाताऱ्या जित्रापांनीं त्याला आजवर काम दिलं होतं. जरा चपळाईला कमी असायचीं जनावरं. नांगरटीला चार दिवस इकडं तिकडं उशीर व्हायचा. पण चाललं होतं. आज मात्र तीन वार झाले. चांद्या बैलानं भुईला डोकं टेकल्यापासून 'एका'चा जीव घोरांत आला होता. त्यानं चार दिवस विचार केला, आणि मग ठरविलं. गांवच्या 'इटुबा' सोनाराहातीं बायकोचं गाठलं मोडलं. मेव्हण्याकडनं त्याच्या दाढीला हात लावून पांच सहा विसा उभे केले आणि बैलबाजाराला यायला निघाला. तेव्हां येतानां चावडीवरला नाना खोकत खोकत म्हणाला होता, "येका, आरं येड का खूळ हयें ? अडीचशांत काय एडका खरेदी कराया निघालास का काय ?" एकनाथानं त्याच्याकडं लक्षच दिलं नव्हतं. या नान्याला नाहीं तरी कोणाच्याहि कामांत अडसर घालायची संवयच भारी.

पण आतां मात्र एकनाथला नानाचा आवाज परत आठवला. जिकडं तिकडं एकेका गड्याएवढी उंच

जवान जित्रापं नजरं पडूं लागल्यावर त्याची नजर पार बुजली.कुणाला कांहीं विचारायचाच धडा होईना त्याला. तसाच उघड्या तोंडानें शेंपटीची चवरी उडवणाऱ्या एका भल्या थोरल्या शिंगाडांच्या जनावराकडं बघतांना त्याला एका पटकावाल्या गड्यानं धक्का दिला आणि म्हटलं, "आरं, बाजूला हट कीं मर्दा, गिराइकाला हिकडून तिकडं हालूं तरी देशील की न्हाई? रुबाब तर अगदीं जनावर इकत घ्यायला आल्या सारका दिसतोय. रस्ता कर." आतां मात्र एकनाथाला वाटूं लागलं, 'यांत काय खरं न्हाई. अडीचशें रुपड्या घेऊन हितं या थोरल्या बाजारांत येन्यांत आपुन ही गपलतच केली. पोतं दोन पोतीं जुंदळ्याच्या बोलीनं कुनाकडनं एकादं जनावर पैदा कराया हवं होतं नांगरटीसाटनं' आणि तरी जरा बाजूला होऊन तो तसाच तिथं उभा राहिला. बायकोचं गाठलं मोडलं होतं, कधीं नव्हे ते सोयऱ्याकडे हात पसरले होते. आतां इतकं केल्यावर माघार घेऊन कसं चालेल?

या विचारानं धीर करून एकनाथ बाजाराच्या या टोंकापासून त्या टोंकापर्यंत एकदां नुसता फिरला. दुसऱ्या खेपेला त्यानं दोन जनावरांच्या अंगाला वरनं-वरनं हात लावून बघितल्यागत केलं, एकाच्या खुराकडं वाकून बघितलं आणि नंतर धीर चेपल्यावर त्यानें जेव्हां एकदोन ठिकाणीं भीत भीत किमतीचं विचारलं तेव्हां परत त्याच्या जिवानं ठाव सोडला. चारापांचाच्या खालीं कुणी गडी तोंडातून आकडाच काढायला कबूल होईना. आतां काय करावं? गांवाकडच्या कुनाला संगट घेऊन आलों असतो तं काय तरी बरं झालं असतं.' त्यांतल्या त्यांत कमी आराच्या एकाद्या जनावराकडं बघावं तर त्याचाबी पट्टा साडेतीनशांवरून तीनशांवर यायलाच जीवाची जिकीर कराया लागला. परत एकनाथ त्या गलबल्यांत नुसताच हिकडून तिकडं तिकडून हिकडं कराय लागला अन् मघापासून त्याच्या-वर ध्यान असलेल्या एका बाप्यानं त्याला हटकलं.

"काय पाटील? खरेदी कराय अलायसा जनूं?"

एकनाथानं त्याच्याकडं पाहिलं. उंचनीच गडी, रुबाबदार, अंगांत पिवळा सदरा, पायजमा, काळं ज्यांकिट, डोक्यावर मागं सारलेली काळी टोपी, गळ्याला तांबडालाल रुमाल, मोठ्या झ्याकीत बांधलेला. नसनुसं हंसून एकनाथ 'होय' म्हणाला. खरेदी कसली कर्माची? आतां तसंच मागल्या पावलीं रिकाम्या हातीं गाडीतळावर जाऊन बैलं जुपावीं आणि गांवाचा रस्ता धरावा असं वाटत होतं. इतक्यांत एकनाथ विचारांतून जागा झाला. पावणा विचारीत होता,

"तम्बाकू खातां का पाटील?"

प्रश्नासरशीं एकनाथाचा हात आपोआप पुढें झाला. बार भरल्यावर पाव्हण्यानं एक पिचकारी मारली. आणि एकदम तो आपला हात एकनाथाच्या खांद्यावर टाकून म्हणाला.

"चला पाव्हणं."

'चला!' एकनाथ गळबटला. "चला खुटं?"

"आतां खुटं ठोकीत नका बसूं कामांत. दोन वाजाय आले. तुमाला जनावर घ्याचं का न्हाई?',

"न्हाई-म्हंजे होय, घ्याचं तं हायेच पन–"

"आतां पन आणि कुनाच्या सयेंवराचा काडताय? चला पाऊल उचला. का जनावर आवंदा घ्याचंच न्हाई तुमाला? म्होरच्या वर्साकरता बगून ठिवाया आलां व्हता?"

"न्हवं, तसं न्हाई, पन असं बगा, पैशाकडनं जरा कोण्डी व्हतीया."

"कसची कोण्डी नि धोण्डी घिऊन बसलाया राव! तुमाला चपाळ जित्राप चांगलं उंच आडवं गाडून दिल्याशीं कारन! पैशाचं तं बोलूंच नगा. कितक्यांत घ्येतासा? दीडशांत देऊं? दीडशांत?"

एकनाथाचा जीव हरकला. पावणा मोठा हुशार गडी दिसला. आणि दीडशा दोनशाची बोली बोलाय लागल्यावर तर एकनाथानं त्याच्या मागोमाग पाऊल उचललंच. पावणा त्याला एका कोप्यांतल्या माणसाकडं घेऊन गेला. कडब्याच्या काड्या चिवडीत शिंगाडं हलवीत एक पिठूर रंगाचं उमदं जनावर उभं होतं आणि त्याचा मालक एका खाकी डगलावाल्या माणसाशीं सौदा पटवीत होता. पावण्यानं त्याला रामराम केला. त्यानं एकीकडे हंसून रामराम घेतला अन् एकीकडं डगलावाल्याला म्हणाला,

"आमचा बैल दिल्याला हाय हवालदार. तुमाला दुसरीकडं बगाय होवं."

तीं माणसं हाललीं आणि एकनाथाचा धीर सुदिक हालला.

" आत्ता वं ? " तो पावण्याला म्हणाला. " ह्ये तं म्हनाय लागले कीं बैल ग्येलाय म्हनून ? "

पावणा हंसला. " आवं दिलाय् तं खरंच पर कुनाला म्हून म्हाई इचारलंत ? "

कुना का नवश्यागवश्याला असंना. एकनाथ उगाच राह्यला.

" अवं इचारा म्हनतो न्हवं काय ? "

" कुनाला ? "

तसे दोघे गडगडून हंसले. एकनाथ आणखी बावचाळला तसा पावणा हंसायचा थांबून म्हणाला.

" अवं असं काय इचाराय लागलाय खुळ्या गतीन ? "

" कावो, तुमीच म्हनालांत म्हून– "

" हा, त्येबी खरंच म्हना, अवो दुसऱ्या कुनाला द्यायाचा बैल ? तुमालाच इकून टाकलाय कीं "

" माला, आन् कवा हो, अजून तं काई सौदा–"

" सौदा ? आत्ता घ्या ! अवो सौदा कयाचा ? आन् तुमच्या संगट ? ह्ये बगा पाटील. बैलाची किंमत ह्राय रुपये पांचशें कलदार "

" आँ, मग–छ्याः छ्याः कसं जमायचं ? मी आपला–– "

" आरं हो हो. चाललाय खुटं लगींच ? तुमच्या कशाला रकम रुपये नगाद किती हाये सांगा. सांगा ब्येगीन; काचकुच नका करूं या वख्ताला, जनावर निगून ग्येलं तं बगायाबी म्हाई गवसायचं आसलं पुनां. "

" माज्यापाशीं अडीचशें हायेत. "

" दिला बैल तुमाला. सोडा दावं आन् चला घ्येउनशान् "

एकनाथाला चकवा पडल्यागत झालं. त्याला एकदम संशेव वाटला. ' जनावरांत तं काई खोट नसावी ? चारचारदां जनावराकडं खुरापासन शिंगाडापत्तर बगूनबी काई दिसाय न्हाई ' शेवटीं एकनाथानें विचार ठरवला अन् रुपये अडीचशे मोजून दावं सोडून हातीं घेतलं.

◆ ◆ ◆

खिडूक मिडूक हिंगाजिऱ्याचा बाजार करीपत्तर एकनाथाचा दीस आडवा झाला. कारबारनीच्या दुशीला कापड, ल्येकरांना गुडदानी घेऊन तो गाडीतळावर आला तेव्हां कमेटीचा माणूस रस्त्यावरले दिवे घासलेट घालून पेटवीत होता. नवा बैल गाडीच्या जोडीपेक्षां उंच होता. त्यानें गाडी जुपून त्याला मागंच बांधला. अन् गाडीतळावरच्या गजबजाटांतून गाडी बाहेर काढली. गांवाबाहेरच्या रस्त्यावर गाडी आली. एकनाथ खुशींत होता. ' अडीचशांत रत्नासारखा बैल-बास् ह्येचं नांव सुदीक आता ठरलं. रत्न्याच ठिवायचं. आतां जाऊन इचारतो त्या नाम्याला. थेरडं मला म्हनतंय, एडका आनाय चाललास काय म्हून. आतो बग म्हनावं एडका ह्राय का काय ह्राय त्ये. '

इतक्यांत मागं रत्न्याच्या अंगावर कुणाची तरी थाप वाजली अन् एकनाथानं मागें वळून पाहिलं. कुणी गडी गाडी मागून येत होता. अंधारांत नीट ओळखूं येईना तशी एकानं हाक मारली. " आरं, आरं कोन ह्रायं त्यो ? " गडी जवळ आला, आन्– आरं तिच्या, दुपारचाच कीं.

" या या पावणं गाडींत या.तुमी खुटं या बाजूला ?"

" धंद्याला चाललो व्हतो जरा पिपळीकडं "

" पिपळीला, आरं वा ! म्हंजे आमच्या गांवाच्या अल्याडच हायकी. फाटं पत्तर पोचूं. "

एकनाथाला चागली सोबत मिळाली गप्पा सुरूं झाल्या. पावणा धंद्यांत देशभर हिण्डलेला होता. काय काय गमती जमती सांगायला लागला. चोराचिलटाच्या लांडीलबाडीच्या गोष्टी निघाल्या. पण प्रत्येक गोष्टींत पावणा सगळ्यांना पुरून दीडवीत उरलेला मोठा हुशार गडी. आणि भला पण तसाच. बोलतां बोलतां त्यानं तम्बाकू मळून चिलीम भरून शिलगावली ती सुदिक आपुन ओढायच्या अदुगर एकनाथाच्या हातीं दिली. एकनाथानें दोन जोरकस दम मारले. पावणा मोठा भला गडी ! मोठा हुशार ! मोठाच ––हुशार......

◆ ◆ ◆

एकनाथाला कुणाचं तरी खोकणं ऐकूं आलं आणि तो जागा झाला. ' आरं, ह्यो तर नाना चावडीवरला.

आपुन गांवांत आलो कीं आपल्या. चांगलं फटफटलेलं दिसतया. पावणा उतरून ग्येला वाटतं पिपळीला. आतां सांगावं या नानाला एडका आनलाय का त्याचा बा इकत आनलाय त्ये.

" ए नाना आरं बग की मर्दा जरा या जित्रापाकडं ऑ--अरं, ह्यो बैल कुठं गायब झाला म्हनावं ?"

एकनाथाला त्या चिलमीपत्तरचं सगळं आठवलं अन् म्होरचं सारंच धुळकटल्यासारकं वाटलं.

आणि मग थोडक्याच वेळांत, " त्यो पावना, त्यो चिलमीचा-ती चिलीम " असं पिशागतीनं बडबडणाऱ्या एकनाथाभोवतीं 'ह्यो असं काय कराय लागलाय ?' म्हणून बघणाऱ्या गांवातल्या गड्यांचा आणि बायाबाप्यांचा एकच गराडा पडला.

◆ ◆ ◆

## कधीं वाटतें !

सुधाकर अनवलीकर, ज्यू. बी. ए.

कधीं वाटतें पुष्प होउनी
विकसित व्हावें अणुरेणूंतुन
सर्व जगाला गंध देउनी
भूल पाडुनी धुंद करावें ।
कधीं वाटतें व्हावें चंदन
( सर्प असे जरि मम फांदीवर )
झिजून जावें कणांकणांतुन
सुसह्य, शीतल जीवन करण्या ॥
कधीं वाटतें चंद्र होऊनी
सदैव आकाशीं विहरावें
अवसेलाही पौर्णिमेपरी
क्षण बरसावें शुभ्र चांदणें ।
कधीं वाटतें पंख उभारुन ।
विहंगापरी स्वैर फिरावें
" तुच्छ तुच्छ ही भूमि " म्हणुनी
गगनाला क्षण मीं चुंबावें
-आणि जगाच्या तापें जळतां
रूढ जगाच्या वाटां मळता
नको वाटतें कांहीं होणें
मला वाटतें माणुस व्हावें !
माणुस व्हावें !!

## " अबोल मनोगत "

सुरेश वासुदेव पटवर्धन, इंटर आर्टस्, बी.

हिरवळीसंगे चालती
वायुचें खट्याळ चाळे
भू सावरितां पदरासी
स्थिरावती नेत्र खुळे.
बिलगतां वेली-अंगें
नादावला वृक्षराज
दंवबिंदू ओघळता
भान हरपलें आज
मंचकावरी क्षितिजाच्या
रम्य संध्या पहुडली,
अधरी वांकतां रवि
गुलाब फुलला गालीं.
उमलल्या कळीसंगें
सुगंधही उधळला
लाजऱ्या नाजुकतेचा
धुंद स्पर्श सुखावला.
पांखरांची किलबिल
मधुर कूजन बनात
उडती तुषार झऱ्याचे
उमटे ध्वनिंचा पडसाद
मादकता निसर्गाची
वेड्या मना भुलवीत
अमर्याद ओढ त्याची
सृष्टिमाजी रमवीत.

# मॅक्बेथ्-शोकान्तिका ?

**सुरेश सदाशिव वाळिंबे. ज्यू. बी. ए.**

करुण, गंभीर शोकान्तिका आणि नर्म विनोदी सुखान्तिका लिहून इंग्लिश वाङ्मयांतील अनभिषिक्त सम्राट् शेक्सपीयर यानें आपलें नांव अजरामर केलें आहे. त्याचप्रमाणें लेखन कलेंतील स्वतःचें सव्य-साचित्वहि सिद्ध केलेलें आहे. वरील दोनहि प्रकारच्या त्याच्या नाट्यकृतींचें आकर्षण सर्वसाधारण वाचक-प्रेक्षकांना आणि रसिक टीकाकारांना सारखेंच असतें हें मत विवादातींत असलें तरी सुद्धां सूक्ष्म अवलोकन केल्यानंतर, त्याच्या सुखान्तिकांनींच सर्व साधारण वाचक-प्रेक्षकांना अधिक भुलविलें आहे, आणि रसिक टीकाकारांना मात्र त्याच्या शोकान्तिकांनींच अधिक वेड लावलें आहे हेंहि मान्य करण्यास कांहींच प्रत्यवाय नाहीं. 'मॅक्बेथ्' या करुणगंभीर शोकान्तिकेचेंहि असेंच आहे. मानवी मनाचा सूक्ष्म अभ्यास करण्याच्या दृष्टीनें 'मॅक्बेथ्' सारख्या शेक्सपीयरच्या शोकान्तिकाच अधिक महत्त्वाच्या वाटतात यांत शंका नाहीं. विशेषतः या नाटकाचा नायक मॅक्बेथ् याच्या दुःखद मृत्यूच्या दृष्टीनें त्याचें मनोविश्लेषण करण्याचा मोह रसिकांना पडल्यावांचून राहत नाहीं. डंकन या वृद्ध पण सालस अशा स्कॉट्लण्डच्या राजाचा झालेला खून आणि तो खून करणाऱ्या मॅक्बेथ्चा हळुहळू होत गेलेला नैतिक अधःपात व त्यांतूनच शेवटीं होणारा त्याचा मृत्यु या दोन दुःखद घटना संपूर्ण नाटकांत महत्त्वाच्या आहेत.

मॅक्बेथ् हा अत्यंत महत्त्वाकांक्षी होता आणि स्कॉट्लण्डचा राजा होण्याच्या महत्त्वाकांक्षेनें प्रेरित होऊनच त्यानें डंकन या आपल्या राजाचा अमानुष रीतीनें खून केला आणि स्वतः सिंहासन बळकाविलें. स्कॉट्लण्डची तत्कालीन परिस्थितीहि मॅक्बेथ्ला आपल्या महत्त्वकांक्षेच्या परिपूर्णतेच्या दृष्टीनें अत्यंत अनुकूल अशीच होती. डंकन हा अत्यंत सद्गुणी व प्रजेचा आवडता राजा असला तरी आवश्यक तें शौर्य व पराक्रम यांचा त्याच्यापाशीं अभाव होता, असें नाटकांतील घटनांवरूनच ठामपणें म्हणतां येतें. त्याच्या या दुबळेपणाचा फायदा घेऊनच मॅक्डोनवॉल्ड या त्याच्या एका सरदारानें अन्तर्गत बंडाळी उभारली होती. 'थेन ऑफ कॉडर' ही उपाधि विभूषविणाऱ्या दुसऱ्या एका सरदारानेंहि त्या बंडखोराला साह्य केलें होतें असें दिसतें आणि या अन्तर्गत बंडाळीचा फायदा घेऊनच स्वोनो या नॉर्वेच्या राजानेंहि स्कॉट्लण्डवर आक्रमण केलें होतें. या बंडाचा बीमोड करण्यासाठींच डंकननें मॅक्बेथ् आणि बॅङ्को या आपल्या पराक्रमी सरदारांची योजना केली होती. हा सर्व कथाभाग नाटक सुरू होण्यापूर्वी घडलेला आहे. या बंड मोडण्याच्या कामीं मॅक्बेथ्नें बॅङ्कोच्या साह्यानें अभूतपूर्व असें यश संपादिल्यानें व तो डंकनचा नातेवाईक असल्यानें साऱ्या राज्यांत त्याच्याविषयीं आदराची व अभिमानाची भावना प्रगट होतांना दिसते. अशा प्रकारें देशांतील अशांत परिस्थिति, सद्गुणी पण पराक्रम-शून्य राजा अशा पार्श्वभूमीवर आपल्या पराक्रमाच्या जोरावर स्वतःची महत्त्वाकांक्षा परिपूर्ण करून घेण्याचा प्रयत्न मॅक्बेथ्नें केल्यास त्याला कोणीहि दोष देणार नाहीं. पराक्रमी लोकांनीं स्वतेजाच्या बळावर पुढें यावें हा जगाचा न्यायच आहे. प्रश्न आहे तो एवढ्याविषयींच कीं, ज्या मार्गानें मॅक्बेथ्नें आपली महत्त्वाकांक्षा परिपूर्ण करून घेतली तो कितपत न्याय्य आहे ?

तत्कालीन राजकीय परिस्थितिप्रमाणेंच योगायोगानें घडलेल्या घटनांनींहि मॅक्बेथला त्याच्या महत्त्वाकांक्षेच्या परिपूर्तीच्या दृष्टीनें फार मोठें साह्य केलें आहे. दोन ठिकाणीं योगायोगानें महत्त्वपूर्ण काम केलेलें आहे. आपल्या थोरल्या मुलाला 'युवराज' म्हणून नेमल्यानंतर विश्रांतीसाठीं व आयुष्याचे यापुढचे दिवस सुखानें क्रमित करण्यासाठी मॅक्बेथ्च्या किल्ल्याचा आश्रय घेण्याचा आपला मनोदय डंकन प्रगट करतो. (अङ्क १, प्रवेश ४) जो मॅक्बेथ् त्याच्या प्राणावर आपली बुभुक्षित नजर लावून बसला होता त्याच्याच आसऱ्याला आयुष्याच्या अखेरीस जाण्याचा विचार डंकननें करावा, आणि लगोलग कृतींतहि आणावा याहून करुणतर असा दैवदुर्विलास कोणता ? या

यदृच्छाभासामुळें डंकनला नाहींसें करण्याचें काम त्वरित उरकण्यावांचून मॅक्बेथ् पतिपत्नींना गत्यंतरच उरत नाहीं. मात्र याचा अर्थ असा नव्हे कीं, डंकन मॅक्बेथ्कडे आला नसता तर मॅक्बेथ्नें त्याचा खून करण्याचा यत्न केला नसता. डंकनचा खून होणार हें उघड उघड ठरल्यासारखें होतें, फक्त प्रस्तुत योगायोगामुळें त्याची वेळ अलीकडे आली एवढेंच! या योगायोगाचा मॅक्बेथ्ला झालेला फार मोठा फायदा म्हणजे आपल्या अघोरी महत्त्वाकांक्षेच्या परिपूर्तीसाठीं डंकनचा बळी घेणें त्याला अधिक सोपें जातें. त्याचप्रमाणें प्रत्यक्ष खून घडल्यानंतरहि योगायोगानें मॅकबेथ्ला साह्य केलें आहे. आपल्या पित्याचा खून झालेला पाहतांच आपलीहि तीच गत होऊं नये म्हणून डंकनचे दोन्ही मुलगे तेथून पळ काढतात व परदेशपर्यटण करतात. त्यामुळें त्यांनीच राजाचा वध केला असावा असा लोकापवाद प्रसृत होऊन तात्पुरता का होईना, पण मॅक्बेथ्वरील खुनाचा संशय दूर होतो. तथापि या योगायोगांमुळें पात्रांच्या मनोरचनेंत वा कथेच्या मध्यवर्ती घटनेंत अपरिहार्य असा कांहींहि परिणाम घडून येत नाहीं हेंहि सत्य आहे.

माल्कमला युवराज म्हणून उद्घोषित करण्यांत आलें ही घटनाहि महत्त्वाची आहे. त्यामुळें आपल्या ध्येयपथावर एक नवीन अडथळा निर्माण झाल्याची जाणीव मॅक्बेथ्ला होते. आणि त्याला गंभीर स्वरूप प्राप्त होऊं नये आणि इतर कांहीं अडथळे निर्माण होऊं नयेत म्हणून डोळ्यांना पाहवणार नाहीं असें 'तें' (खुनाचें) कृत्य करण्याचा त्याच्या मनाचा निश्चय होतो. ("........yet let that be, ... ... Which the eye fears, when it is done, to see." अङ्क १, प्रवेश ४)

आणि म्हणूनच तारकांना आपलें तेज झांकून घेण्याची आणि प्रकाशाला आपल्या दुर्वासना न पाहण्याची विनंति तो पुढील शब्दांत करतो,–

"Stars, hide your fires;

Let not light see my black and deep derires."

आपली महत्त्वाकांक्षा पूर्ण करण्यासाठीं डंकनचा खून हा एकमेव मार्ग असून तो शक्य तितक्या लवकर अवलंबांत आणण्याचा मॅक्बेथ्चा निर्णय झाला आहे असें यावरून दिसून येतें.

आणि मॅक्बेथ्कडून खुनाचें हें भीषण कृत्य घडवून आणण्यास कारणीभूत होणारी एक प्रभावी शक्ति म्हणजे त्याची पत्नी. मॅक्बेथ् आणि लेडी मॅक्बेथ् हीं परस्परांवर अत्यंत प्रेम करणारीं पति–पत्नी आहेत. आपल्या मनांतील कुठलाहि विचार मॅक्बेथ् तिच्यापासून लपवून ठेवीत नाहीं, इतकेंच नव्हे तर प्रत्येक वेळीं तिच्या सल्लामसलतीनेंच सर्व व्यवहार करण्याचा त्याचा सराव आहे. आपल्या पत्नीला त्यानें जें पत्र पाठविलें आहे (अङ्क १, प्रवेश ५) त्या पत्रावरून ही गोष्ट सिद्ध होते. यामुळेंच लेडी मॅक्बेथ्च्या व्यक्तिमत्त्वाचा वा विचारसरणीचा प्रभाव तिच्या पतीवर पडणें अगदीं सुसंगत आहे. तिचें व्यक्तिमत्त्व अत्यंत प्रभावी आहे हें, पतीच्या पत्रवाचनानंतर तिनें ज्या प्रतिक्रिया व्यक्त केल्या आहेत त्यांवरून उत्कृष्टपणें प्रत्ययास येतें. स्त्रीपेक्षां पुरुषीपणाचा अंश तिच्यांत कांहीं वेळां अधिक असल्याचेंहि दिसून येतें. नाहींपेक्षां तिच्या स्वभावांतील महत्त्वाचें वैशिष्ट्य म्हणजे तिचें आपल्या पतीवरील अकृत्रिम असें आत्यंतिक प्रेम. या प्रेमशक्तीच्या बळावरच त्या तीन चेटक्यांपेक्षांहि ती मॅकबेथवर अधिक जवळून प्रकर्षानें प्रभाव गाजविते. डळमळीत विचारसरणीच्या मॅकबेथच्या हातून खुनाचें भीषण कृत्य पार पाडविण्यास तिचे कठोर उद्गार, तिचे दाहक उपालम्भ, तिची प्रेरणा आदि गोष्टी कारणीभूत झालेल्या आहेत. मॅकबेथकडून हें कृत्य करवून घेण्याची सर्व जबाबदारी तिनें पार पाडलेली आहे. आणि त्यासाठीं स्वतःच्या स्त्रीत्वाचा, स्त्रीसुलभ भावभावनांचा तिनें सर्वस्वी होम केलेला आहे! ती अत्यंत दुष्ट स्त्री आहे असें म्हणणेंहि चूक वा अत्युक्त ठरणार नाहीं. याविषयीं तिला जितकें वाईट म्हणतां येईल तितकें आपण म्हणूं शकतों. पण यावेळीं एक गोष्ट–आणि ती अत्यंत महत्त्वाची आहे–विसरून चालणार नाहीं. इतकेंच नव्हे तर त्या गोष्टीचा विचार न केल्यास तिचें स्वभाव-दर्शन एकांगी होईल; इतकेंहि नाहीं तर तिच्या स्वभावांतील मानवी अंश पूर्णपणें दुर्लक्षित करून आपण तिच्यावर फार मोठा अन्याय केला आहे असें होईल. मॅकबेथच्या पत्नीचें त्याच्यावर निरतिशय, प्राणांपलीकडे प्रेम आहे. इतकें कीं, तिनें

आपलें स्वतंत्र व्यक्तिमत्त्वच उरूं दिलें नाहीं. पतीच्या जीवनाशीं, त्याच्या भावभावनांशीं, त्याच्या विचारांशीं इतकेंच नव्हे तर त्याच्या महत्त्वाकांक्षेशीं ती पूर्णपणें समरसच नव्हे तर एकरूप झालेली आहे. त्याची राज्य-पद मिळविण्याची महत्त्वाकांक्षा परिपूर्ण करण्यासाठीं सर्वार्थानें साह्य करण्यास ती तयार झाली आहे. आपला पति महत्त्वाकांक्षी असला तरी पापभीरू असल्यानें, अयशोभीरू असल्यानें, कदाचित् डंकनच्या खुनाचा मार्ग स्वीकारणार नाहीं असें तिला वाटतें. आणि म्हणूनच त्याला, महत्त्वाकांक्षा सिद्ध करण्यासाठीं उत्तेजन, देणें, त्याच्याकडून खुनासारखें भीषण कृत्य घडवून आणणें हें ती आपलें कर्तव्य मानते. आणि तें कृतींत आणूनहि दाखविते. पण यांत स्वार्थाचा लवलेशहि नाहीं. तिच्या स्वभावांतील केवळ या एका गुणामुळें तिच्या साऱ्या व्यक्तिमत्त्वाला उजाळा मिळाला आहे. आणि केवळ या एका गुणावर लुब्ध होऊनच रसिक तिला तिच्या दुष्ट कृत्याबद्दलहि क्षमा करतो. लेडी मॅक्-बेथ् ही अमानुष वा अमानवी व्यक्तिरेखा नसून सजीव चालती बोलती आणि वास्तवतेच्या कोटींतील व्यक्ति आहे हेंच यावरून सिद्ध होतें.

डंकनचा खून करण्यासाठीं आवश्यक ती प्रेरणा पतीला देण्याचा व वेळप्रसंगीं तें भीषण कृत्य स्वतःच्या हिंमती-वरहि पार पाडण्याचा लेडी मॅक्-बेथ् निश्चय करते. त्यासाठीं आवश्यक तो पुरुषीपणा आपल्या अंगीं आणण्यासाठीं, उसन्या अवसानानें पतीला धीर देण्या-साठीं, त्याचें खचलेलें शौर्य उभें करण्यासाठीं दुष्ट भावनांना आणि रात्रीला ती आवाहन करते. आपलें मन निर्दयतेनें, निष्कोमलतेनें परिपूर्ण करण्याची ती दुष्ट भावनांना विनंति करते. आपलें स्त्रीत्व नाहींसें करून कांहीं काळ कां होईना पण आपल्याला पुरुषीपण बहाल करण्याविषयीं ती प्रार्थना करते. आपण करणार असलेलें भीषण कृत्य न पाहण्याची विनंति ती रजनीला करते. (अङ्क १, प्रवेश ५) इतकेंच नव्हे तर इष्ट ध्येयपूर्तीसाठीं स्वतःच्या लहान मुलालाहि ठार मारण्यास आपण मागेंपुढें पाहिलें नसतें, असे आपल्या पती-जवळहि ती उद्गार काढते. (अङ्क १, प्रवेश ७) या सर्व भीषणतेमुळेंच बऱ्याच टीकाकारांची तिच्याविषयीं चुकीची समजूत झाली असून त्यांनीं तिला 'चौथी चेटकी' असें संबोधिलें आहे. पण या वेळींहि तिनें क्रूरतेचा, भीषणतेचा वेष परिधानिलेली भाषा वापरली असली तरी तो केवळ बुरखाच आहे. ज्याअर्थीं ती क्रूरतेच्या देणगीसाठीं प्रार्थना करते त्याअर्थीं ती मुळांत क्रूर नाहीं, स्त्रीच्या मृदु भावना तिच्यांतहि वास करीत आहेत हीच गोष्ट सिद्ध होते. कारण जी गोष्ट आपल्या-पाशीं नाहीं तीच आपल्याला मिळावी अशी इच्छा केली जाते. पुढेंहि असाच एक प्रसंग आलेला आहे. आपल्या पतीच्या भ्याडपणाची यथेच्छ निंदा करून स्वतःच खुनाचें कृत्य अंगिकारण्याचा ती निश्चय करते. पण ऐनवेळीं मात्र डंकनच्या खुनाचें काम करतो तो मॅक्बेथ्; त्याची पत्नी नव्हे. आणि आपण हें कृत्य कां केलें नाहीं याचें जें कारण तिनें दिलें आहे तेंहि उल्लेखनीय आहे. वृद्ध डंकनची ती शान्त-गंभीर मुद्रा पाहून तिला आपल्या वडिलांचाच भास झाला. आणि या साधर्म्यामुळेंच तिचें अवसान गळून ती माघारी येते आणि आपल्या पतीलाच तें काम उरकण्यास सांगतें. ("Had he not resembled My father as he slept, I had done't ,–" अङ्क २, प्रवेश २.) तिची इच्छाशक्ति दुर्दम्य आहे; पण आवश्यक तें शौर्य तिच्या अंगीं नसल्यामुळेंच ती ऐनवेळीं लंगडी पडते. ती अमानुष नसून मानव प्राणीच आहे. हें यावरून सिद्ध होतें. तिनें कितीहि पुरुषीपणाचा आव आणला तरी तें सगळें अवसान उसनें ठरतें, आणि ऐनवेळीं तिचें हें ओढून ताणून आणलेलें चन्द्रबळ नाहींसें होऊन ती स्त्री आहे हेंच दरवेळीं स्पष्ट होतें. ती वाचिवीर आहे; कृतिवीर नाहीं. बोलण्यांत ती जितकें शौर्य, कठोरपणा दर्शविते तेवढा कठोरपणा प्रत्यक्ष त्या प्रसंगाच्या वेळीं ती दाखवूं शकत नाहीं. कारण ती स्त्री आहे हेच होय! शेक्स्पीयर हा उत्कृष्ट नाटककार कसा होता हें केवळ या एका उदा-हरणावरून समजण्याजोगें आहे. आपल्या पतीला कार्य-प्रवृत्त करण्यासाठीं आपल्या स्वभावाविरुद्ध जाऊन ती कठोरपणाचा देखावा आणते. पण यामुळें जो अविरत मानसिक ताण पडतो त्याचीच परिणाति तिच्या नाशांत होतें. केल्या कृत्यांचें फळ अत्यंत विलक्षण रीतीनें भोगणें तिला भाग पडतें.

प्रत्यक्ष डंकनचा खून करण्याच्या अगोदर कांहीं क्षणांपूर्वी मॅक्बेथ्नें तें स्वगत भाषण केलें आहे तें त्याच्या त्या वेळच्या मनःस्थितीवर व स्वभावावर प्रकाश

टाकणारें आहे. केवळ डंकनचा खून केल्यानेंच त्याची महत्त्वाकांक्षा सिद्ध होणार असेल तर तो तें भीषण कृत्य करण्यास तयार आहे. कुठल्याहि प्रकारचा दुष्परिणाम त्यापासून घडून येणार नसल्यास त्या कृत्याच्या परिपूर्ततेची त्यानें तयारी केलेली आहे. पण केवळ डंकनचा खून केल्यानेंच सर्व गोष्टी हव्या तशा आपल्याला अनुकूल अशा घडून येणार नाहींत ही त्याला खात्री पटलेली आहे. डंकनच्या खुनाचे जे सादपडसाद उठतील ते अत्यंत गंभीर होतील आणि त्यांना तोंड देणें आपल्याला अशक्य होईल याची त्याला निश्चिति पटलेली आहे. ज्या मार्गानें आपण डंकनला स्वर्गांत पोहोंचविणार आहोंत तोच उपाय आपल्याहि बाबतींत उपयोजिला जाण्याची शक्यता त्याला डोळ्यांआड करतां येत नाहीं. (अङ्क १, प्रवेश ७.) केवळ आपल्या महत्त्वाकांक्षेव्यतिरिक्त डंकनचा खून करण्याचें आपल्याला कांहींहि कारण नाहीं, असें तो स्पष्टपणें म्हणतांना दिसतो.

(" I have no spur — — — — — — —
to prick the sides of my intent, but only
Vaulting ambition, which overleaps itself
And falls on the other. " )

त्याची महत्त्वाकांक्षा त्याला स्वस्थ बसूं देत नाहीं व कुठल्याहि प्रकारचें सबळ कारण नसतांना त्याला डंकनचा खून करण्यासाठीं उद्युक्त करते.

मात्र ही महत्त्वाकांक्षा सिद्ध करण्यासाठीं डंकनचा खून केलाच पाहिजे हा विचार मॅक्‌बेथ्‌च्या मनांत कधीं आला असावा याविषयीं टीकाकारांत मतभिन्नता आहे. नाटक सुरू होण्यापूर्वी मॅक्‌बेथ् पति–पत्नीमध्यें या विषयावर चर्चा झाली असावी, असें लेडी मॅक्‌बेथच्या " what beast was't then,
that made you break this enterprise to me ?
(अङ्क १ प्रवेश ७).

या उद्गारांवरून तार्कितां येतें. मात्र ही चर्चा महत्त्वाकांक्षा कसेंहि करून सिद्ध केली पाहिजे हें निश्चित करण्यापुरतीच झाली असावी. नाटकाच्या सुरुवातीला तीन चेटक्यांची आणि मॅकबेथची भेट होण्याच्या सुमारास आणि तत्पूर्वी थोडा काळ त्या दुष्ट विचारांचा पगडा मॅकबेथच्या मनावर बसला असावा असें मानावें लागतें. त्यावांचून मॅकबेथ व बॅङ्को या दोघांपैकीं मॅकबेथचीच भेट घेण्याचा चेटक्यांचा निश्चय, मॅकबेथ व चेटक्या यांच्या उद्गारांतील सूचक साम्य, आणि मॅकबेथ विषयीं त्यांनीं दाखविलेला पक्षपात या घटनांची सुसंगति लागणें कठीण आहे. वाईट विचारांना अनुकूल अशी जागा एकाद्याच्या मनोभूमींत आढळल्यावांचून बाह्य वस्तूंनीं वाईट कृत्याविषयीं दिलेल्या प्रेरणेचा परिणाम होणें शक्य नाहीं. अत्यंत सद्‌गुणी व नम्र सेवक असलेल्या मॅकबेथमध्यें चेटक्यांच्या भविष्य कथनामुळें एकाएकीं बदल झाला व तो वाईट विचारांकडे धाव घेऊं लागला, असें मानणें मानवी स्वभावाविषयींच्या अज्ञानाचें द्योतकच मानावें लागेल ! राज्यपदाविषयींची त्याची आकांक्षाच जेव्हां भविष्याच्या रूपानें त्या चेटक्यांनीं बदवून दाखविली आणि त्यांनीं वर्तविलेल्या तीन भविष्यांपैकीं दोन भविष्यें सत्यसृष्टींत आलेलीं जेव्हां त्याला आढळलीं, त्याचवेळीं राजा होण्याचें आपलें ध्येयहि शक्यतितक्या लवकर आणि खुनासारख्या मार्गाचा अवलंब करूनच सिद्ध करावें, असा विचार तो

My thought, whose murder yet is but fantastical,

Shakes so my single state of man that function–

Is smother'd in surmise and nothing is
But what is not. "
(अङ्क १, प्रवेश ३).

या शब्दांत मनाशीं बोलून दाखवितो. याठिकाणीं त्यानें 'खून' हाच शब्द स्पष्टपणें वापरलेला आहे. अर्थात् ध्येयपथावर जाण्याचा मार्ग निश्चित झाला तरी निरनिराळ्या कारणामुळें पुनः पुनः त्याचा निश्चय डगमगूं लागतो. आणि शेवटीं स्वतःच्या पत्नीच्या दाहक उपालम्भांनीं जर्जर झाल्यामुळें त्याचें अव्यवस्थितचित्तत्व नाहींसें होऊन खुनाची कामगिरी तो स्वीकारतो व सफलतेनें पार पाडतो.

याशिवाय असाहि एक प्रश्न नेहमीं उपस्थित करण्यांत येतो कीं, स्वतःच्या पत्नीच्या उत्तेजनांवाचून खुनाचें कृत्य मॅक्‌बेथ्‌नें स्वतःच्या हिंमतीवर पार पाडलें असतें काय ? याचें उत्तर शोधण्यासाठीं पूर्वग्रहनिरपेक्ष वृत्तीनें

त्याच्या स्वभावाविषयीं विचार केला पाहिजे. याबाबतींत त्याच्या पत्नीनें त्याच्याविषयीं काढलेल्या उद्गारांना महत्त्व द्यावें लागेल. आपला पति महत्त्वाकांक्षी असला तरी पापभीरू आहे. त्याची सदसद्विवेकबुद्धि जागृत आहे. आणि यामुळेंच महत्त्वाकांक्षा साध्य करण्यासाठीं डंकनचा खून करणें हा जो तिच्या मतें अत्यंत जवळचा मार्ग तो अवलंबांत आणण्यास आपला पति धजावणार नाहीं अशी भीती तिला वाटते. कारण सहानुभूतीनें आणि मानवतेच्या प्रेमळ भावनेनें ओथंबलेल्या त्याच्या स्वभावाच्या असलें भीषण कृत्य अगदीं विरोधी आहे, अशी तिची भावना आहे. (अङ्क १ प्रवेश ४). मॅक्बेथ्च्या स्वभावाविषयींचें तिचें हें निदान बरेंचसें अचूक असण्याचा संभव आहे. कारण आयुष्याच्या महत्त्वाच्या कालखंडांत तिनें त्याला साथ दिलेली आहे सुखदुःखांचे अनुभव दोघांनीं एकत्र घेतलेले आहेत. पण मॅक्बेथ्चे स्वतःचे उद्गार व त्याचें वर्तन त्याच्या पत्नीच्या या निदानाला पूर्णपणें प्रतिकूल आहे. ती समजते त्याप्रमाणें तो सहृदय, पापभीरू आणि प्रेमळ मनुष्य नाहीं हें सहज दिसून येतें. तिचें साह्य वा प्रेरणा मिळाली नसती तरी त्यानें आपली महत्त्वाकांक्षा साध्य केलीच असती असें तिच्याच उद्गारांवरून निश्चितपणें सांगतां येते. पण भरधांव दौड करणारी त्याची तरल कल्पनाशक्ति आणि त्याचें डळमळीत मनोधैर्य यांचा विचार केल्यानंतर पाठीमागच्या प्रेरणेवाचून डंकनचा खून करूनच त्यानें आपली आकांक्षा सफल केली असती असें निश्चितपणें म्हणवत नाहीं.

मॅक्बेथ्च्या स्वभावाचें हेंच निरीक्षण आपण आधिक सूक्ष्मपणानें करून त्याच्या साह्यानें त्यानें केलेल्या भीषण कृत्यांचें परिशीलन करूं. ज्या मार्गानें आपण महत्त्वाकांक्षा परिपूर्ण करावयास निघालों आहोंत तो मार्ग चांगला नाहीं हें त्याला स्वतःलाहि पटलें आहे. डंकनसारख्या सालस राजाच्या खुनाची प्रतिक्रिया चांगली होणार नाहीं हें त्याला पूर्णपणें ज्ञात असल्यानेंच त्याचा खून करण्याविषयीं त्याची बुद्धि स्थिरता पावत नाहीं. मात्र डंकनच्या केवळ खुनानेंच आपल्याला यशःश्री माळ घालणार असेल तर तें भीषण कृत्य करण्यासहि त्याची तयारी असल्याचें, It were well

It were done quickly; if the assassination
Could trammel up the consequence, and catch,
With his surcease, success. "

(अङ्क १, प्रवेश ७.)

या उद्गारांवरून व्यक्त होतें. डंकनचा खून करून आपण राज्यारोहण केलें तर त्याची सामाजिक प्रतिक्रिया प्रतिकूल होईल; आपल्याला आतांपर्यंत जी कीर्ति मिळाली आहे तीवर यामुळें क्षणार्धात बोळा फिरविला जाईल आणि आपल्याविषयींचें लोकांचें चांगलें मत नाहींसें होऊन साऱ्या जगांत आपली नाचक्की होईल याची त्याला भीति वाटते. शिवाय या प्रयत्नांतील अपयशाचा संभवहि त्याला डोळ्यांआड करता येत नाहीं. म्हणजे त्याच्या भीतीचें, मानसिक गोंधळाचें स्वरूप नैतिक नसून सामाजिक आहे. तथापि ही सामाजिक भीति व्यक्तवीत असतांना अधूनमधून त्याची सदसद्विवेक बुद्धि जागृत असतांना दिसते. आपल्याकडे पाहुणा म्हणून आलेल्या आणि आपला राजा असलेल्या डंकनचा खून करणें तर निंद्यच; पण खून होत असतांना त्याचा प्रतिकार करणें हें आपलें कर्तव्य असल्याविषयींचा नैतिक विचार क्षणभर कां होईना, त्याच्या मनाला स्पर्शून जातो. पण तो क्षणभरच ! त्या विचाराचा परिणाम त्याच्या कृतीवर होतांना दिसत नाहीं. आणि म्हणूनच या क्षणिक नैतिकतेचें मूल्यहि क्षणिकच ! केवळ खुनापर्यंतच नव्हे तर नंतरहि संपूर्ण नाटकभर मॅक्बेथ्चें हेंच चित्रण अधिक परिणत स्वरूपांत दिसतें. माणसाच्या रक्ताची चटक लागलेल्या व्याघ्राप्रमाणें तो खुनामागून खून करीत जातो व आपला जवळ येत जाणारा अंत अधिक भीषण करण्यास स्वतःच मदत करतो. डंकनच्या पाठोपाठ तो बॅङ्कोचा खून करतो, स्वतःचें आधिपत्य न मानणाऱ्या मॅक्डफ्चा सूड म्हणून तो त्याच्या पत्नीचा आणि मुलाचा अत्यंत निर्घृणरीतीनें मारेकऱ्यांच्या साह्यानें वध करवितो. आपल्या राज्यांत आपल्याविरुद्ध ब्र काढणारा मनुष्य जिवंत राहूंच द्यावयाचा नाहीं असाच त्यानें निश्चय केलेला आहे. आपल्या प्रजेला अत्यंत वाईट तऱ्हेनें वागवून आपल्या जरबेंत ठेवलें आहे. त्यामुळें पुष्कळसें सरदार उघडपणें शत्रूला जाऊन मिळाले, आणि जे राज्यांतच राहिले त्यांचाहि कल अन्तःस्थपणें मॅक्बेथ्च्या विरुद्धच होता.

अशा प्रकारें प्रारंभीं पराक्रमी पण नम्र सेवक म्हणून वावरणारा मॅक्बेथ् नंतर जुलमी हुकुमशहा ( Tyrant ) म्हणून वावरतांना दिसतो. राजा म्हणून त्याच्याविषयीं प्रजेमध्यें कोणालाहि प्रेम वा अभिमान वाटतांना दिसत नाहीं; आहे तो भीतियुक्त आदर! चौथ्या अंकाच्या तिसऱ्या प्रवेशांत मॅक्डफ् आणि रॉस या दोन सरदारांनीं मालकमजवळ मॅक्बेथ्च्या कारकीर्दीचें वर्णन केलें आहे तें वरील पुराव्यालाच पाठिंबा देतें. मॅक्बेथ्च्याविरुद्ध असणाऱ्या सरदारांनीं केलेलें वर्णन म्हणून त्याचें मूल्य कमी ठरत नाहीं. उलट खुद्द नाटककारानेंच 'मॅक्बेथ्' ही शोकान्तिका घडविण्यासाठीं विरोधी पार्श्वभूमि म्हणून हें वातावरण हेतुपुरस्सर उभें केलेलें आहे. ही आहे मॅक्बेथ्च्या दुष्कृत्यांची नामावली! या दुष्कृत्यांच्या रूपानें मॅक्बेथ्नें आपलें थडगें आपल्याच हातांनीं बांधलें आहे! त्याच्या विनाशाला दुसरा कोणीहि उत्तरदायी नाहीं. डंकनच्या खुनापर्यंत त्याच्यांत अधूनमधून सदसद्विवेकबुद्धि जागृत असल्याचा प्रत्यय येई. पण नंतर तीहि पूर्णपणें लुप्त झालेली आहे. आतां, या मॅक्बेथ्च्या चित्रणांत असे कोणते सद्गुण आहेत कीं, ज्यामुळें त्याचें व्यक्तिमत्त्व लोभस वा आकर्षक बनावें किंवा त्याच्या मृत्यूबद्दल वाचकानें चार अश्रू ढाळावेत? कांहींहि नाहींत हेंच याचें उत्तर! अशा मॅक्बेथ्विषयीं सहानुभूति वा आत्मीयता वाटणें दूरच राहिलें; उलट त्याच्याविषयीं वाचकाला शेवटीं पूर्णपणें तिरस्कार वाटूं लागतो. आणि नाटकाच्या शेवटच्या दृश्यांत मॅक्डफ् हा मॅक्बेथ्चें शिर घेऊन प्रवेश करतो त्यावेळीं रंगभूमीवरील सर्व पात्रांप्रमाणें प्रेक्षकहि सुटकेचा निःश्वास सोडतो आणि असा जुलमी मनुष्य नाहींसा झाल्याबद्दल आनंदच व्यक्त करतो. आणि असें असेल तर ही शोकान्तिका कुठली? ज्या नायकाच्या मृत्यूमुळें फार मोठें नुकसान झाल्याची भावना वाचक-प्रेक्षकांच्या अन्तःकरणांत निर्माण होऊं शकत नाहीं, ज्याच्या मृत्यूविषयीं सहानुभूति वा सहसंवेदना वाटत नाहीं त्या नाटकाला 'शोकान्तिका' म्हणणें म्हणजे 'शोकान्तिका' या शब्दाच्या व्याख्येची थट्टाच केल्यासारखें होईल. थोडक्यांत, मॅक्बेथ् या नायकाच्या दुर्दैवी अन्ताविषयीं वाचक-प्रेक्षकांना सहानुभूति वाटायला लावण्यांत शेक्सपीयरला पूर्ण अपयश आल्यानें 'मॅक्बेथ्' ही यथार्थपणें शोकान्तिका होऊंच शकत नाहीं. त्याविषयीं सांगावयाचेंच झाल्यास एका टीकाकाराणें म्हटल्याप्रमाणें "'Macbeth' is a study in pure Villainy!" असेंच सांगावें लागेल!!

◆ ◆ ◆

# गुलाब

नलिनी वैद्य, बी. बी. ए.,

अशी एक सकाळ उजाडेल....
ज्यावेळीं 'मी' नसेन.
आणि तरीहि
—तरीहि क्षितिजावर रंग असतील,
रंग पुसून हवा कुन्द करणारें
धुकें असेल,
आणि धुंद झालेल्या तुझ्या
ओठांत असेल चिरूट!
हें 'असें' असावें हें मला मान्य नाहीं.
मी नसतांना—
जगांत सुख-शान्ति सौंदर्य नांदावें...
ही कल्पनाच सोसत नाहीं.
वाटतें—
हिरवळी करपून जाव्या
रंग वितळून जावे
धुक्याला आग लागावी
आणि चिरूटाच्या उंची द्रव्यांसह तुझें व्हावें भस्म!
—आभाळ कोसळावें
माझ्यासह या जगाच्या ठिकऱ्या ठिकऱ्या उडाव्या
विनाशाच्या लाटा उठाव्या
आणि अनस्तित्वाच्या सर्वव्यापी समुद्रांत
सारें सारें बुडून जावें.
पण—सर्वस्वान्ताच्या त्या क्षणीं—
तुझ्या—माझ्यांतील जगाला जोडणारा
कोंवळा धागाहि...
नाहीं रे—
जगांत एकतरी गुलाब असा असूं दे—
कीं ज्याच्या मुळाशीं
या देहाची रक्षा असेल.

# ☆ असं वाटतं....पण.... ! ★

आशा देशपांडे, सी. बी. ए.

वाटतं, जीवनाच्या या चाकोरींतून बाहेर पडावं, नियमांचे बंध झुगारून देऊन, अनिर्बंधपणाच्या अनिर्वचनीय आनंदानं, मदभऱ्या दृष्टीनं जगाकडे निरखून पहावं, त्या जगाच्या किळसवाण्या चित्रावर पडदा पाडून त्याचं लोभस, गोजिरं आणि देखणं स्वरूप पहावं—इतकं इतकं पहावं कीं नेत्रांच्या अपूर्वत्वाची जाणीव व्हावी, स्वतःचं भान विसरून जावं, हृदयांतल्या संपूर्ण सौंदर्यदृष्टीच्या कसोटीस पूर्णतया उतरूनहि तिच्यांत न उतरल्याचं समाधान लाभावं.

पण,...पण ही चाकोरी इतकी भक्कम आहे कीं तिच्यांतून बाहेर पडण्यास मार्गच दिसत नाहीं. नीतिनियमांचे बंध इतके शिथिल नाहींत, कीं जे तोडल्यानं अनिर्बंधपणाच्या अनिर्वचनीय आनंदाचं मनमुराद सुख मिळेल. तसंच जगाच्या वाईट गोष्टींवर पडदा टाकायलाहि येणार नाहीं. कारण जगाचं सौंदर्य फारच क्वचित् दृष्टिगोचर होतं. नेहमीं नेत्रांना दिसतं तें जगाचं भीषण न् भयानक स्वरूपच ! मग सतत तेंच डोळ्यासमोर दिसणाऱ्या त्या दृश्यावर पडदा तरी कसचा टाकायचा आणि कसा टाकायचा ?

हें मनाला कळतं, पण वळत नाहीं. तरीहि एक दिवस मन बंड करून उठतं, अन् असं वाटतं, वाऱ्याच्या मंद झुळकीबरोबर मी झोके घेईन, माझा सुगंध दुसऱ्यांना देईन, वृक्षावरच्या माझ्या सौंदर्याचं मी प्रदर्शन करीन, सूर्याबरोबर हंसेन आणि प्रेमळ अशा चंद्राला पाहिल्यावर लाजेन, अशा प्रकारचे मनोरे बांधणाऱ्या स्वैरविलासी, एकल्या व आपल्याच तंद्रीनं धुन्द झालेल्या पुष्पाप्रमाणं हंसावं, नाचावं, बागडावं, वृक्षवेलींशीं हितगुज अन् कानगोष्टी कराव्या, आम्रवृक्षासारख्या वृक्षराजाशीं प्रणयालाप करावेत, वसंताच्या धुन्दीची उटी अंगप्रत्यंगाला मारवावी, हिरव्या चंपकाचा गहिरा व मादक सुवास अंतर्बाह्य दरवळावा आणि मदिराक्षीप्रमाणें मस्त बनून जगाकडे नजर टाकावी.

पण स्वैरपणें वायुलहरींशीं हितगुज करणाऱ्या, नर्तन करणाऱ्या पुष्पाला कोणी चांडाळ खुडतो आणि कुस्करून टाकतो, पायदळीं टाकून त्याला निर्माल्य करतो. कोणी कृष्णमेघ आकाशांत डंवरतो आणि माझं सूर्याबरोबरचं हंसणं पार मावळून जातं व चन्द्राला पाहिल्यावर वाटणारी लाजहि त्या काळ्याकुट्ट मेघामुळें नष्ट होते. आम्रवृक्षाशीं प्रणयालाप करायला जावें तों हेमन्त येऊन त्याचं सौंदर्य पिकून टाकतो. वसंताच्या उटीचं मालन करतांना ग्रीष्म चटके देतो. आणि हिरव्या चंपकाचा सुगंध दरवळणार इतक्यांत अग्नि त्याचा दाह करतो.

तरीहि, त्या दाहाची भीति न मानतां, असं वाटतं की, सतारीच्या मंद्र षड्जांत आपला षड्ज लावावा. सप्तसुराच्यांत इतकं मिळून जावं कीं त्या व्यतिरिक्त दुसरं अस्तित्वच आपल्याला राहूं नये. त्या बेफाम अवस्थेंतच जोगिया आळवावा. त्याच्या करुण स्वरांनीं हृदयाची आर्तता इतकी वाढवावी कीं त्या आर्ततेला सीमाच नसावी. त्या आर्तस्वरांनीं प्रियकराला साद घालावी. अन् म्हणावं, 'पिया के मिलनकी आंस !' पियाची ती ओढ इतकी अनावर व्हावी कीं शेवटीं पियाच्या मिठींत राहूनहि अतृप्तच राहावं, तृप्ति होऊं नये, अतृप्तीचंच समाधान नित्य लाभावं.

पण सतारीच्या तारा एकांत एक मिळविण्यासाठीं खुंट्या पिळाव्या तो मूळ षड्जाची तारच तुटून जाते. मग कुठचा जोगिया अन् कुठें पियाच्या अनावर ओढीचं सुख ? उलट मिठीच्या अतृप्तीचं समाधान न मिळाल्यामुळं मन अतृप्तच राहतं.

तरीसुद्धां पायलांचा छन् छन् रव ऐकूं येतो. तबल्याचा धाधिंधिंधा असा मादक शब्द कानावर पडतो. अन् वाटतं कीं, इतकं नाचावं इतकं नाचावं कीं पुढचं कांहीं घडूंच नये; पायाचा ताल कधीं थांबूच नये, कटीचं लवणं कधीं नष्ट होऊं नये, आणि हातांची

अंजालि कमळाची एकेक एकेक पाकळी उमलते त्याप्रमाणें अर्धस्फुट व एकेक एकेक अंगुलीनं उघडावी.

पण पैंजणांची छन् छन् ऐकूं येण्यापूर्वीच कर्णकर्कश तुतारी वाजते. तबल्याचे धाधिंधिंधा बोलहि तसेच घुटमळून स्तब्ध होतात. आणि मग नेमकं नको तें घडतं. पायहि अडखळतात अन् नाचणं थांबतं, कटिभाग लवत नाहीं आणि हातांची अंजालि उमलण्यापूर्वी मिटतच नाहीं.

असं वाटतं कीं दूर कुठुन तरी दुडुदुडु धावण्याचा आवाज ऐकूं यावा, मंजुळ आणि लाडक्या स्वरांतील बोबड्या बोलांनीं हृदयाला गुदगुल्या व्हाव्या, अन् इवलेच पायांना नाजूक अन् लहानशा हातांचा विळखा बसून एखाद्या लबाड आणि लाडक्या चेहऱ्यानं आतुरतेनं आपल्याकडे बघावं, आपणहि त्याला उचलून घेऊन अमृताचा, वात्सल्याचा इतका वर्षाव करावा कीं त्यांतून परत निसटतांच येऊं नये. अन् असं वाटतं कीं गोऱ्या गोबऱ्या, लालचुटुक ओठांचा आणि गालांचा गोड छळ करावा. इवल्या इवल्या मुठी हातांत घेऊन नाचवाव्यात आणि....आणि प्रेमपान्ह्यानं त्या कोमलशा तंनूला मनसोक्त न्हाऊं घालावं.

पण कान मोठ्या आतुरतेनं टवकारावेत, तर दुडदुड धावण्याचा आवाजच येत नाहीं. बोबड्या बोलांनीं अंग शहारून जाईल म्हटलं तर ते बोलच ऐकूं येत नाहींत. चुंबनांचा, वात्सल्याचा सारा बांध फोडावासा वाटतो. पण जीवर तो वर्षाव करायचा ती गोजिरवाणी लाडकी, इवलीशी मूर्तीच कुणीतरी फोडतं. अंगाई गीत गाऊन प्रेमपान्ह्यानं न्हाऊं घालावं म्हटलं तर पान्हा आणि शब्द यांचा प्रवाह फुकटच जातो. कारण...कारण पाळणा रिकामा असतो.

अन् हे प्रभो, शेवटीं असं वाटतं कीं तो प्रेमाचा बांध भक्तीनं अडवावा. आणि तुझ्या ठायीं संपूर्णत्वानं विलीन व्हावं; निदान त्याच्यासाठीं मोठी ओढ मनांत बाळगून आपलं तनमनधन त्याला अर्पण करावं.

पण ही इच्छा कधींच पुरी होत नाहीं. कारण शरीर रोगांनीं केव्हांच ग्रासून खुळंपागळं झालेलं असतं आणि चिन्तेच्या प्रवाहांत मन गटंगळ्या खाऊन खलास होतं. मग हे प्रभो, तुझी पूजा अशाप्रकारें करून सर्वस्वाचा तुला नैवेद्य दाखवावा अशी इच्छा असूनहि ती पूर्ण होत नाहीं. आणि मनाशीं योजलेली ही पूजा तशीच अर्धवट सोडून जावं लागतं. प्रभो माझी पूजा अव्हेरायचं कारण सांग ना ?

* * *

## कां ?

आशा देशपांडे, सी. बी. ए.

पण जिंकून धनूचा
कां तूं वरिलें मजला ?
वनवासीं रावणें, कां
पळवितां शोक केला ?
नको गर्व वाहूं फार
एकवचनीपणाचा—
करीं धरूनी माझा कर
घेतलेल्या शपथेचा...
साक्ष तिला अग्नीचीहि
ज्याची साक्ष शुद्धतेची
...भंग केला तुवां तिचा
जणुं धनु विवाहाचा
व्यर्थ कशासी बोलला
'प्रेम माझें सीतेवरी ?'
दूरीं करावयाचें जें...
घेतलें कशाला उरीं ?
वनांतील कष्टदिनीं
निष्ठामय केलें प्रेम
त्याचा करूनी अव्हेर
बन्द केलें तूंच धाम.

C Company. 2nd Bombay Bn. N. C. C.



श्री. कैलास दाते



सौ. ज्योत्स्ना देवधर



श्री. देशपांडे एस्. आर्.



व्यक्तिशः प्राविण्य पदकें मिळविणारे विद्यार्थी १९५८–५९.



आंतरमहाविद्यालयीन क्रिकेटलीग विजयी संघ १९५८-५९.



श्री. निंबाळकर एस्. एन.



★

श्री. कदम ए. बी.



# माडळगूळकरांचा ‘ माणदेश ’

बाळ आपटे, पी. डी. आर्टस्, सी.

### ☆ उपोद्घात :

“ अस्सल, जातिवंत, वस्तुनिष्ठ ग्रामीण कथा मराठींत प्रथम व्यंकटेश माडगूळकरांच्याच लेखणींतून अवतरलेली आहे. ” असें मत प्रा. अ. ना. देशपांडे यांनीं ‘ मराठी वाङ्मयाच्या इतिहासां ’ त नमूद केलें आहे. माडगूळकर हे ताज्या दमाच्या मराठी साहित्यिकांत ‘ कथालेखक ’ म्हणून मान्यता पावले आहेत. त्यांनीं मराठी नवकथेवर स्वतःचा असा एक ठसा उमटविला आहे. ‘ त्यांचें कथालेखन प्रादेशिक कथावाङ्मयाची प्रतिष्ठा वाढविण्यासहि कारणीभूत झालें आहे’ असा प्रा. देशपांड्यांचा अभिप्राय आहे. त्यांचा प्रदेश ‘माणदेश’ हा आहे आणि तो त्यांच्या लेखनामध्यें कसा दिसतो, हें पाहणें, हा प्रस्तुत लेखाचा विषय आहे.

### ☆ माणदेश :

हा त्यांचा ‘ माणदेश ’ कसा आहे, हें त्यांनींच ‘ माणदेशी माणसं ’च्या ‘ तिसऱ्या आवृत्तीच्या निमित्तानें’, सांगितलें आहे. रख्ख ऊन, भका भका उडणारी धूळ, मोठमोठीं माळरानें असेंच या प्रदेशाचें स्वरूप आहे. माणदेश हा एक तहाजनेजलेला अन् भुकेलेला मुलूख आहे. ‘दाण्या’चा प्रश्न हा फार मोठा प्रश्न समजला जातो. दुष्काळ पांचवीला पुजलेला आहे. दारिद्र्य फड्या निवडुंगासारखें माजून राहातें पण अशाहि स्थितींत येथील माणसें चिवटपणें जगत असतात. देवाधर्मावरची, माणसाच्या चांगुलपणावरची त्यांची श्रद्धा वाढती असते. जीवनाची खोली व पसारा यांना जणूं पूर्ण कळला आहे, अशी भाषा त्यांच्या तोंडून बाहेर पडते. असें हें, माडगूळकरांच्याच शब्दांत, माणदेशाचें वर्णन आहे. हेंच त्यांच्या कथांमधून कसें व्यक्त होतें तें आपल्याला पाहावयाचें आहे.

### ☆ ग्रामीणता :

माडगूळकरांचा ‘ माणदेश ’ म्हणजे माणनदीच्या कांठची औंध संस्थानांतील बत्तीस खेडीं होत. साहजिकच त्यांच्या कथांना ही खेड्याची पार्श्वभूमि लाभली आहे. त्यांतून वावरणाऱ्या व्यक्ति प्रामुख्यें-करून खेडवळ आहेत. ना विद्वान्, ना साक्षर, ना श्रीमंत, ना नागरी, अशा बहुतेक सर्व उपेक्षित आणि समाजाच्या खालच्या थरांतल्या आहेत. दारिद्र्य आणि अज्ञान हे त्यांचे जन्माचे सोबती आहेत. बहुतेक जण उघडेवाघडेच आहेत—फक्त पंचा लावून वावरणारे ! ‘ कुठं शिकून अम्मलदार व्हायाचं आपनास्नी ! पेटूं दे ती साळा; व्हा तूं आपला घरीं.’ अशी यांची विचार-सरणी आहे. देवी टोंचून घ्यायला सांगणाऱ्या मास्तराला ‘ मी त्याचा बाप, तो जास्ती कसा जगेल हें बघीन. तुम्ही फक्त त्याला चार अक्षरें शिकविण्याचें करावें. ’ असा उपदेश करणाऱ्या बापाचें अज्ञान खेड्यात सर्वत्र आहे. उंबऱ्यावर बसूं नये, रात्रीं बांसरी वाजवूं नये, बोडक्या बायानीं ती ऐकूं नये, टोंचल्यानें सांथी जात नसतात, बाप आजा जगला म्हणून आपणहि जगणार, अशा एक ना दोन, हजारों वेडगळ समजुती व रूढी या समाजांत ठाण मांडून बसल्या आहेत.

तशीच अस्पृश्यताहि अजून तग धरून आहे. पिढ्यान् पिढ्या चालत आलेल्या संस्कारांचा पगडा स्पृश्यांप्रमाणेंच अस्पृश्यांच्याहि मनावर कायम आहे, नामा मास्तर झाला तरी मांग आहे, म्हणून हॉटेला-बाहेरच्या बाकावर बसून अस्पृश्यांसाठीं ठेवलेल्या कपबशींतून चहा घेतो. रामा मैलकुली, अम्मलदार ‘ बामन ’ म्हणून त्याच्या जेवणाच्या डब्याला शिवण्यास कचरतो; ढोरांना पिण्यासाठीं काढलेल्या पाटांतल्या पाण्यांत हातपाय धुतो, आणि वाफ्यांतलें पाणी पितो.

तशीच त्यांची देवाधर्मावर अन् भुतांखेतावर श्रद्धा आहे. ‘गांवाकडच्या गोष्टीं’ मध्यें याचें प्रत्यंतर सांपडतें. गांवांत आलेल्या वानराला ‘मारुती’ समजून ‘निवद्य’ दाखविण्यास लोक तयार होतात. पण तो वानर सर्वांना पिसाटल्या कुत्र्याप्रमाणें चावूं लागतांच तरणी पोरं

त्याला मरेस्तोवर मारतात. आणि तो मेल्यावर 'झाल्या अपराधाबद्दल क्षमा कर' म्हणून मारुतीची विनवणी करीत, टाळमृदंग आणून रामनामाचा गजर करीत मानसन्मानानं ओढ्यावर आणून माणसासारखा जाळतात अन् वर समाधी बांधतात. ( मारुतराया. ) मारुतीच्या पायरीला हात लावून खोटं बोलायचं म्हणजे मोठी आफत. घरांतलं माणूस दगावेल, बोलणारा स्वतः मरेल किंवा खोपटाला एकाएकीं आग लागेल, अशी त्यांची श्रद्धा असते. म्हणून हऱ्या मांग तसें करण्यास कचरतो. "जर त्यानं मारुतीची पायरी शिवून सांगितलं कीं 'मीं कालवड चारली न्हाई' म्हणून, तर माजं नुकसान आलं भरून" असं सता म्हणतो. (न्याय). भुतांवरील विश्वासामुळंच, 'भुताचा पदर' या कथेंतील नाना बामण, आडमार्गानं पैसा मिळवूनहि 'भुताच्या पदरा'नं घर भरलं, म्हणून थाप ठोकतो, ती लोकांना पटते. धोंडी लॅगऱ्यापाशीं 'पित्रं' आहेत, तीं त्यानं कोंकणांतून जबर रक्कम देऊन आणली आहेत अन् शिकारी कुत्र्यां-सारखीं पाळलीं आहेत, त्यांना राबवून घेण्यासाठीं लागणारे मंत्रतंत्र लॅगऱ्याला माहीत आहेत; अशी त्यांची समजूत आहे. ( करणी )

अशाप्रकारें नुसतीं माणसें ग्रामीण आहेत असें नव्हे तर वातावरणहि ग्रामीण आहे. शाळा चालू असूनहि झेल्या 'वड्यांत चिंचा' पाडायला जातो; मास्तरांच्या देखत मुलांना 'चल कीं साळंबाहर, जीवच घेतो तुजा!' म्हणून दटावतो. मुलांना गप्प बसावयास सांगून नामा मास्तर 'पाव्हण्या' बरोबर चहा पिण्यास हॉटेलांत जातो. चहाची काळीशार पूड पाण्यावर तरंगते. पातेल्यांतून निघणारी वाफ शेजारीं भांड्यावर ठेवलेल्या परातींतील शेवचिवड्याचा तेलकट वास बरोबर घेऊन तरंगू लागते. काळपट फडक्यांतून गाळलेला चहा कानतुटक्या कपांतून पुढें येतो.

बाप आपल्याच मुलाला 'गाढवीच्या' म्हणतो, अन् त्याच्या देखत मास्तरला अरेजारे करून त्याची ( मास्तराची ) अक्कल काढतो. बापाला मुलें अरेजारे करतात.

या सर्वांमधून माडगूळकरांच्या कथांतील ग्रामीणता दिसून येते. ग्रामीण वातावरण निर्माण करण्यांत ते यशस्वी झाले आहेत. आणि माणदेशी बोलीच्या वापरा-मुळें तें ग्रामीण वातावरण अकृत्रिम आणि परिणामकारक झालें आहे. 'ग्रांथिक भाषेपेक्षां बोली ही जास्ती जिवंतपणें अन् रसरशीतपणें अनुभव व्यक्त करूं शकते. ती शुद्ध आहे कीं अशुद्ध आहे, हा विचार कलेच्या संदर्भांत अप्रस्तुत ठरतो. इथें ती योग्य आहे, अप-रिहार्य आहे.''

## ☆ विविधता :

वरवर पाहणाऱ्याला खेड्यांतील माणसें, त्यांची राहणी, त्यांचे परस्पर संबंध एवढेंच नव्हे तर सर्वांची मनःप्रवृत्तिसुद्धां एकच भासेल. पण सूक्ष्मतेनें पाहणाऱ्याला त्या माणसांमधील, त्यांच्या राहणींतील, परस्परसंबंधांतील व मनःप्रवृत्तींतील फरक स्पष्टपणें जाणवतो. 'पिण्डेपिण्डे मतिर्भिन्ना' हें पटतें. माडगूळकरांचीं 'माणदेशी माणसें 'हि अशींच वैचित्र्यानें नटलेलीं आहेत.

धनी स्वतः आपल्या घरीं आला व आपण त्याच्या-समोर जेवत आहोंत म्हणून 'अपराध्यागत चेहरा' करणारा धर्मा, आणि मालकावर 'वाघासारखा गुर-गुरणारा' अन् त्याला दटावणारा कोंडिबा; कधीं न मिळणारे खाण्याचे पदार्थ मिळाले असतां न खातां, लहानग्या भाच्यासाठीं राखून ठेवणारा रामा, आणि वेडसर पुतण्याकडून अर्धपोटीं काम करवून घेऊन त्यालाच डागणारा बकसचा चुलता; पोटापायीं चोरींत भाग घेऊन 'जल्मांतनं उटलेला' शिवा, अन् मुर्दाडपणें लोकांना नागवून-फसवून चैन करणारा बेरकी शिदा; चार आठ आण्यांसाठीं लाचार होणारा दळभद्रा रघू आणि 'कशाहि परिस्थितींत रडायचें नाहीं—आपलें रडगाणें कुणापाशीं गायचें नाहीं' अशा स्वभावाचे मानी बिटाकाका; जीवनप्रवाहांत कसेबसे हातपाय हालवीत पण शांतपणें चाललेला धर्मा आणि संसाराला, दारिद्र्याला वितवितून चाललेला रघू; उगीच पांघरलेलें पांढरपेशेपण झुगारून जीवन-प्रवाहाच्या उलट दिशेनें हात मारणारा झुंजार नामा आणि सरळ नाकासमोर चाललेली खाला; या सर्वांमध्यें मानवी बुद्धीला स्तिमित करणारें वैचित्र्य आणि वैविध्य नाहीं, असें कोण म्हणेल? मरेमरेतों काम करूनहि अर्धपोटीं राहणारा, डबडबलेल्या डोळ्यांनीं एकाकी बसलेला भाबडा बकस आणि छम् छम् छडीनें माणुसकीचा प्रत्ययच न आल्यानें गांवभर उनाडक्या करणारा, मास्तरांच्या देखत मुलांना दटावणारा अन् मास्तर जातांना रडणारा जिवंत झेल्या; मोडकळून

गेलेल्या खानदानींतहि आतिथ्य अन् दिलदारी अन् इनामदारी खाक्या कायम ठेवणारे बन्याबापू आणि लहानशा अपराधावरूनहि बायकोला झोडपणारा पण पोराला धुसळणाऱ्या अस्वलाला हातहि न लावणारा बाबाखान यांत फरक नाहीं असें कोण म्हणेल ? अशाप्रकारें 'माणदेशी माणसें' खेडवळ जीवनाचा अनेक बाजूंनीं साक्षात्कार घडवितात.

## ☆ विविधतेंतहि एकता :

एवढें वैविध्य अन् वैचित्र्य असलें तरी त्यांतहि एकता आहे. वरवर दिसणाऱ्या या विसंगतींतहि खोलवर दडलेली सुसंगति आहे. हीं सर्व स्वभाव वैचित्र्यानें भिन्नभिन्न वाटणारीं माणसें दारिद्र्याच्या एकाच धाग्यानें अनुस्यूत आहेत. या सगळ्या खेडुतांना चित्रित करतांना खेड्यांत घर करून राहणाऱ्या दारिद्र्याच्या पार्श्वभूमीचा वापर माडगूळकरांनीं केला आहे. धर्मा, रामा, नामा, शिवा, शिदा, खाला, गणा महार, बाबाखान हे सर्व दारिद्र्यरोगानेंच पछाडलेले आहेत. सामान्यतः हे सगळे सद्वृत्त आहेत; पण दारिद्र्यामुळें कांहीं अगतिक बनलेले आहेत, तर कांहीं मुर्दाड बनले आहेत; हा सारा परिस्थितीचा परिपाक आहे. बजेला घरांत ठेवून, फाटक्या वस्त्राप्रमाणें जीर्ण झालेल्या धर्माला म्हातारपणांतहि कष्टविणारें दारिद्र्य ! रामा अन् शिवा त्यांच्या बायका त्यांना सोडून गेल्या असतां 'कुटं बी सुकांत असली म्हणजे झालं' असे अगतिक उद्गार काढतात,त्याला कारण दारिद्र्यच; आणि बायकोनें व्यभिचार केला म्हणून रघूला अफू खायला लावणारेंहि दारिद्र्यच. शिदा लबाडी करतो ती 'पोटापायीं' अन् खाला उतरवयांतहि राबते ती 'पोटासाठीं' च. शिवाला पाप करायला लावून 'जल्मांतनं उटवतें' दारिद्र्यच अन् बाबाखानला अस्वलाला बायको-पेक्षां जास्त किंमत देण्याला शिकवितं दारिद्र्यच. नामाला मास्तरकी सोडून तमाशांत जायला लावण्यांत त्याच्या आवडीप्रमाणेंच दारिद्र्याचाहि थोडा फार हात आहे. तसेंच रामा मैलकुलीला शिक्षण मिळूं न देण्यांतहि दारिद्र्याचा वांटा आहे. सर्वांनाच पोटाचा प्रश्न मेडसावतो आहे. त्याला जो तो आपल्या कुवतीप्रमाणें उत्तर शोधतो आहे. त्या प्रयत्नांत कांहीं धर्मा, रामा, शिवा यांप्रमाणें अगतिक बनून वाहतात; तर कांहीं नामा, गणा महार, खाला, बिटाकाका यांप्रमाणें मानानें व अब्रूनें कसेबसे तगतात; तर कांहीं शिदा, कोंडिबा सारखे मुर्दाड बनतात.

## ☆ व्यापक जीवनदर्शन :

माडगूळकर सामाजिक प्रश्नांसाठीं कधींच लिहीत नाहींत. याचा अर्थ असा नव्हे कीं, ते सामाजिक प्रश्नांकडे दुर्लक्ष करतात. त्यांचा सामाजिक विचार सुटला आहे असें नाहीं. उलट त्यांचें कथाविश्व 'सामाजिक जाणिवे'नें संपन्न आहे. एका व्यक्तीवरून अनेकांच्या व आपल्या जीवनाचा अर्थ जर कळला नाहीं, तर कला वायां जाते. प्रासंगिकांतून शाश्वताचें, एकांतून अनेकांचें दर्शन घडविणारें वाङ्मय अक्षर होय. कोंडिबा आपल्याला आवडत नाहीं; याचें कारण तो संपूर्ण क्रौर्याचा पुतळा दाखविला आहे. त्याच्यांत माणुसकीचा, वात्सल्याचा लवलेशहि नाहीं. माणूस कितीहि क्रूर झाला तरी त्याच्या अंतःकरणांत खोलवर कुठें तरी दयेचा, माणुसकीचा ओलावा असतो. तसाच तो गणा भपस्या. असा आणि इतका छांदिष्ट माणूस समाजांत सहसा आढळत नाहीं.

पण माडगूळकरांच्या इतर व्यक्ति एकएकट्या नसून त्या हजारोंच्या प्रातिनिधिक मूर्ति आहेत. दारिद्र्या-मुळें अगतिक झालेले शेंकडों धर्मा अन् रामा आपल्या डोळ्यापुढें उभे राहतात, तसेच दारिद्र्यानें मुर्दाड बनलेले शिवाहि दिसूं लागतात. 'गरिबाला बायको चांगली असावी, ती नाहीं म्हणून अफू खाणारा रघू एक नसून हजारों आहेत. भोळेपणाचा फायदा घेऊन अर्धपोटीं राबविले जाणारे असंख्य बकस, फसून 'जन्मातनं उठलेले' हजारों अश्राप शिवा माळी अन् दारिद्र्याला वांकुल्या दाखवीत दाखवीत दुर्दैवाच्या आघातांनीं 'आणखी वांकले तर मोडतील' इतकें वांकणारे अनंत बिटाकाका आपल्या मनश्चक्षूंना दिसूं लागतात. त्या झेल्याच्या करुण मूर्तीकडे पाहून अमानुष मास्तरांमुळें शाळेकडे पाठ फिरविणारे अनंत झेल्ये आपणांस एकदम दिसूं लागतात. घरांतल्या माणसांच्या चैनीपायीं झालेल्या 'बोजा'खालीं चिरडले जाणारे 'नेवरे' आणि उच्चवर्णीयांच्या 'आडिटा' पायीं विव्हळणारे 'गोपा व्हरलं;' सरकारी 'विलायती कोंबडी' मटणासाठीं 'चुकून' मारणारे 'पाटील' अन् त्यांच्यावर खेंकसून चांगला 'शेरा' देणारे मामलेदार; हे

व्यवहारांत पदोपदीं आढळतात. आतां झालेल्या चोरीची तालुक्याला वर्दी द्यावी तर पस्तावण्याची पाळी येईल, या व्यापांत आणखी कर्ज होईल, रानामाळांतल्या कामाचा खोळंबा होऊन नुकसान होईल, आणि एवढं करूनहि चोरीचा तपास लागणार नाहीं हें नक्कीच, हें सारं डोक्यांत येऊन 'काय सुदीक गेलं नाहीं' म्हणून ओरडणाऱ्या बाबालालचं शहाणपण मात्र सर्वांमध्यें आढळत नाहीं हें खरें. तसाच, आवाच्या सवा शिव्या देणाऱ्या 'देवी डॉक्टरवर जोडा काढणारा' 'देवा सटव । महार'हि फारसा आढळत नाहीं.

पण असें असलें तरी त्यांचीं बहुतेक माणसें प्रातिनिधिक आहेत. आणि केवळ माणसांचेंच नव्हे तर 'माणदेशी जनावरांचेंहि अंतरंग माडगूळकरांना समजलें आहे हें 'काळ्या तोंडाची', 'एकटा', 'त्याची गाय व्याली' वगैरे कथांवरून समजून येतें. तीं जनावरेंसुद्धां प्रातिनिधिक आहेत. सारांश, माडगूळकरांच्या कथावस्तु 'माणदेशा' पुरत्याच मर्यादित असल्या तरी त्यांतून व्यक्त झालेलें 'जीवन-दर्शन' व्यापक आहे.

तसेंच त्यांचा सामाजिक विचारहि सुटलेला नाहीं. रामा मैलकुली समाजशास्त्रीय गणित घालतो; अचानक मिळालेल्या संपत्तीचा उपभोग आपण कां घेऊं नये, असा प्रश्न आहे. दारिद्र्यांतहि खानदानीपणा टिकविण्याचा आटापिटा करणारे बन्याबापू उदार आहेत, त्यांची दानत सुटलेली नाहीं; मग ते चैनी व अक्कडबाज आहेत म्हणून त्यांना वाईट कां म्हणावें? मुलाला देवी काढून घेण्याचें नाकारणाऱ्या नरसू तेल्याच्या नेणतेपणाला, त्रास देणाऱ्या मारुतरायाची सन्मानानें प्रेतयात्रा काढून समाधि बांधणाऱ्या अंधश्रद्धेला आणि 'करणी' अन् 'भुताचा पदर' यांवर विश्वास ठेवणाऱ्या भाबडेपणाला काय म्हणावें? असें शेंकडों प्रश्न आपल्यापुढें उभे राहतात. अर्थात् त्यावर चिंतन न करतां, तें काम वाचकावर सोंपवून माडगूळकर पुढें निघून जातात. यांतच कला आहे.

### ☆ उपसंहार :

अशाप्रकारें 'माणदेशा'तील माणसांच्या अन् जनावरांच्या मूर्तीतून 'व्यापक जीवनदर्शन' घडविणाऱ्या, अन् खेड्यांतील दारिद्र्य आणि अज्ञान यांचा पार्श्वभूमीसारखा वापर करून 'माणदेशी बोली'च्या साहाय्यानें 'अकृत्रिम ग्रामीणता' निर्मिणाऱ्या माडगूळकरांच्या कथा, 'प्रादेशिक वाङ्मयाची प्रतिष्ठा वाढविण्यास कारणीभूत झाल्या आहेत' हें निर्विवाद होय.

◆ ◆ ◆

*उस्ताद अहंमदजान् तिरखवाँ अर्थात्*

# ☆ ☆ ☆ बोलांचा बादशहा ☆ ☆ ☆

**कु. वासंती वळवडे, ज्यु. बी. ए.**

तबल्यावर पहिल्या सलामीची जोराची थाप पडते, डग्गा डौलानं घुमतो आणि सारंगी लेहेरा धरते. नाजुक बोलांनीं सुरुवात होते आणि बोलांचा भारदस्तपणा हलके हलके वाढत जातो. निर्झराच्या मनमोकळ्या हंसण्याचं सागराच्या दर्पयुक्त खळखळाटांत एकाएकी रुपान्तर झाल्याचा भास होतो. एक निराळंच विश्व आकार घेऊं लागतं......आकंठ उत्सुकतेनें भारून गेल्यामुळें अस्थिर असलेलीं मनं एकदम स्थिरावतात तीं......तबल्यांतून उमटून पडणाऱ्या वैशिष्ट्यपूर्ण बोलांच्या तुकड्यावर, डग्याच्या दिमाखानं भिरवणाऱ्या धुमकारावर! प्रथमदर्शनीचं तबलियाचं डग्यावर विशेष प्रभुत्व आहे, याची साक्ष पटते...सर्वांग श्रोत्रमय होतं आणि नजर खाँसाहेबांच्या बिजलीच्या चपळाईनें हलणाऱ्या बोटांवर स्थिरावते.

उस्ताद अहंमदजान् तिरखवाँ यांचं स्वतंत्र तबलावादन होतं तें! पहिल्या थापेंतच आपल्या निपुण-

तेची खात्री पटविणारा खासा तबलिया हा! आधींच उत्सुक असलेलीं मनं प्रथमतःच साक्ष पटली कीं नम्र होतात...खाँसाहेबांच्या भारदस्त व्यक्तिमत्वानंच श्रोते भारून जातात आणि त्यांच्या कलाविष्काराची प्रतीक्षा करतात...अन् थोड्याच वेळांत सुंदर तोड्यांची उधळण श्रोत्यांवर करावयास खाँसाहेबांचा प्रारंभ होतो.

मनाची अवस्था आकळत नाहीं. वृत्तींचा प्रवास कुठवर चालणार कळत नाहीं. कांहींतरी निराळा-आगळा प्रत्यय जाणवतो आहे. माझ्या मनाची धनुकली तबल्याच्या बोलांवर हळुवारपणें फिरते अन् नादब्रह्माचा आवाज होतो. बोलांच्या प्रवाहांत सांपडून आपण खोल खोल कुठंतरी चाललों आहोंत असं वाटतं आहे....खूप दूरवर...पण मधूनच एकदम तें दूरचं स्थान जवळचं वाटतं...पुन्हां दूरचं...... मनाचा संभ्रम उडतो....कांहींतरी शोधायला जायचं आहे....तें लक्ष्य अज्ञात आहे.....त्याचा वेध घ्यायचा आहे...अन् त्यासाठीं बोलांचं बोट धरूनच गेलं पाहिजे...आपण मागें तर पडणार नाहीं ना...मृग-शावकामागें धांवणाऱ्या शकुंतलेसारखं...अध्वश्रमांनीं थकलेल्या याज्ञसेनीसारखं...असा भास होतो अन् पण ....इतक्यांत—" धा त्रक धिकिट कत धिन् तरान धाधिकत तिटधा, धिडान् तिरकिट तकता तिरकिट धा!" सुसाट वादळाच्या जोरानें बोल तबल्यावर वाजतात ना वाजतात तोंच " धाक्ड धाधिन् ना कत् " नें सम पकडली जाते. आणि प्रवाहांत सांपड-लेलीं मनं दचकून भानावर येतात. पुन्हां ठाय लयीचा हिंदोला हलकेंच हेलकावूं लागतो. जातिवंत कवीच्या नवनवोन्मेषशालिनी प्रतिभेप्रमाणें खाँसाहेबांची बोटं विविध वैशिष्ट्यपूर्ण प्रकारांनीं तबल्यावर कसरत करूं लागतात. सतारीच्या एकाच षड्जाच्या पडद्यावर तार खेंचून एकाच छेडितांत धैवत-निषादापर्यंत स्वर काढावेत, त्याप्रमाणें तबल्यावरच्या एकाच थापेमध्यें अनेक बोल खाँसाहेब सहजतेनें उमटवून जातात. आणि अनेक वेळां वाजवले तरीहि तितक्याच स्पष्टपणें 'तिरकिट धिरकिट, असें बोल निघूं लागतात....' धान् धिकिट' ...' घेत्ता किटधा ' असे भारदस्त बोल आणि ' धिट धिट धिट धिट किडधातिट धागेतिट ' असें गतिमान बोल परस्परांत मिसळून जातात. जणूं जिवा-शिवाची तद्रूपता त्याच्यांतहि निर्माण होते.

खाँसाहेबाची बोल म्हणण्याची ऐट कांहीं औरच! ती प्रत्यक्ष ऐकावी आणि राजहंसाच्या डौलाची सय आली नाहीं तरच नवल!—" धिरकिट तकधा-ता धा, धिरकिट तक धा-ता धा, धिरकिट तकधा—" अन् केवळ ताल-लयीची संज्ञा उरलेल्या श्रोत्यांनीं एक-मुखानें साथ द्यावी...' ता धा '! पण खाँसाहेबांनीं एकदम खुणेचा हात खालीं करावा आणि हंसून सहज-पणें पुढील हलके बोल म्हणावेत—' धिन् ना ना ना,' आणि त्या पराजयांतच श्रोत्यांना अपार आनंद वाटावा. रणवाद्याच्या आवेशानें विनटलेले हे बोल खाँसाहेब स्पष्ट काढून दाखवितात आणि श्रोते सहाजिकच त्याच्यापेक्षां वरचढ जोरदार बोलांच्या अपेक्षेंत असतात-इतक्यांत ' धिक् किटता किटता, धिक् किटता किटता ' असे द्रुत लयींत बोल घेऊन खाँसाहेब श्रोत्यांना चाकित करतात. अपेक्षाभंगांतील आनन्द पुन्हां एकवार मिळतो... कथकली नर्तकाच्या पदन्यासाचा आभास कधीं त्यांतून होतो—तर अनेकवेळां बोलून वाजविलेल्या तोड्यांनीं व पेशकऱ्यांनीं धुंद वातावरण पसरते. उमरखय्यामच्या मादक कैफाची प्रतीति त्यांत खचित आहे. वाटतं, यांतून कधीं बाहेर पडूंच नये-हा उमरखय्यामी विळखा असाच सतत भोंवतीं असावा...पण व्यवहाराला हें पटत नाहीं. शेवटची थाप-अखेरचा धुमकार-अन् निर्विकल्प समाधीची सविकल्पता!

हे तोडे आणि पेशकारे यांत ' दुप्पट-तिप्पट-चौपट ', ' आडी-कुआडी-विआडी ' असे अनेक लयींचे प्रकार होते. खाँसाहेब खरे लयकार आहेत. खंद्या गवय्यानं एक रागिणी आळवीत असतांना दुसऱ्या रागांचे स्वर सफाईदारपणें त्यांत गुंफावेत, तसे एकाच तालांत दीपचंदी,रूपक असे निरनिराळे ताल ते सफाईनें गुंतवून देत आणि अशा अपूर्वाईच्या वेळीं डग्गा ज्या दिमाखानें, डौलानें घुमे, त्याला तर तोडच नाहीं!

खाँसाहेबांची कलाकुसर डोळां भरून देखिली आणि श्रोत्र भरून ऐकिली म्हणजे जी कृतकृत्यता वाटते, ती साकार करायला शब्दांचं सामर्थ्य थिटं पडतं. त्या श्रेष्ठ कलावन्ताची कलेवरील असीम निष्ठा पाहून उरीं दाटून येतं. पुन्हां ते बोल घुमूं लागतात...पुन्हां समेची थाप वेड्या मनाला मागें खेंचते आणि वाटतं कीं...वाटतं कीं, या ब्रह्मानन्दाचा उपभोग घेत असंच त्या नाद-विश्वांत बुडून जावं...खोलवर...खोलवर...इतकं कीं,—आत्मा आणि अहं यांत इवलासुद्धां भेद उरूं नये.

# बा प्या

जी. जी. बडवे, ज्यू. बी. ए.

डेऱ्यांतल्या पाण्यासारखी सकाळ गार होती. त्या गार पाण्यांत बोट धरावं तसा मी उभा होतो. शाईचा कण पाण्यांत पडल्यावर जसा लवचिक आलाप घेतो तसे आकाशांतले निळे ढग शेपट्या वेटाळून तरंगत होते. विहीरीवरील पिवळ्या चांफ्याचा त्या निळ्या पहांटेला वास लागला होता. दूरवर दिसणाऱ्या निळ्या डोंगराच्या रूपानें पहांटेचे खडे होऊन पडत होते. फोंफावलेल्या झाडापानावर व हिरवळीवर गोळीबंद पाण्याचे थेंब धरले जात होते. बैलांच्या गळ्यातील घंट्या-घुंगरामुळं मधूनच पहाट खुळखुळत होती.

परन्तु सगळं वातावरण मला पारोसं वाटत होतं. यथासांग पूजेचं साहित्य असूनहि ब्राह्मणानं मंत्र न पुटपुटता मुक्यानंच पूजा केली म्हणजे ती पूजाच वाटत नाहीं. कांहीं तरी अपुरं, अपवित्र वाटतं मनाला. तशीच वाटत होती ती निसर्गपूजा करीत असलेली पहांट.

विहीरीच्या काळ्याभोर दगडी कट्ट्यावर बसून आंत खड्या आवाजांत कुणी अभंग म्हणत नव्हतं. मधूनच 'इठल! इठल'. ऐकूं येत नव्हतं. धुणं आपटल्याचा आवाज आला नाहीं अन् 'या देवा' म्हणून कुणी हंसलं नाहीं. चारी बाजूंनीं झाडांनीं छप्परलेल्या त्या विहीरीचं वातावरण गूढ गंभीर बनलं होतं. घुमं बसलं होतं.

शेवटपर्यंत बापू कसा होता कुणालाच कळलें नाहीं. परन्तु नागड्या पोरापासून ते थेट कंबरेंत घडी पडलेल्या म्हाताऱ्यापर्यंत सगळे त्याला 'बाप्या' म्हणत. त्याला 'अर्धवट' समजत. वडाच्या गारव्याला पडलेला कुणीहि फाटका माणूस बापूला झोपेंतच 'हाळी' टाकी व कडोसरीचा पैसा सोडून 'खाकी' आणायला भाजलेल्या उन्हांत दोन मैल गांवात पिटाळी. कुणी त्याला मोट धरायला लावावी. कुणी मेंढरामागं पिटाळावं, अन् असली चिल्लर कामं करून घ्यावीत. दुपारीं दमून 'हाफ् हाफ्' करीत बापू झाडाखालीं येऊन बसला कीं त्याला भाकरी द्यावी 'कोरड्यास' द्यावं. कांहीं 'खमंग शिजलं' तर बापूला मुद्दाम सांगावं. वर्षा सहा-महिन्यानं त्याच्या अंगावर फाटकं धडूतं टाकावं. यात्रे-जत्रेला भरल्या गाड्यामागनं कुत्रं व बापू दोघांनींहि चालत जावं. अनेक उन्हाळे पावसाळे बापूनं असे अंगावरच काढले होते. त्याला त्याची संवय झाली होती. गाई म्हशीप्रमाणं त्याचं कातडं तयार झालं होतं.

बापू वेडा नव्हता. वेडेपणाचं कसलंच चिन्ह त्याच्यांत दिसत नव्हतं. त्यानं कधीं कुणाला धोंडा मारला नाहीं. एकटाच हसतांना तो कधीं दिसला नाहीं. चिन्ध्याचे भारे त्यानं कधीं जमविले नाहींत. लहान पोरं बापूजवळ चार चार तास गोष्टी ऐकत बसून राहात. त्यानं कधीं कुणाला दुखापत केली नाहीं कीं, झोपडींतल्या चिपाडाला हात लावला नाहीं.

अनेक रेशमी दोरे लावलेला दिवसाचा झगझगता पांढरा पतंग आकसला जाऊन दोरे पिवळ्या गुंडीला गुंडाळले गेले कीं, सगळे शेतकरी आपली कामं आंखडून अवजारं, जितरापं, घेऊन गाणं म्हणत परतत. बैल-गाड्यांच्या चंगाळ्यांचा, मेंढ्यावकऱ्यांच्या 'ब्यांऽव्यां' चा आवाज सगळ्या आसमंतांत पसरे. अवजारं झोपड्यांच्या भिंतींना पाठ टेकवून विसावत. दमलेली जनावरं भराभरा हिरवं गवत ओरबडत. एक डोळ्याच्या पणतीच्या प्रकाशांत भाकऱ्यांची 'थप् थप्' ऐकूं येई. मेंढ्यांच्या धारा चरवींत 'चर, चर' वाजूं लागत. पोटांत खड्डा पडलेलीं माणसं गरम गरम भाकऱ्या व मेंढ्यांचं दूध मुरगाळून ढेकरा देत बाहेर पडत. डाव्या काखेला घोंगडं मारून हळूहळू वडाच्या पारावर मोकळ्या पटांगणांत कोंडाळं करून बसत; तंबाकू दाढेला धरून पाऊस-पाण्याच्या, पैशाभांडणाच्या गोष्टी चालत. त्या संपल्या कीं, कुणी तरी खाकरून विचारी

'आर बापू हायस का गा ? ओऽ.'
'व्हय ! बसलोय नव्ह का !'
'आर मग बोलायचं न्हाईस् व्हय'

'अन् मग हुन जाऊद्यान् काय ! झकास चुटका झाला पाहिजे बापू' हौशी माणूस बोलून जाई.

मग 'काळा चांफा', 'येडंभूतं', 'विक्रमादित्य' असल्या गोष्टींचीं नावं सुचविलीं जात. बापू त्यांतली एखादी गोष्ट सांगायला सुरवात करी. कुणी तरी 'हुकार' देत असे. सुरवातीसुरवातीला सगळेच जण

मोठ्या उत्सुकतेनं गोष्टी ऐकत. राजदरबारचीं वर्णनं, भुताखेतांचीं भयानक वर्णनं, पऱ्यांचीं वर्णनं बापू आपल्या धिम्या वजनदार शब्दांत सांगत असे. घोंगडं घोमटून घेऊन कुणी हुंकार देत, कुणी तिथंच लवंडत. म्हातारी खोडं अर्धवट डोळे मिटून भिंतीला टेकून गुंगीत बसून राहात. बारकी पोरं हंसतां हंसतां झोपी जात. बापूची गोष्ट चालूंच राही. रात्र काळी झाली म्हणजे माणसं उठून आडोशाला जाऊन पडत. एक गोष्ट तीन तीन चार चार दिवस चालायची. माणसं गोष्टींत कंटाळली म्हणजे पवाडे ऐकत. बापूला अभंग म्हणायला सांगत. यावेळीं मात्र बापू म्हणजे कोणी तरी मोठा आहे अशा तऱ्हेनें लोक त्याच्याशीं वागत.

बापूला मागपुढं कुणींच नव्हतं. ना घर, ना दार, ना पैसा ना अडका. या सर्व गोष्टींची बापूला कधीं जरूरच भासली नाहीं. बापू किती वर्षांपासून जसाच्या तसाच होता. दोन रेघा मारल्यासारखे त्याचे डोळे मिटल्या-सारखेच वाटायचे. जगांतलं सुखदुःख पाहयचं त्यानं सोडूनच दिलं होतं. पातळ धारदार नाक त्याच्या ओठाला टेकलं होतं. त्याचे कान जोरांत धरून बाहेर ओढल्या प्रमाणं दिसत. टोपीचं नुसतं कडंच बापू डोक्यांत बसवी. त्या कडयाला वरचं कापडच नव्हतं त्यामुळं त्याचे काळेपांढरे केस वरून दिसत. कोपरांच्या हाडा-मुळें दोन्ही बाह्यावर त्याचं ' कुडतं ' फाटलेलं असे. पाय फुफाट्यानं माखून निघालेले असायचे.

बापू वरून गरीब होता तसा आंतूनहि. त्यानं कधीं सरावांतल्या इरसाल शिव्या कुणाला दिल्या नाहींत कीं हातांत चिलीम धरली नाहीं. त्याच्या भुवया रागानं कधीं कपाळांत पसरल्या नाहींत कीं, अटीतटीनं वाद करतांना तो कधीं दिसला नाहीं. अन् रागावून घुम्या-सारखा कोपऱ्यांतहि बसला नाहीं.

रात्रीं माणसांचं कोंडाळं जमलं म्हणजे कधीं तरी बापूच्या लग्नाचा विषय निघे.

'आर बाप्या, आतां एकला किती दिस हिंडणार ? औंदा चैतांत हुन जाऊ द्या बार आमच्या म्हारत्यासंग' कुणीतरी लांबून सुरवात करी.

' व्हय, व्हय ग्यानबा ! लै दीन झाल; बाप्या एकटाच हाय्. आमच्या सोइरीकींत हाय् एक प्वार ! ती बी एकलीच हाय गरीब ! मग बगा बाप्पुराव ! ओ ! काय म्हणतुइ ? '

' तुमचं आपलं गम्मतंच दादा ! काय करायचं आपनाला. एकला जीव सदाशीव. खोपाट मांडून त्याची उस्तवार कोन करणार ! ' बापू बोलत असे.

चैत्र महिना येई. लग्नाचीं बोलणीं झोपडयांतून सुरू होत. माणसं तयारीला लागत. अन् एक दिवस हलग्या पिपाऱ्यांनीं सारी वस्ती निनादली जाई. नव्या कापडाचा वास सर्वत्र पसरे. धान्याच्या कणग्या रिकाम्या होत. जेवणावळी झडत. सगळा गांव जेवून जाई. बापूला बैलाची घाण काढण्यापासून पत्रावळी काढण्यापर्यंत सर्व कामें करावीं लागत. लग्न संपल्यावर त्याच्या अंगावर नवें कापड दिसे. वस्तीवर नव्या झोपड्या उठत. कांहीं नवे चेहरे दिसायला लागत. ओळखीचे जुने चेहरे नाहींसे होत. बापू तसाच सडा फटिंग राही. लगीन घाईत बापूच्या लग्नाची कुणालाच आठवण राहात नसे. बापूच्याहि हें सर्व आंगवळणी पडलं होतं. त्याचं त्याला विशेष कांहींच वाटत नव्हतं. त्याबद्दल त्यानं कधीं शब्द टाकला नाहीं कीं कुणाच्यामागं तो लागला नाहीं. लोक नेहमींप्रमाणें त्याच्याशीं वागायला लागत. बोलले बोल विसरून जात. त्याला गोष्टी सांगायला सांगत. त्याचे अभंग ऐकत बसत.

आकाशाच्या धुरकट टोपलीला आपलं रंगीबेरंगी जाळं लावून बसलेला तांबडा कोळी पश्चिमेकडं थरथरत गेला होता. दिवसभर लक्ष ठेवूनहि पिवळ्या पांढऱ्या ढगांच्या पिसाखेरीज त्याच्या जाळ्यांत कांहींच अडकलं नव्हतं. वाऱ्याच्या झोतानं ही रंगीबेरंगी ढगांचीं पिसं पश्चिमेला पसरलीं होतीं.

बापू एका माळावर झाडाखालीं बसला होता. एक बिट्टं पोरगं शाळा चुकवून त्याच्याजवळ अभंग ऐकत बसलं होतं. शेळ्यामेंढ्या माळावर इतस्ततः विखुरल्या होत्या. खालीं मान घालून मच्मच् करीत ओठानं गवत खात होत्या. बापू रंगांत येऊन अभंग म्हणत होता.

तेवढ्यांत एक घार ' चिळचिऽऽरी ' करून किरळ्या मारत पंखाड पसरून बापूच्या डोक्यावर घिरट्या मारूं लागली. घुबड भुतासारखं थुत्कार करूं लागलं. टिटवी वातावरणाला चरा पाडीत निघून गेली. सर्व वातावरण बदललं. त्याच्यावर अशुभाचा पापुद्रा आला. बापूचा तेलकट चेहरा ओढला गेला. त्याचं मन आंत आंत दडी मारूं लागलं. त्यानं अभंग म्हणणं बंद केलं अन्

उदासीनतेचा एक एक घुटका गिळत तो बसून राहिला. इतक्यांत एक काळा नाग सळसळ करीत त्या पोराच्या पायापाशीं आला. बापूचं मन चरकलं. तो घाबरला. तो त्या पोराला डसणार असं दिसतांच बापूनं त्याला खसकून् ओढला. तें पोरगं धाडकन् ढेकळांत जाऊन पडलं. त्याला काय झालं तें समजलंहि नाहीं. अन् तेवढ्यांत बापूनं एक आरोळी मारली. दोन्ही हातांत उजव्या पायाचा अंगठा घट्ट धरून बापूनं एक चक्कर खाल्ली व तो जमिनीवर पडला. त्यानं कचकन् दांतांनीं अंगठ्याचा तुकडा काढला व तोंडानं तो रक्त चोखून काढूं लागला. भळभळा रक्त वाहूं लागलं. ते पोरगं हें सर्व पाहून घाबरलं व ओरडतच वस्तीकडे पळालं.

माणसं नुकतीच परतलीं होतीं. मेंढरं कोंडत होतीं. बैल दाव्याला बांधीत होतीं. धांपा टाकीत आलेलं घाबरं पोरगं बघून माणसं त्याच्याजवळ आली पण त्याच्या तोंडून एक शब्द फुटत नव्हता. ते धपापलं होतं. ' आर काय झालं सांग सांग.'

' बऽ ऽ ब ऽ बाप्याला जना ऽऽ वर डसलं. मीऽऽ मी ऽ होतोऽऽत '

' अर कुटं ? कुटं डसल ? आँ ?' कुणी तरी विचारलं. ' वऽ व वरल्या माळावर बाबळी खालीं. '

अन् वाऱ्यासारखी ही बातमी सगळीकडे पसरली. माणसं हातातलं काम टाकून माळावर पळाली.

बापू बाभळीखालीं अस्ताव्यस्त पडलेला होता. त्याच्या उजव्या पायापाशीं रक्ताचं थारोळं झालं होतं, हातपाय गार पडले होते. जाणत्या लोकांनीं त्याचे डोळे पाहिले, छाती पाहिली. अन् त्यांच्या चेहेऱ्यावर आशा दिसूं लागली. त्यांनीं त्याला उचललं व जवळच्याच शिदोबाच्या देवळांत नेऊन टाकलं.

सर्व बायाबापड्या गंभीर चेहेरे करून बसल्या होत्या. पुढं काय होणार याची सर्वांना काळजी लागली होती. ढोल झांजा वाजत होत्या. पांच सहा लोक 'शिदोबाचा धांवा' म्हणत होते. गांवांतला मांत्रिक त्याच्या पायाला राख लावून वरून खालीं चोळत होता. तोंडानं मंत्र म्हणत होता.

रात्रीचे ९–१० वाजले. बापूच्या जगण्याचीं लक्षणं दिसेनात. त्याचे हातपाय अधिकच गार पडले. शरीर काळंनिळं होत होतं. लोक भीतीनं प्रश्नार्थक चेहरा करून एकमेकाकडं पाहात होते. उत्तर कुणीच देत नव्हतं. रात्र काळी होत चालली. लोकांची आशा काळवंडू लागली.

साप चावलेलीं अनेक माणसं शिदोबाच्या देवळांत बरीं होत असत. परंतु लोकांनीं बापूची आशा सोडली. बापूनं शेवटचा श्वास टाकला अन् त्याचवेळीं शिदोबा-पुढची पणती विझली. बापूची शान्त निरागस प्राणज्योत त्या अंधारांत विरघळली.

वडाचा मोकळा पार, पटांगण आतां उदास दिसतं. बापूचा खडा आवाज तिथं उमटत नाहीं. माणसं उगीच वेड्यासारखी अंधारांत बसून रहातात. कुणी गोष्टी सांगत नाहीं, पवाडे म्हणत नाहीं.

अन् आतां विहिरीच्या काळ्याभोर कट्ट्यावर अभंग तरळत नव्हते. तिथं भयाणता घुम्यासारखी बसली होती. त्या जागेची मला भीति वाटली. तिथं पाऊल टाकतांना मन चरकलं. झाडांनीं घुमटलेली ती काळी विहीर उदासीनतेनं भरली होती. पडक्या किल्ल्यांतली उदासीनता आली होती त्या विहिरीला. खोल, गूढ 'आ' वासून बसलेली, एकटी. तिच्यांत उडी टाकण्यास मन धजेना. अन् मी त्या निळ्या पहांटे पारोसाच परतलों.

◆ ◆ ◆

# कुतुबमीनार

**रवीन्द्र भट, द्वितीय वर्ष, साहित्य.**

कुतुबमिनारा सांग मला तूं,
एक कहाणी तव हृदयांतिल
जया क्षणीं तुज नरें निर्मिलें
स्वर्गावरती स्वारी करण्या
आक्रंदन हें अजुनी निनादे,
असंख्य आत्मे गेले वाया

सत्तांधेतुन तुझी निर्मिती
एक राक्षसी भूक निमाली
पायाखालीं तुझिया सारी
मानवता ही चुरडुन गेली
कुतुबमिनारा सांग मला अन्
कुतुबशाहिची रीत आगळी
मानवतेला दूर सारुनी,
मानव्याची प्रतिमा घडली

# "ॲज यू लाइक इट" मधील गीतें

गजानन य. कामत, इंटर आर्ट्स्

महाकवि शेक्सपियरच्या लिखाणाचा यथार्थ आस्वाद घ्यायचा असेल तर परीकथांवर सुद्धां बाल्यवत् विश्वास ठेवण्याची तयारी असावी लागते आणि ज्या रसिकांच्या अंगीं प्रसंगीं "हाय बा" बनण्याची तयारी असेल व चित्रित देखाव्यास शक्य कोटींत आणून बसविण्यासाठीं केलेल्या रंगसफेतींतील गुणग्रहण करण्याची शक्ति असेल त्यांना तर शेक्स्पियरचें लिखाण एक वेगळीच अनुभूति प्राप्त करून देतें.

इंग्रजी नाटकांत पद्यांचा समावेश करण्याबद्दलच्या अग्रपूजेचा मान जरी शेक्स्पियर यास प्राप्त होत नसला तरी कथानक आणि अभिनय या दोहोंसही गतिमान करण्याची पद्यांतील शक्ति त्यानेंच प्रथम जाणली. शिवाय नाटकाच्या एकंदर सजावटीवर एक अदृश्य झकाकी चढविण्याची पद्यांतील किमया लक्षांत घेऊन त्यानेंच पद्य हा नाटकाचा एक सर्वमान्य घटक बनवून त्यास इंग्रजी नाट्यशास्त्रांत अढळ स्थान प्राप्त करून दिलें.

अभिनय व संवाद यांच्या कोंदणांत चपखलपणें बसविलेल्या त्याच्या गाण्यांस सांदर्भिक महत्त्व तर असतेंच परंतु त्याशिवाय अभिनयास स्थैर्य आणणें, सभोंवतींच्या देखाव्याची प्रेक्षकांस जाणीव करून देणें आणि गाणाऱ्या पात्रांच्या स्वभाववैशिष्ट्याचें व सांप्रत मनःस्थितीचे बारकावे स्पष्ट करणें, या व इतर अनेक गोष्टी एखाद्या तुर्की गालिच्यांतील रंगछटाप्रमाणें, एवढ्या कलापूर्ण रीतीनें तो या गाण्यांत गुंफूं शकतो कीं, त्याच्या कल्पकतेबरोबर वसत असलेली तर्कशुद्धता व छंदोबद्धता बघून विस्मय वाटल्याखेरीज रहात नाहीं. तत्कालीन रंगमंचरचनेची तुलनात्मक अपूर्णता विचारांत घेतां त्या त्या वेळच्या नेपथ्यरचनेची कल्पना गाण्यासारख्या मार्गानें प्रेक्षकांच्या मनावर त्यांच्या नकळतच बिंबविण्यांत त्यानें दाखविलेलें कौशल्य म्हणजे त्याच्या नाट्यतंत्राच्या सखोल ज्ञानाचा एक पुरावाच होय.

वर नमूद केल्याप्रमाणें जरी त्याच्या बहुतेक नाटकांत गाणीं हीं कथासूत्रांत बेमालूम मिसळलेलीं आढळतात तरी त्याच्या प्रस्तुत "As you like it" या नाटकांत मात्र "Blow, Blow, thou winter wind" हें एक गाणें वगळल्यास, केवळ गाणीं गावयास मिळावीं म्हणून प्रवेशरचना केल्यासारखी वाटते. कदाचित् श्री. नोबल यांनी सूचित केल्याप्रमाणें, त्याच्या नाटककंपनीस जाचणाऱ्या तत्कालीन बाजारी चढाओढीचाहि हा परिणाम असूं शकेल. तरी सुद्धां प्राचीन गोप-जीवनाचें थयथयतें व मिष्किल दर्शन घडविणाऱ्या, ह्या गोड फसवेगिरीनें भरलेल्या नाटकास, गाण्यांच्या अभावानें पुष्कळसें अपूर्णत्व नक्कीच आलें असतें.

ह्या नाटकाच्या कथानकाचा, कांहींसा थबकून थबकून हादरे खात खात पुढें जाणारा ओघ लक्षांत घेतां त्यांतील एकहि गाणें अभिनयास पोषक भासत नाहीं. तरीसुद्धां दृश्याची रंगत वाढवून सभोंवतीच्या देखाव्याचें शाब्दिक चित्रण करून आधुनिक नाट्यतंत्रास नेपथ्यरचना व पार्श्वसंगीताच्या सहाय्यानें जे साध्य करून घ्यायचें असतें तेंच शेक्स्पियरनें या नाटकांत गाण्यांच्या साहाय्यानें साध्य करून घेतलेलें दिसतें आणि म्हणूनच कदाचित् तंत्रदृष्ट्या हें नाटक शेक्स्पियरचें एक पुढचें पाऊल म्हणून ओळखलें जात असावें.

ह्या नाटकांतील गाणारें प्रमुख पात्र "Amiens" हा एक जन्मजात कवि असून, एक नवोदित गायक आहे. "Twelth Night मधील Feste" या विदूषकासारखा गाणें हा त्याचा धंदा नव्हे किंवा Tempest मधील Ariel सारखा सदैव गान-विहार करण्यासाठींहि त्याची निर्मिति झालेली नाहीं. निसर्गाच्या सान्निध्यांत संरक्षणरहित, परंतु शांतिपूर्ण जीवनाचे स्तुतिपाठ गाण्याच्या नादांत जरी थोडासा काव्यमय माणूसघाणेपणा त्यानें आपल्या गायनांतून ध्वनित होऊं दिला तरी त्याची गाणीं हीं त्याच्या भावपूर्ण मनोवृत्तीच्या रंगदार छटाच भासतात.

"Uender the greenwood tree" ह्या त्याच्या पहिल्या गाण्यांत शुचिर्भूत वनवासी जीवनाचा एवढा आनंद व्यक्त होतो कीं Jaques सारखा तथाकथित

संशयात्मासुद्धां घटकाभर आपलें " सिह्याचें कातडें " विसरून त्यास परत गाण्याचा आग्रह करतो. अर्थात् Jaques ला अंगीकृत तत्त्वज्ञानाची नशा परत चढतांच तत्परतेनें तो त्या गाण्याचीं " झेंडूचीं फुलें " करून टाकतो ही गोष्ट वेगळी !

त्याचें दुसरें गाणें " Blow, Blow thou winter wind " हें नाटकांतील सर्वांत कौशल्यपूर्ण रीतीनें वापरलेलें गाणें होय. अगोदरच्या प्रवेशांतून चित्रित झालेली Orlando ची हकीकत Orlando स्वतः Duke senior ला सांगत आहे असें कथासूत्र योजलें असतां ( Duke senior च्या आज्ञेवरून ) हें गाणें Amiens गाऊन दाखवितो. हकीकत Duke senior साठीं तर गाणें प्रेक्षकांसाठीं ! गाण्यावेळचें वातावरण मागच्या गाण्यासारखेंच असून यांत मात्र निसर्ग-स्तुतीच्या जोडीस मानवी कृतघ्नतेवर हल्ला चढविण्यांत आलेला दिसून येतो. हिवाळ्याचा चावरा त्रासदायक वारा हा मानवी कृतघ्नतेपेक्षां शतपटीनें सुसह्य आहे, असें सांगणारें हें गाणें म्हणजे मानवी कृतघ्नतेवरील शेक्स्पिअरच्या रागाचा पायाच भासतो, कारण पुढें कृतघ्न माणसांचे वाभाडे काढण्यासाठीं त्यानें आपल्या पुढील कारकीर्दीत King Lear ही स्वतंत्र शोकांतिका लिहून या रागाचें शिखर गांठलेलें आढळतें.

या नाटकांतील तिसरें गाणें " What shall he have that kill'd the deer " हें समूहगीत चवथ्या अंकांतील दुसऱ्या प्रवेशाच्या शेवटीं आहे. याच अंकाच्या पहिल्या प्रवेशांत नायक-नायिकेस दोन तासानंतर परत भेटण्याचें वचन देतो व तिसऱ्या अंकाच्या सुरवातीला नायिका आतुरतेनें नायकाची वाट पहात बसलेली दिसून येते. अर्थात् हे मधले " दोन-तास " भरून काढण्यासाठीं आधुनिक हिंदी सिने-दिग्दर्शकांवरहि मात करण्याजोग्या धिसाडघाईनें हें गाणें दुसऱ्या प्रवेशांत घुसडण्यांत आलें आहे. जरी अद्यावत् नाट्यतंत्रांतील " Drop curtain "मुळें अशाप्रकारची ही योजना आज निरर्थक वाटली तरी संवादानुरूप गाणें रचून प्रवेश रचनेंतील वर दाखविलेला कृत्रिमपणा घालविण्यांत आणि नाट्यसूत्राचा एकसंधीपणा वाढविण्यांत नाटककार पुष्कळसा यशस्वी झालेला दिसून येतो.

शेवटीं पांचव्या अंकांत सुंदरसें "It was a lover and his lass" हें वसंतगीत आढळतें. हें गाणें जरी अर्थपूर्ण व आकर्षक असलें तरी कथानकाच्या दृष्टीनें तें कांहींशा कृत्रिमपणें जोडून दिलेलें दिसतें, आणि जर कां परत एकदां नाटककारानें आपल्या कल्पकतेच्या जोरावर या गाण्यांतून तत्कालीन सृष्टीदर्शन रंगविलें नसतें तर तें गाणें अनावश्यकहि वाटलें असतें. दोन-तीन लग्नें एकदम लावून देणाऱ्या, झोंबऱ्या हेमंतांत सुरू होऊन फुलत्या वसंतांत संपणाऱ्या या सुखांतिकेच्या शेवटीं,

That o'ver the green corn-field did pass
In the spring-time the only pretty ring-time
When birds do sing, hey ding a ding ding;
Sweet lovers love the spring.

या आणि अशा अनेक ओळी कुणाला आवडणार नाहींत बरें ?

सबंध नाटकावरील गाण्याच्या एकंदर परिणामाचा विचार करितां, शेक्सपिअरनें प्रस्तुत सुखांतिकेंत गाण्यांचा वापर अतिशय प्रभावीपणे केला आहे, असेंच म्हणावें लागतें. कारण ह्या गाण्यामुळें, जेथें स्वर्गतुल्य निसर्गसांन्निध्य आपल्या शीतल हिरण्यागार स्पर्शलाघवानें रटाळ दैनंदिन जीवनांतील सर्व दुःखांचा परिहार करूं शकेल अशा कल्पनारम्य वातावरणांत, दररोजच्या चाकोरींचे बंध तोडून सर्वसाधारण प्रेक्षकांस उडून यावेसें वाटेल अशा प्रकारची अनुभूति ही नाटकापासून प्राप्त झालेल्या मनरंजनांत भर घालतेच पण त्यांहून विशेष म्हणजे ती मनावर असा कांहीं रोमांचकारी परिणाम करते कीं पर्यायानें प्रेक्षकाची नाटकाबद्दलची आपुलकी शतपटीनीं वाढीस लागते.

◆ ◆ ◆

# मदत पाहिजे

मा. वि. ताम्हणकर, ज्यू. बी. एस्‌सी.

एका विद्वान् (?) शास्त्रज्ञानें अभ्यासासाठीं एक प्रयोग करण्याचे ठरविलें. एका मिनिटाचा प्रयोग होता तो !

समजा खूपच खूप (लागतील तेवढ्या) गोट्या घेतल्या आणि एक खूप (अर्थात् लागेल तेवढी) मोठी पिशवी घेतली. गोट्यांना अनुक्रम दिले आणि दुपारीं बाराला एक मिनिट असतांना प्रयोगाला सुरुवात केली.

१२ ला $\frac{१}{१}$ मिनिट असतांना १ व २ क्रमांकाच्या गोट्या पिशवींत टाकल्या व १ क्रमांकाची गोटी बाहेर काढली. १२ ला $\frac{१}{२}$ मिनिटें असतांना ३ व ४ क्रमांकाच्या गोट्या आंत टाकल्या व २ क्रमांकाची गोटी बाहेर काढली. असेंच करीत करीत १२ ला (समजा) $\frac{१}{१२३४५६७८९}$ मिनिटें असतांना (१२३४५६७८९×२−१) आणि (१२३४५६७८९×२) क्रमांकाच्या गोट्या आंत टाकल्या व (१२३४५६७८९) क्रमांकाची गोटी बाहेर काढली व हीच क्रिया १२ वाजेपर्यंत चालू ठेवली आणि १२ वाजतां प्रयोग बंद केला.

त्या शास्त्रज्ञाला प्रश्न असा पडला कीं १२ वाजतां पिशवींत गोट्या असतील कां नसतील ?

त्यानें एकदां विचार केला, जर प्रत्येक वेळेला २ गोट्या आंत टाकून १ गोटी बाहेर काढणार तर प्रत्येक वेळीं १ गोटी आंत राहील म्हणजे १२ वाजतां पिशवींत थोड्या तरी गोट्या असणारच.

पण त्याला शंका आली कीं जर 'क' क्रमांकाच्या गोटीचा विचार केला तर ती १२ ला $\frac{१}{क}$ मिनिटें असतांना बाहेर काढली असणार म्हणजेच १ क्रमांकाची गोटी १२ ला $\frac{१}{१}$ मिनिट असतांना बाहेर काढली असणार, १०००० क्रमांकाची गोटी १२ ला $\frac{१}{१००००}$ मिनिटें असतांना बाहेर काढली असणार याचा अर्थ १२ च्या आंत प्रत्येक गोटी बाहेर काढली जाणार; म्हणजे १२ ला पिशवींत गोट्या असणें शक्य नाहीं.

निर्णय घेण्यांत त्या शास्त्रज्ञाला करता कां मदत तुम्ही ?

(आधारित)

# वादळ

प्रभाकर काजळे, सी. बी. ए.

सुटले लगाम,
तुटलें बंधन
धावूं लागलें
चंचल मानस ॥१॥

फुटल्या वाटा
उठल्या लाटा
मनःसागरीं
प्रचंड वादळ ॥२॥

सुटलें तारूं
कसें हाकारूं ?
पहा खवळला
गभीर सागर ॥३॥

निळा समिंदर
निळेंच अंबर
मानसीं चालें
पिशाच नर्तन ॥४॥

काय करावें ?
कसें करावें ?
हेंच कळेना
कसें तरावें ? ॥५॥

तोंच नभींचा–
तारा वदला,
"तुझ्यासारिखें
आमुचें जीवन" ॥६॥

अंधारांतही
प्रकाश निर्मुनि
जगतो जीवन
लुटतो जीवन ॥७॥

ऊठ पामरा
गांठ किनारा
सत्वरीं तारूं
आवर सावर" ॥८॥

# संस्कृत विभाग

# Dandin's Daśakumāracarita

**B. G. Sarode,** Sr. B. A.

